# हिन्दूंच्या चळवळीचें ध्येय व धोरण

लेखकः

बॅ. विनायक दामोदर सावरकर

स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८०७

१०८०२

REFBK-0019189

प्रकाशकः

महाराष्ट्र प्रकाशन संस्था

मुंबअी नं. ४.

वि:
ग्रं. ६५५७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०६०२

# हिन्दूंच्या चळवळीचें ध्येय व धोरण

लेखकः—बॅ. वि. दा. सावरकर अध्यक्ष, हिंदुमहासभा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0019189

प्रकाशक

महाराष्ट्र प्रकाशन संस्था

मुंबई नं. ४

प्रकाशक
गोपाळ गोविंद अधिकारी
गोवर्धनभुवन, खेतवाडी, मुंबई नं. ४

[ पहिल्या आवृत्तीचे हक्क प्रकाशकांचे स्वाधीन ]

किंमत १ रुपया

मुद्रक
व्ही. व्ही. पटवर्धन
कॅलेंडर प्रेस, दादर, मुं. नं. १४

# खुलासा

या पुस्तकांत स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव सावरकर यानीं अहमदाबाद, नागपूर आणि कलकत्ता येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशन प्रसंगीं जी अध्यक्षीय भाषणें केली त्याच भाषणांतील मजकूर सुसंगतपणें एकत्र करून या पुस्तकांत पुनर्मुद्रित केला आहे. या पुस्तकाचें मनःपूर्वक नेहमीं वाचन करावें म्हणजे सध्यांच्या हिंदुत्वविरोधक परिस्थितींत मनाची होणारी चलबिचल थांबून तें हिंदुराष्ट्र—ध्येयाशीं एकनिष्ठ राहील. प्रत्येक हिंदूकार्य-कर्त्यानें या पुस्तकांतील स्वातंत्र्यवीरानीं दिग्दर्शित केलेल्या विचारानुसार खेडोपाडीं प्रचार करावा. त्यांना या पुस्तकाचा फार उपयोग होणार आहे. त्याचप्रमाणें हिंदूसभांच्या कार्यालयांतून व वाचनालयांतून या पुस्तकाच्या निदान दोन प्रती तरी वाचनासाठीं नेहमीं ठेवण्यांत याव्यात.

**गो. गो. अधिकारी**

---

सूचनाः—अशा प्रकारची पुस्तकें विकत घ्यावयाची ज्यांची इच्छा असेल त्यानीं आपली नांवें मला कळवावी. म्हणजे वेळो-वेळीं पुस्तकें तयार होताच तीं त्यांच्याकडे व्ही. पी. नें पाठवीत जाईन.

# हिंदूंच्या चळवळीचें ध्येय-धोरण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
70602

( १ )

## हिंदू कोणास म्हणावें ?

जो ही भारतभूमी, सिंधुपासून समुद्रापर्यंतची ही भूमी, आपली पितृभू नि पुण्यभू मानतो तो प्रत्येक मनुष्य हिंदु होय. पुण्यभूमी म्हणजे ज्या भूमींत त्याचा धर्म निर्माण झाला नि वाढला ती भूमी.

म्हणून वैदिक, सनातनी, जैन, लिंगायत, बौद्ध नि शिख धर्म आणि आर्य, ब्रह्मो, देव नि प्रार्थना हे समाज आणि असेंच हिंदुस्थानांत उत्पन्न झालेले इतर धर्म यांचे अनुयायी ते सर्व हिंदु होत. या सर्वांचा मिळून संकलितपणें हिंदुसमाज होतो.

अर्थातच मूळचे रहिवाशी वा वन्यजाती म्हणून गणले गेलेले ते सर्व हिंदूच होत. कारण कोणत्याही प्रकारचा धर्म वा पूजाविधी ते मानीत असले तरी त्यांची पितृभूमी व पुण्यभूमी हिंदुस्थान हीच आहे.

म्हणून हीच व्याख्या सरकारनें मान्य केली पाहिजे आणि येत्या शिरगणतीचे वेळीं हिंदूंची लोकसंख्या मोजतांना हिंदुत्वाचें गमक म्हणून हीच व्याख्या मानली पाहिजे. ही व्याख्या संस्कृतमध्यें पुढीलप्रमाणें मांडली आहे:—

आसिंधु सिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृतः ॥

येथेंच मला हें दाखवून दिलें पाहिजे कीं हिंदुस्थानांत उगम पावलेल्या कोणत्याहि धर्माचा अनुयायी म्हणविणाऱ्या कोणाहि मनुष्याला हिंदु म्हणून लेखणें

हें बव्हंशीं भोंगळ किंवा असंबद्धच होईल. कारण हिंदुत्वाचें तें केवळ एक अंग किंवा लक्षण आहे. पण आपल्याला जर आपली ती व्याख्या झांकळून जावयाला किंवा मिथ्या ठरावयाला नको असेल तर ‘ हिंदुत्वां ’ तलि संकेताचा दुसरा नि तितकाच महत्त्वाचा घटक अवगणितां किंवा दुर्लक्षियतांच येणार नाहीं. एखाद्या मनुष्यानें हिंदुस्थानांत उगम पावलेल्या कोणत्याहि धर्माचा अनुयायी म्हणून म्हणविणें–म्हणजेच त्यानें हिंदुस्थान ही आपली नुसती ‘ पुण्यभू ’ च मानणें–एवढीच गोष्ट पुरेशी नाहीं, तर त्यानें ह्या देशाला आपली ‘ पितृभू ’ म्हणूनहि मानणें अवश्य आहे. ह्या प्रश्नाची अंगोपांगांसह संपूर्ण चर्चा करण्याचें हें स्थळ नसल्यामुळें त्याकरितां सर्वस्वीं मी माझ्या ‘ हिंदुत्व ’ ह्या पुस्तकाकडेच बोट दाखवितों. त्या पुस्तकांत ह्या संबंधीं सर्व विधानें नीट पुढें मांडलेलीं असून ह्या प्रश्नाचें अतिशय विस्तारपूर्वक विवेचन केलेलें आहे. प्रस्तुत इतकेंच सांगितलें असतां मला पुरें वाटतें कीं जेथें त्यांचा धर्म जन्मास आला त्या एकाच पुण्यभूमीच्या एकट्या एका बंधानेंच केवळ नव्हे–तर एक संस्कृति, एक भाषा, एक इतिहास नि सर्वांत विशेष म्हणजे एक ‘ पितृभू ’ सुद्धां यांच्या बंधांनीं हिंदुजगत् हें स्वयमेव निबद्ध झालेलें असून त्यांच्या योगानेंच तें एक स्वयंसिद्ध राष्ट्र नि स्वतंत्र लोकसमाज ठरतें. हे दोन घटक एकत्र मिळूनच आपलें हिंदुत्व घडतें आणि त्या घटकांच्या योगानेंच आपण जगांतील दुसऱ्या कोणत्याहि लोकांपासून निराळे ठरतों. उदाहरणार्थ जपानी व चिनी लोक स्वतःला हिंदूंशीं पूर्ण एकात्म असलेले मानीत नाहींत नि त्यांना तसें मानतांहि येणारें नाहीं तें ह्या कारणामुळेंच. ते दोघेहि त्यांच्या धर्माचें जन्मस्थान असलेला आपला हा हिंदुस्थान देश आपली पुण्यभू म्हणून मानितात, पण ते ह्याच हिंदुस्थानाला आपली पितृभू म्हणून मात्र मानीत नाहींत नि त्यांना तसें मानितांहि येण्यासारखें नाहीं. ते आपले सहधर्मीय आहेत, पण आपले स्वदेशबंधु मात्र नाहींत नि होऊंहि शकणार नाहींत. आपण हिंदू मात्र नुसते सहधर्मीच नव्हे तर परस्परांचे देशबंधूहि आहोंत. वंशपरंपरा, भाषा, संस्कृति, इतिहास नि देश या गोष्टी जपानी नि चिनी यांना त्यांच्या-त्यांच्या स्वतःच्या भिन्न अशा आहेत, आणि त्या आपले नि त्यांचें एकराष्ट्रीय जीवन बनण्याइतक्या पूर्णांशानें आपल्याशीं निबद्ध झालेल्या नाहींत. हिंदूंच्या धार्मिक मेळाव्यांत--एखाद्या हिंदुधर्ममहासभेंत--पुण्यभूमीच्या एकत्वामुळें ते आपले

धर्मबांधव ह्या नात्यानें आपल्याशीं मिळूं शकतील. परंतु सर्व हिंदूंना एकत्र जोडणाऱ्या नि त्यांच्या राष्ट्रीय जीवनाचें प्रतिनिधित्व संपादणाऱ्या एखाद्या 'हिंदुमहासभे' विषयीं मात्र त्यांना समान आस्था असणार नाहीं कीं तींत ते समानतेनें भागहि घेणार नाहींत किंबहुना त्यांना तसें करतां येणार नाहीं. व्याख्या ही मुख्यत्वेंकरून वस्तुस्थितीशीं जुळती अशीच असली पाहिजे. 'अनन्य पुण्यभू असणें' ह्या हिंदुत्वाच्या पहिल्या घटकानुसार हिंदुस्थानांतील मुसलमान, ज्यू, ख्रिस्ती, पारसी हे जसे हिंदुस्थान हीच आपली पितृभूमि म्हणून मानीत असूनसुद्धां स्वतःला हिंदू म्हणून म्हणविण्याच्या अधिकाराबाहेर पडतात, तद्वत्च दुसऱ्या पक्षीं आपल्या व्याख्येचा 'अनन्य पितृभू असणें' हा दुसरा घटक जपानी, चिनी इत्यादींनाहि त्यांची नि आपली पुण्यभू एकच असूनसुद्धां हिंदु-गटाच्या बाहेरच टाकतो. ही वरील व्याख्या नागपुर, पुणें, रत्नागिरी इत्यादि ठिकाणच्या 'हिंदुसभा' प्रमाणें पुष्कळ प्रमुख 'हिंदुसभां' नीं यापूर्वींच स्वीकारलीहि आहे. 'हिंदु महासभे' च्या प्रचलित घटनेंत 'हिंदुस्थानांत जन्म पावलेल्या कोणत्याहि धर्माचा अनुयायी म्हणविणारा कोणीहि' असें 'हिंदु' शब्दाचें ढिलें किंवा असंबद्ध विशदीकरण करण्यांत आलें त्या वेळीं तिच्याहि दृष्टींपुढें ही वरील व्याख्या होतीच. परंतु आपण अधिक तंतोतंत किंवा अचूक बनलें पाहिजे अशी वेळ आतां आली आहे. यास्तव ती एकांगी व्याख्या टाकून तिच्या स्थलीं व्यवस्थित नि समर्पक अशी व्याख्या आपल्याला बसविली पाहिजे, आणि म्हणूनच वर दिल्याप्रमाणें स्वयमेव स्पष्टार्थबोधक असणारा वरील सबंध श्लोकच जशाचा तसा आपल्या घटनेंत समाविष्ट केला पाहिजे असें मी आपल्यापुढें मांडतों.

**हिंदु हा शब्द मूळ परकीय नाहीं किंवा हिंदुस्थानांतील मुसलमानांचे आगमनाशीं त्याचा कांहींएक संबध नाहीं.** कांहीं क्षुद्र परकीय लेखकांच्या खोडसाळ प्रतिपादनामुळें कांहीं काळ तसा चुकीचा समज झाला होता. पण आपल्या वैदिक ऋषींनीं देखील कधींकधीं आपल्या ह्या भूमीला सिंधु किंवा सप्तसिंधु म्हटलें आहे. उदाहरणार्थ ऋग्वेदांतीलच पुढील ऋचा ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध करण्यास पुरेशी आहे:—

आ ऋक्षा देह सोमुचद्‌यो वार्यात्सप्त सिंधुषु।
वधर्दासस्य तुविनृम्‌ण नी नमः॥ ( ऋग्वेद ६–८–२४ )

मुसलमानी पैगंबर महंमद जन्मण्यापूर्वी सहस्रावधी वर्षें प्राचीन बाबिलोनियन लोक आपल्याला 'सिंधु' असें म्हणत. आणि प्राचीन झेंदावेस्तामध्यें सिंधु असा आमचा उल्लेख केलेला आहे. सिंधुनदीच्या अलिकडील आपला एक प्रांत अजून या नांवानेंच संबोधिला जातो. त्या प्रांताला आजपर्यंत सिंधुदेश असें नांव आणि तेथील लोकांना सिंधु (सिन्धी) असें नांव प्रचलित आहे. आपल्या अर्वाचीन भाषांमध्यें संस्कृतांतल्या 'स' चें पुष्कळदां 'ह' मध्यें रूपांतर होतें. जसें केसरी किंवा कृष्ण या संस्कृत शब्दांचे हिंदी प्राकृतांत केहरी आणि कान्हा असें रूपांतर झालें तसेंच सिंधु या शब्दाचें अर्वाचीन प्राकृतांत हिंदु असें रूपांतर झालें. हिंदू शब्दाच्या अचूक व्याख्येनुसार हें अवश्यच ठरतें कीं, 'हिंदु' शब्दाचा उपयोग त्यांच्या त्या व्याख्यांत व निर्णीत अशा सामान्य अर्थाला धरूनच करण्याची आणि कोणत्याहि पंथविशिष्ट अर्थानें त्याचा दुरुपयोग होऊं न देण्याची शक्य तितकी सर्व दक्षता आपण घेतली पाहिजे. आपल्यांतील अवैदिक धार्मिक संप्रदायहि समान हिंदुबंधुतेंत समाविष्ट होतात असें एकीकडे मोठ्या आस्थापूर्वक प्रतिपादन करणारे आपले मोठमोठे नामांकित पुढारी नि ग्रंथकारसुद्धां दुसरीकडे सामान्य भाषणांतून मात्र 'हिंदु नि शीख' 'हिंदु नि जैन' अशांसारखे शब्दप्रयोग करण्याची भयंकर चूक करीत असतात. पण त्यामुळें वैदिक किंवा सनातनी तेवढेच काय ते हिंदु ठरूं लागतात हें त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं. त्यायोगें अर्थातच धार्मिक बंधुतेच्या निरानिराळ्या घटकांच्या मनांतून विभक्तपणाचें प्राणघातक विष कालविलें जाण्याला आणि त्यामुळें त्या सर्वांचा सुसंघटित नि एकजीव असा गट साधण्याच्या आपल्या प्रबल आकांक्षेचा नाश करण्याला ते अगदीं नकळतच पण कारणीभूत होत असतात. शब्दांचा गोंधळ हा पुढें विचारांचाहि गोंधळ उत्पन्न करतो. आपल्या लोकांपैकीं बहुसंख्य असणाऱ्या वैदिक सांप्रदायिकांपुरतीच 'हिंदु' ह्या संज्ञेची व्याप्ति होऊं न देण्याची योग्य ती काळजी जर आपण घेऊं तर शीख, जैन इत्यादींसारख्या आपल्या अवैदिक बंधूनाहि स्वतःच्या संबंधांत 'हिंदु' हा शब्द लावण्याविषयीं उद्वेग वाटण्याला कोणतेंच संयुक्तिक असें कारण उरणार नाहीं. आपली पुण्यभू नि पितृभू

या दोन्हीहि नात्यांनीं जे ह्या भरतभूमीला आपली म्हणून मानतात त्या सर्वांचा वाचक असा अगदीं नेमकाच जर ' हिंदु ह्या शब्दाचा उपयोग होऊं लागला तर हिंदु--बंधुतेचे घटक असणारे शीख, जैन व असेच इतर धर्म हे वेदांचे शाखा-रूप किंवा वेदसंभूत असे धर्म नसून ते स्वयंमेव व स्वतंत्र असेच धर्म आहेत अशा मताच्या लोकांनासुद्धां स्वतःला ' हिंदु ' म्हणवितांना आपलें धर्मसंप्रदाय-विशिष्ट स्वातंत्र्य गमावण्याविषयींची भीति किंवा शंका बाळगण्याचें कारणच राहणार नाहीं. जेव्हां--केव्हां समग्र हिंदुजगताच्या या घटकावयवांचा भेदच दाखवावयाचा असेल तेव्हां ' वैदिक नि शीख ' ' वैदिक नि जैन ' इत्यादि अशा प्रकारें आपण त्यांचा नामनिर्देश करावा. पण ' हिंदू नि शीख ' ' हिंदू नि जैन ' असें म्हणणें हें ' हिंदू नि ब्राह्मण ' किंवा ' जैन नि दिगंबर ' किंवा ' शीख नि अकाली ' असें म्हणण्याइतकेंच आत्मविरोधी नि दिशाभूल करणारें आहे. ' हिंदु ' ह्या शब्दाचा अशा प्रकारचा हानिकारक अपप्रयोग विशेषतः आपल्या ' हिंदुमहासभे ' च्या भाषणांतून ठरावांतून, नि कागदपत्रांतून लक्ष्यपूर्वक टाळण्यांत यावा.

हिंदु चळवळीचा ध्येयवाद विशद करतांना **हिंदुधर्म, हिंदुत्व आणि हिंदुसमाज** या तीन शद्बांनीं व्यक्त केले जाणारे यथातथ्य अर्थ समजणें हें नितांत आवश्यक आहे. हिंदु या शद्बापासून इंग्रजीमध्यें हिंदुइझम ( हिंदुधर्म ) हा शद्ब बनविला आहे. त्याचा अर्थ हिंदु लोक ज्या धार्मिक पंथांना वा मार्गांना अनुसरतात ते पंथ वा मार्ग. दुसरा शद्ब ' हिंदुत्व ' हा त्यापेक्षां अतिशय व्यापक नि संग्राहक आहे. हिंदुधर्म शद्बाप्रमाणें केवळ हिंदु लोकांचा धार्मिक दृष्टींचा विचार त्यांत नसून सांस्कृतिक, भाषिक, सामाजिक आणि राजकीय या दृष्टींचाहि त्यांमध्यें अंतर्भाव होतो; तो बहुतांशीं Hindu Polity या इंग्रजी शद्बाशीं समानार्थक आहे. आणि त्याचें पुष्कळसें तंतोतंत भाषांतर इंग्रजींत Hindu-ness असें होईल. तिसरा शद्ब Hindudom ( हिंदु समाज ) ह्याचा अर्थ संकलितपणें हिंदु म्हणून संबोधिले जाणारे सर्व लोक. हिंदु जगताचा संकलित-रीत्या निर्देश करणारें तें एक नांव आहे. ' हिंदुमहासभे 'ची भूमिका कोणत्याहि श्रद्धातत्वांवर किंवा कोणत्याहि विविक्षित ग्रंथावर किंवा सर्वेश्वरवादी वा एकेश्वर-वादी वा निरीश्वरवादी या सारख्या कोणत्याही तत्वज्ञानाच्या संप्रदायावर आधार-

लेलीच नाहीं. कोणत्याही ' इझम् 'शीं ( वादाशीं ) तिचा संबंध असलाच तर तो सर्व म्हणजे हिंदुस्थानाला आपली पूण्यभूमि आपल्या श्रद्धेय मताचें मूलपीठ नि मंदिर मानणें ह्या सामान्य लक्षणांपुरताच होय, आणि हें लक्षण प्रत्येक हिंदूच्या संबंधांत तो अनुयायी असणाऱ्या कोणत्याहि धर्माचा किंवा पंथाचा हिंदुस्थानांतच उगम झालेला आहे ह्या गोष्टीवरूनच अवश्यमेव होय.

( २ )

# आपल्या इतिहासांतील दृष्टिक्षेप

आपल्या ह्या हिंदु राष्ट्राचा निदान ५००० ( पांच सहस्र ) वर्षांपूर्वी-पर्यंत—त्या वैदिक काळापर्यंत ऐतिहासिक व निरपवादरीत्या माग काढतां येतो. आपले राष्ट्रीय पूर्वज त्या वेळीं सप्तसिंधूंच्या तटाकीं वसत नि उत्कर्ष पावत असून वाढतां-वाढतां पुढें बलाढ्य हिंदु राष्ट्र म्हणून सुनिश्चितपणें विख्यात होणार असलेल्या एका राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा करीत होते. वांशिक व सांस्कृतिक दृष्ट्या ते आर्य म्हणून संबोधिले जात; प्रादेशिकदृष्ट्या ते सिंधूंचें वा सप्तसिंधूंचें नांव धारण करीत. आपल्या आजच्या प्रांतांपैकीं सिंधु नदीच्या कांठचा एक प्रांत नि तेथील लोक हे थेट आजमितीपर्यंत तेंच नांव धारण करीत आहेत. सिंध नि सिंधू याच नांवांनीं ते अनुक्रमें संबोधिले जातात. ते आपले पूर्वज गंगा, विंध्य, गोदावरी ओलांडून धडाडीनें नि शौर्यानें वसाहती करीत-करीत नि विजय संपादीत ह्या हिंदुस्थानच्या दक्षिण नि पूर्व नि पश्चिम समीपर्यंत येऊन पोहोंचले. राजकीय, वांशिक नि सांस्कृतिक दृष्टीच्या संग्रहणाच्या, व्यवच्छेदनाच्या नि दृढीकरणाच्या प्रशंसनीय पद्धतीनें त्यांनीं सिंधूपासून पूर्वसमुद्रापर्यंतच्या नि हिमालयापासून दक्षिणसमुद्रापर्यंतच्या आपल्या ह्या भूमींतील प्रसरणाच्या क्रमांत संबंध आलेल्या वा झगडा झालेल्या यच्चयावत् इतर अनार्य लोकांना आत्मसात् करून सर्वांचें मिळून एक स्वतंत्र राष्ट्र बनविलें. शेवटीं एक धर्म, एक भाषा, एक संस्कृति, एक पितृभू नि एक पुण्यभू या समान बंधनांनीं बांधलें गेलेलें असें सर्वांचें मिळून राष्ट्रीय स्वरूपाचें स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचें निश्चित धोरण ठेवूनच राजकारण व

धर्म यांनीं त्या वेळीं परस्परांशीं स्पर्धा केली. 'चार धामां' चेंच उदाहरण पहा. बद्रिकेदार, द्वारका, रामेश्वर नि जगन्नाथ हीं आपल्या पुण्यभूमीच्या ठोकळ रीतीनें चतुःसीमा दाखविणारीं तीर्थक्षेत्रें त्या काळांतल्या शक्यतेप्रमाणें आपल्या पितृभूमीच्या चतुःसीमांशींहि उत्तम प्रकारें मिळतीं आहेत. तो पौराणिक काळ सोडल्यास आपल्या निश्चित इतिहासाच्या काळांतसुद्धां चंद्रगुप्त, मौर्य, द्वितीय चंद्रगुप्त, विक्रमादित्य, यशोवर्धन, पुलकेशी, श्रीहर्ष आणि असेंच इतर मोठमोठाले सम्राट नि चक्रवर्ती यांच्या केंद्रीभूत बलाढ्य साम्राज्यांनीं आपल्या लोकांची दृढता अधिकाधिक वाढविलीच असून त्यांना एका समान राजकीय नि राष्ट्रीय अस्तित्वाच्या प्रबळ चेतनेनें आंदोलित केलें आहे. एका समान संकटाच्या भयानें आपल्या लोकांना घाबरवून सोडणाऱ्या अशा ग्रीक, शक, हूण इत्यादींच्या प्रचंड स्वाऱ्या आणि त्या संकटाचा धुव्वा उडविण्याकरितां आपल्या लोकांना केव्हां–केव्हां शतकावरहि एकमुखानें करावी लागलेलीं महत्तर युद्धें यांच्या योगानें अंतर्गत भेदभाव असतांहि इतर अहिंदु राष्ट्रांच्या तोंडीस तोंड करणारें असें आपणहि एक स्वतंत्र राष्ट्र असल्याचें योग्य रीतीनें प्रकट होऊन आपल्या सांस्कृतिक, राजकीय, वांशिक नि धार्मिक एकत्वाविषयींची त्यांची जाणीव अधिकच संवर्धित झाली. हूणांवरील हिंदूंचा अंतिम विजय आणि मुसुलमानांची हिंदुस्थानावरील स्वारी यांच्यामध्यें बाहेरच्या राजकीय संकटापासून अबाधित असा जो शांततेचा प्रदीर्घ कालखंड गेला त्याचा प्रामुख्यानें आपल्या लोकांच्या पुढील दृढी करणाकडेच विनियोग झाला, आणि त्यांची धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक नि राजकीय एकता इतकी शास्त्रशुद्ध, निश्चित नि जागृत स्वरूपाची झालीं कीं मुसलमान येथें आले त्या वेळीं त्यांना हें हिंदुस्थान पूर्ण परिणत होत्सातें एकजिनसी हिंदुराष्ट्र म्हणून विलसत असलेलेंच आढळलें.

मुसल्मानी स्वाऱ्या व त्यांतूनच बनत गेलेलें दिल्ली येथील बलाढ्य मुसुल्मानी साम्राज्य यांच्या रेट्यामुळें तर काश्मीर ते रामेश्वर नि सिंध ते बंगालपर्यंतच्या हिंदूंचें राजकीय ऐक्य त्याहूनहि दृढतर झालें, आणि वैदिक सप्तसिंधूपासून निघालेलें 'हिंदु' हें नांव पृथ्वीराजाच्या काळापासून पुढें आपल्या जातीचें एक सन्मान्य नि प्रिय असें समान अभिधान होऊन राहिलें. आपल्या सहस्रों हुतात्म्यांनीं हिंदुधर्माचा मान राखण्याकरितां 'हिंदु' म्हणून

मरण कवटाळलें, सहस्रों सहस्र राज़े नि शेतकरी सर्वच ' हिंदु ' ह्या नात्यानें हिंदु ध्वजाखालीं एकत्र होऊन बंड करून उठले आणि आपल्या अहिंदु शत्रूंशीं लढले नि लढतां-लढतां कामास आले. शेवटीं शिवाजी महाराज जन्मास आले, हिंदु विजयाचा तास वाजला आणि मुसलमानी वर्चस्वाचा दिवस भरला. ' हिंदु ' ह्या एकाच नांवानें ' हिंदुध्वज ' या एकाच ध्वजाखालीं एकमेव हिंदु नेतृत्वाखालीं, ' हिंदुपदपादशाही'ची प्रस्थापना ह्या एकाच ध्येयानें आणि ' हिंदुस्थाना'चें राजकीय-बंधमोचन आपल्या समान मातृभूची नि पुण्यभूची दास्यमुक्ति हें एकच साध्य दृष्टीपुढें ठेवून प्रांतीं-प्रांतींचे हिंदू उठले आणि सरते शेवटीं मराठ्यांचें साम्राज्य मुसुलमानांच्या नबाबांना अन् निजामांना अन् बादशहांना नि पादशहांना शेंकडों रणक्षेत्रांवर फोडून काढण्यांत नि त्यांचे धुडके उडविण्यांत पूर्ण विजयी झालें. मराठे पूर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण चारी दिशांना जे विजय फडकावीत चालले ते मार्गांत तंजावर, गुंती, कोल्हापूर, बडोदे, धार, ग्वाल्हेर, इंदूर, झांशी अशा ठिकठिकाणीं उपराजधान्या स्थापीत थेट अटकेस जाऊन पोहोंचले. त्यांनीं दिल्लीसहि राज्य केलें आणि मुसुलमान मोंगल बादशहांना आपल्या शिबिरांत बंदिवान, निवृत्तभृतिक नि भिक्षेकरीहि करून ठेविलें. शीख हिंदूंनीं पंजाबांत, गुरखा हिंदूंनीं नेपाळांत, राजपूत हिंदूंनीं राजपुतान्यांत, आणि मराठा हिंदूंनीं दिल्लीं ते तंजावर नि द्वारका ते जगन्नाथ अशीं राज्यें गाजविलीं. अशा प्रकारें ते वैदिक सिंधू वाढतां-वाढतां बलाढ्य हिंदू लोकसमाज स्वतंत्र हिंदु राष्ट्र-'हिंदुपदपादशाही ' असें परिणत रूप पावलें. यांतला ' हिंदुपदपादशाही ' हा शब्द स्वतः पहिल्या बाजीरावानेंच योजलेला आहे. तें प्रचंड आंदोलन हिंदुत्वाच्या उत्कट जाणिवेनें नि अभिमानानें कसें पूर्ण भारलेलें होतें, पृथ्वीराज-प्रताप-शिवाजी-गुरुगोविंद-बंदा यांच्यापासून तों नाना फडणीस नि महादजी शिंदे यांच्या काळापर्यंतचे आपले सर्व हुतात्मे नि वीर नि विजते ' हिंदू ' ह्या नात्याच्या आपल्या राष्ट्रीय नि धार्मिक एकत्वांतच कसें भूषण नि अभिमान मानीत हें आपल्याला समजून नि पटवून घ्यावयाचें असेल तर एखादा अधिक चांगला ग्रंथ निघेपर्यंत तरी आपण ' हिंदुपद-पादशाही ' हें माझें ऐतिहासिक पुस्तक अवश्य वाचावें. येथील मर्यादित जागेमुळें मी केवळ निझामाकडील गोविंदराव काळे ह्या मराठा प्रतिनिधीनें अगदीं परवां-

परवां म्हणजे ख्रिस्ताब्द १७९३ त नाना फडणीसाला लिहिलेल्या एका पत्रांतील एक छेदकच उदाहरण म्हणून येथें उद्धृत करतों. म्हणजे त्यांच्याच शब्दांत त्यांचे विचार नि भावना आपल्या कानीं पडतील:—" अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्रापावेतों हिंदूंचें स्थान, तुर्कस्थान नव्हे ! हे आपली सीमा पांडवांपासून विक्रमाजितापावेतों त्यांनीं राखून उपभोग घेतला. त्यामागें राज्यकर्तें नादान निघाले, यवनांचें प्राबल्य झालें. परंतु आतां श्रीमंत पेशव्यांचे पुण्य-प्रतापें नि महादजी शिंद्यांचे बुद्धि नि तरवारीचे पराक्रमें सर्व घरास आलें. ज्यांनीं—ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचललीं त्यांचीं शिंद्यांनीं फोडलीं. यांत सार्वभौमत्व हातीं लागणें, यश कीर्ति यांचे नगारे वाजणें इतक्या गोष्टी आहेत."

आपल्या इतिहासांतील ह्या ओझरत्या दृष्टिक्षेपावरून आतां हें स्पष्ट झालें असेल कीं वैदिक काळापासून निदान ५००० ( पांच सहस्र ) वर्षें तरी आपले पूर्वज आपल्या लोकांचा धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक नि राजकीय एकजिनसीपणाचा स्वतंत्र गट घडवून आकारांत आणीत होते. ती सर्व क्रिया स्वाभाविक विकास पावतां-पावतां तिला जें परिणत फल आलें तें म्हणजेच वैदिक काळांतील त्या सिंधूंचेंच आज संबंध हिंदुस्थानभर पसरलेलें आणि हिंदुस्थानालाच आपली एकमेव पितृभू नि पुण्यभू मानीत असलेलें असें जें हिंदुराष्ट्र बनून राहिलें आहे तें होय. कदाचित् चिनी राष्ट्र वर्ज्य केल्यास जगांतील दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राला आपल्या हिंदु राष्ट्रासारखें आपल्या जीवनाचें नि विकासाचें इतकें अखंडित सातत्य अधिकारतां येणार नाहीं. हिंदु राष्ट्र हें कांहीं पावसाळ्यांतल्या कुत्र्याच्या छत्रीसारखें उगवलेलें नाहीं. तें एखाद्या समेटांतूनहि उत्पन्न झालेलें किंवा उत्पन्न केलेलें राष्ट्र नाहीं. तो कांहीं निव्वळ कागदाचा बनविलेला खेळ नव्हे. एखाद्या मालासारखें तें मागणीप्रमाणें कधीं घडविलेलेंच नव्हतें. किंवा तें म्हणजे परदेशांतली चालचलाऊ करून घेतलेली सोयहि पण नव्हे. तें ह्याच भूमींतून वर आलेलें आहे नि त्या भूमींतच खोल नि दूरवर त्याचीं मुळें पसरलेलीं आहेत. मुसलमानांचा किंवा जगांतील अन्य कोणाचा द्वेष करण्याकरितां म्हणून कांहींतरी हुडकून काढलेलें किंवा रचिलेलें तें थोतांड नाहीं. तर आपलीं उत्तर सीमा सांभाळणाऱ्या हिमालयाप्रमाणें एखादें भव्य नि भक्कम असें ते एका सत्य घटित आहे.

चिंता नाहीं कीं आपल्या ह्या राष्ट्रांत घरांतल्या घरांतच अनेक पंथ नि वर्ग आणि अनेक वैसदृश्यें नि भेद होते व आहेतहि. पण त्यांत विशेषसें तें काय ? कोणतें राष्ट्र खरोखर त्यापासून अलिप्त आहे ? कोणत्याहि राष्ट्राचें राष्ट्रत्व हें त्यांतील लोकांत आपापसांतले पोटभेद नि भिन्नभाव नाहींत यावरून मुळीं ठरविलेंच जात नसतें. तर त्या लोकांचें सामर्थ्यानें त्यांचें त्यांच्यातच इतर सर्व परकी राष्ट्रांपेक्षां अधिक असें जें एकजिनसी स्वरूपाचें एकत्व दिसून येत असतें त्यावरून आणि त्यांच्या आपापसांतल्या भेदापेक्षांहि त्यांची जगांतल्या इतर सर्व लोकांपासून जी ठळक नि फार मोठ्या प्रमाणांत भिन्नता असते तीमुळेंच त्यांचें स्वतंत्र राष्ट्रत्व ठरविण्यांत येत असतें. जगांतील राष्ट्रें ठरविणारी ही एकच एक कसोटी आहे. हिंदुंना एकच समान पितृभू नि एकच समान पुण्यभू असल्यामुळें आणि त्या दोन्हीहि वस्तू एकरूपच असल्यामुळें त्यांचें राष्ट्रत्व दुप्पट निश्चित आहे नि तें त्या कसोटीलाहि दुहेरीपणेंच चांगलें उतरतें. आपल्या इतिहासाच्या येथवर रेखाटलेल्या धांवत्या रूपरेषेच्या योगानें हें अचूक कळून येत आहे कीं सहस्रों वर्षें आपल्या हिंदु लोकांना स्वकीय असा एक स्वतंत्र लोकसमाज—स्वकीय असें एक राष्ट्र त्या नात्याच्या आपल्या धार्मिक नि सांस्कृतिक व राजकीय नि देशाभिमानात्मक अशा एकजिनसीपणाची निश्चित जाणीव होती. प्रस्तुत स्थलीं विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं थेट मराठी साम्राज्याचें पतन होईपर्यंत राजे, राष्ट्रभक्त कवी, महंत, राजकारणी अशा आपल्या सर्व लोकांनीं 'हिंदु राष्ट्रत्वाची' कल्पना वृद्धिंगत नि दृढ करण्याकरितां पूर्ण जाणिवेनें नि सतत झटून हिंदूंची भूमि या अर्थानें ज्याला ते 'हिंदुस्थान' म्हणत त्या या 'इंडियां'त प्रत्यक्ष '**हिंदुपदपादशाही**'—स्वतंत्र हिंदु साम्राज्य—स्थापण्याकरितां जिवापाड परिश्रम केले.

( ३ )

## 'हिंदी राष्ट्र' ह्या कल्पनेचा उदय

आपल्या हिंदु राष्ट्राच्या स्वाभाविक विकासाचा नि परिणतीचा मराठी साम्राज्याचें खिस्ताब्द १८१८ तील पतन नि त्यायोगेंच हिंदुस्थानांत ब्रिटिश

राज्याचें आगमन येथपर्यंतचा आढावा आपण येथवर घेतला. पंजाबांतील आपल्या शीख हिंदु राज्याचें पतनसुद्धां ब्रिटिशांना आपल्या सर्व देशभर अप्रतिहत वर्चस्व स्थापण्याला शक्तच करते झालें. जिंकण्याच्या क्रमांत लढावीं लागत असलेलीं सर्व घनघोर युद्धें हिंदु राजांशींच लढावीं लागत आहेत हें ब्रिटिशांना पूर्ण आढळून आलेलें होतें. राजकीय घटक ह्या नात्यानें मुसुल्मानांशीं त्यांना कोठेंच तोंड द्यावें लागलें नाहीं. राजकीय सत्ता ह्या नात्यानें मुसुल्मानांचा मराठ्यांनींच धुव्वा उडविला होता. एकच एक लढाई ब्रिटिशांना जी एकट्यानेंच अशी मुसुलमानांशीं द्यावी लागली ती प्लासीची तेवढीच होय. पण तें सुद्धां इतकें सोपें कर्म होतें कीं, ब्रिटिश सेनाधिकाऱ्यानें झोंपलेला असतांनाच ती जिंकली असें म्हणतात ! यामुळें अर्थातच ब्रिटिशांची पहिली चिंता हिंदु राष्ट्राच्या खालीं कसाहि पण सुरुंग भरलाच पाहिजे, त्यांची धार्मिक नि राजकीय गट ह्या दृष्टीची दृढता कशीहि पण फोडलीच पाहिजे हीच होती. मुसल्मानांचा ह्या रंगपटावरील प्रवेश हा ब्रिटिशांच्या हातांतलें त्यांचीच योजनाकृति रेखाटण्यास उपयोगी पडणारें केवळ एक सोईस्कर उपकरण किंवा साधन ह्या नात्यानेंच झाला. हिंदुस्थानांतील ख्रिस्ती धर्मप्रचारक संस्थांना राज्यसत्तेचा राजकीय पाठिंबा अर्थात् प्रत्यक्ष साहाय्य पुरवून हिंदूंना ख्रिस्ती करण्याचा उघड उपायहि ब्रिटिशांनीं चोखाळून पाहिला. परंतु ख्रिस्ताब्द १८५७ तील बव्हंशीं हिंदु नेत्यांनींच घडवून आणलेल्या क्रांति--उत्थानानें ब्रिटिशांचे डोळे उघडून हिंदूंच्या नि मुसुल्मानांच्याहि धर्मावर उघड हल्ला करण्यांत केवढी आपत्ति आहे तें चांगलेंच निदर्शनास आणल्यामुळें तेव्हांपासून ब्रिटिश राज्याचें ख्रिस्ती मंदिराला उघड साहाय्य देण्याचें बंद झालें. त्यानंतर हिंदुस्थानांत अराष्ट्रीय बनविणारी पाश्चिमात्य शिक्षणाची योजना प्रविष्ट करून हिंदु तरुणांच्या उगवत्या पिढीच्या मनांतील साक्षात् हिंदुराष्ट्राविषयींच्या कल्पनेखालींच सुरुंग लावण्याचें धोरण त्यांनीं चालू केलें. स्वतः मेकॉलेचेच उद्गार त्या विषयीं आपल्यापाशीं आहेत. आपल्या जांवयाला लिहिलेल्या एका घरगुती पत्रांतच—'आपली पाश्चिमात्य शिक्षणाची योजना चालू केल्यास हिंदु तरुणांना आपण होऊनच ख्रिस्ती होणें, अंतर्बाह्य पाश्चिमात्य बनणें आणि शेवटीं ब्रिटिश लोकांशीं संलग्न नि समरस होणें प्रिय वाटूं लागेल'—असें स्पष्ट दाखवून दिलें आहे. हिंदुंच्या

दुर्दैवानें त्यांच्या त्या अपेक्षा एकूण मुळींच विफल ठरल्या नाहींत: तर हिंदु तरुणांच्या ज्या पहिल्या–पहिल्या पिढ्यांनीं अधाशीपणानें तें पाश्चिमात्य शिक्षण घेतलें त्या सर्व हिंदुपणाच्या–हिंदुत्वाच्या पूर्वींच्या धक्क्यापासून खरोखरच तोडल्या गेल्या. हिंदु इतिहास, हिंदु धर्म, हिंदु संस्कृति यांविषयीं त्यांना जवळ-जवळ कांहींच माहित नाहींसें झालें : हिंदुत्वाविषयीं त्यांना जें काय माहित झालें किंवा माहित असे तें म्हणजे हिंदु असल्याविषयीं त्यांना लाज वाटायला लावतील अशा धूर्ततेनें त्यांची सारभूत तत्वें म्हणून बुद्धिपुरःसर दाखवून देण्यांत आलेलीं त्याचीं केवळ वैगुण्यें तेवढींच होत. उलटपक्षीं मुसुल्मानांना ह्या शिक्षणापासून एक हात दूर ठेवण्यांत आलें आणि त्यामुळें त्यांच्या जातीय दृढतेचा पाया तें मुळींच ढासळतें झालें नाहीं.

तथापि हिंदुस्थानांतला तो पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रवेश निर्भेळ अपायच असा ठरला नाहीं. त्याच्या मूळ पुरस्कर्त्यांच्या अपेक्षेविरुद्ध त्याचें उद्दिष्ट कार्य फोल ठरवून शेवटीं हिंदूंच्या सामर्थ्यांत भर पाडतील अशा कांहीं नवीन प्रेरणाहि त्याच्या योगानें लवकरच प्रचलित झाल्या. तथापि येथें आपण त्याच्या तात्कालिक परिणामांचाच तेवढा विचार करीत आहोंत.

आणि तो पाश्चिमात्य शिक्षणाचा तात्कालिक परिणाम असा घडून आलेला दिसला कीं त्या शिक्षणानें भारलेल्या हिंदूंच्या पहिल्या दोन पिढ्या समूळ वाहवल्याच, पाश्चिमात्य तें-तें सारेंच त्यांना प्रिय वाटूं लागलें. ब्रिटिश राज्य हें ईश्वरप्रेषितच मानूं लागल्या. त्यांनीं त्याच्या चिरस्थायित्वासाठींच प्रार्थना केल्या. पाश्चिमात्य वाङ्मय नि पाश्चिमात्य इतिहास यांनींच पुष्ट झाल्या-मुळें आणि हिंदु विचार ( तत्त्वज्ञान ) नि हिंदु राजनीति यांचा संबधच तोडला गेल्यामुळें साहजिकपणेंच त्यांनीं असा सुगम निर्णय ठाम करून टाकला कीं वैय्यक्तिक नि सामुदायिक जीवनांतल्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींतहि आपण पाश्चिमात्यांचें नि त्यांतहि विशेषें करून इंग्रजांचें अनुकरण करूं तरच आपल्या ह्या देशाचें खरेंखरें हित नि तारण होईल !

वर सांगितलेल्या या लोकांना सार्वजनिक कळकळ नव्हती किंवा ते बुद्धिमान नव्हते असें नाहीं. उलटपक्षीं आंग्लशिक्षित हिंदूंच्या या पहिल्या तुकड्यांतल्या लोकांना इंग्रजांकडून सामाजिक व सरकारी मान्यतेच्या उच्च

स्थानीं आरूढ होण्याची चांगलीच मोकळीक देण्यांत येऊन हिंदुस्थानांतील लोकांचे–' नेटिवां 'चे त्यांना बुद्धिपुरःसर प्रतिनिधी म्हणून लेखण्यांत आलें. त्यांनीं आपल्या ' देशी समाजा 'पुढें ब्रिटिश लोकांचीं स्तुतीस्तोत्रें गावींत आणि ब्रिटिश राज्याविषयींच्या आपल्या एकनिष्ठेचें प्रदर्शन करावें एवढ्याकारितां त्यांना प्रत्येक प्रकारची सुखसोय नि सवलत मिळून आपल्या लोकांवर प्रचंड वजन बसावितां येण्याची उत्तम व्यवस्था झाली. त्यांना स्वतःलासुद्धां त्यांच्या–त्यांच्या परीनें आपल्या लोकांचें नि आपल्या राष्ट्राचें हित करावें असेंच मनापासून वाटत होतें. परंतु त्या हिताविषयींची त्यांची कल्पना आणि आपलें राष्ट्र म्हणजे काय ह्या विषयींचेंहि त्यांचें मत हीं दोन्ही पूर्णपणें ब्रिटिश असून त्यांचा हिंदुस्थानांतील साक्षात् वस्तुस्थितीशीं कांहींच संबंध नसे.

आपल्या देशालाच साहाजिकपणें ते आपलें राष्ट्र म्हणून मानीत त्याचें तेंच कारण होय. त्यांच्या इतर सर्व कल्पना नि भावनांप्रमाणेंच त्यांची राष्ट्राभिमानाची कल्पनाहि आयती इंग्लंडहून वनून आलेली तीच उसनी घेतलेली असे. त्यांना असें आढळलें कीं इंग्रज हे राष्ट्राभिमान म्हणजे स्वतःच्या देशावरील–ते वसत असलेल्या भौगोलिक भूपरिणामावरील भक्तिच समजतात. इंग्लंडमध्यें जे–जे राहतात त्या सर्वांचेंच मिळून धर्म, वंश, संस्कृति इत्यादि-निरपेक्ष असें एक संयुक्त राष्ट्र झालें आहे आणि म्हणूनच इंग्लंड हें भक्कम नि बलिष्ठ राष्ट्र बनलें आहें असाच त्यांचा समज असे. ही त्यांची तुलना जितकी आकर्षक तितकीच सोपीहि पण होती. अर्थात् आपल्यालासुद्धां जर वंश, धर्म, संस्कृति, जाती, पंथ यांच्या निरपेक्ष असें हिंदुस्थानचें एकीकरण करतां आलें तर आपले लोकसुद्धां भक्कम नि बलिष्ठ अशा ' हिंदी राष्ट्रा 'च्या प्रतिष्ठेला पोंहोंचतील असें त्यांना वाटे. तत्कालीन यूरोपांतही राष्ट्रीय परिणाम म्हणजे प्रादेशिक परिणामच समजत असल्याचें त्यांना दिसून आलें. फ्रान्स ह्या प्रादेशिक परिमाणांत जे वास्तव्य करून राहिले ते सारे फ्रेंच, जर्मनींत राहिले ते जर्मन, स्पेनमध्यें राहिले ते स्पॅनिश, इंग्लंडमध्यें राहिले ते इंग्लिश आणि ह्याच अनुक्रमानें प्रत्येक देशांतील लोकांचें तें–तें लोकराष्ट्र समजलें जाई. त्यावरून त्यांना वाटलें, किंवहुना विचार न करतांच ते निश्चित धरून चालले, कीं प्रादेशिक एकता एवढा एकच बंध, एकाच भौगोलिक परिमाणांत वास्तव्य करणें एवढी एकच गोष्ट त्या त्या

लोकांना स्वतंत्र राष्ट्र ठरविण्यास सर्वांत अगत्याची होय—नव्हे तीच एक अगत्य घटकभूत होय.

" ठीक ! तर मग हिंदुस्थानांतले हिंदु, मुसुल्मान, ख्रिस्ती, पारसी इत्यादि सर्व लोक हिंदुस्थान नांवाच्या प्रादेशिक परिमाणांत अनेक शतकें एकत्र वसत आले आहेत. अर्थात् हे सर्व लोक म्हणजे स्वयमेव एक राष्ट्रच असले पाहिजेत. धर्म, भाषा, संस्कृति, वंश आणि ऐतिहासिक विकास या गोष्टींत त्यांच्यांत भिन्नता असली म्हणून काय झालें ? एकराष्ट्रत्वाशीं या गोष्टींचा कांहींच संबंध नाहीं. प्रादेशिक एकता, एक समान देश, हाच तो एकराष्ट्रत्व सिद्ध व पुष्ट करण्यास आवश्यक असा पाया होय. प्रादेशिक परिमाण हेंच राष्ट्रत्वाचेंहि परिमाण असलें पाहिजे. इंग्लंडकडे पाहा, फ्रान्सकडे पाहा, अमेरिकेकडे पाहा. "— असें त्यांचें समर्थन असे.

ह्या गृहीतकृत्यापासून निघणारा उपसिद्धान्तहि अपरिहार्यच होता. हिंदुस्थान हा एक प्रादेशिक परिमाग असल्यामुळें व देश ह्या संज्ञेलाहि पात्र असल्यामुळें जर तो राष्ट्रीय परिमाणहि असलाच पाहिजे, तर आपण सर्व केवळ ' हिंदी ' च असलों किंवा झालों पाहिजे आणि हिंदु किंवा मुसलमान अथवा ख्रिस्ती किंवा पारसी असण्याचें बंद झालें पाहिजे. अर्थात आंग्लशिक्षित लोकांच्या त्या पहिल्या पिढ्यांच्या पुढाऱ्यांनीं स्वतः बहुतेक सर्व हिंदु असतांहि हिंदु असण्याचें सोडून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला आणि हिंदु नि मुसल्मान अशा भेदांची जाणीव सुद्धां ठेवणें हीन प्रतिष्ठेचें मानून ते एकदम ' हिंदी देशभक्त ' च मात्र बनले.

हिंदु असण्याचें सोडून देणें त्यांना अतिशय सोपेंहि गेलें. त्यांना दुसरें कोणतेंच शिक्षण मिळालेलें नव्हतें, आणि जें पाश्चिमात्य शिक्षण त्यांना मिळालें होतें त्यानें त्यांना ' हिंदुत्व ' म्हणजे ' हिंदुवादा ' ( —हिंदुइझम्— ) व्यतिरिक्त दुसरें कांहींच नसून त्याचा अर्थहि निव्वळ भ्रामक समजुतींचा एक जुडगा हाच होय एवढेंच शिकविलें होतें. थोडेसें थांबण्याचा आणि वांशिक, सांस्कृतिक नि ऐतिहासिक अशा सर्व ठेवणींसह हिंदुत्वाच्या हिंदुपणाच्या इतर नि सर्वांत मूलभूत अशा विषयांसंबंधीं विचार करण्याचा त्यांना प्रसंगच कधीं आला नाहीं.

त्यांना स्वतःला ज्या अर्थी आपला हिंदुपणा सोडून देणें व आपण हिंदी नि केवळ हिंदीच असल्याच्या विचारांत निमग्न होणें सोपें असल्याचें आढळून आलें, त्या अर्थी मुसलमानांनाहि आपण मुसलमान असल्याचें विसरणें व हिंदी लोकांत–हिंदी राष्ट्रांत पूर्णांशांनीं मिसळून जाणें तितकेंच सोपें वाटेल अशी त्यांची अपेक्षा होती. ती गोष्ट त्या ' हिंदी ' देशभक्तांना हिंदुस्थान ह्या प्रादेशिक परिमाणाप्रमाणें आधींच ठरून गेली असल्यासारखी वाटत होती.

येथें हें सांगणें आवश्यक आहे कीं आमची ही सारी टीका केवळ सामुदायिक अर्थानेंच लागू आहे. वैयक्तिक वा कृतिविषयक सविस्तर नि सापवाद ऊहापोह करणें ह्या मर्यादित स्थळीं भाषणांत शक्य नाहीं.

तें पाश्चिमात्य शिक्षण हिंदुमध्यें जसजसें झपाट्यानें पसरत चाललें, तसतशी ' हिंदी राष्ट्रत्वा'च्या कल्पनेलाहि अनुयायांची अधिकाधिक मोठी संख्या मिळण्याचें चालूच राहिलें. अर्थात् त्याच्या उलट हिंदुंचा हिंदु ह्या नात्यानें राजकीय परिमाणाच्या नात्यानें, स्वयमेव राष्ट्र ह्या नात्यानें असणारा एकजिनसीपणा अधिकाधिक क्षीण--क्षीण होत चालला आणि शेवटीं निव्वळ अनास्थारूपी उपासमारीमुळें त्याला स्वतःची शुद्धिच राहिली नाहीं.

परिस्थितीला मिळालेल्या ह्या कलाटणीमुळें ब्रिटिशांना मनांतून फार आनंद झाला. अशा स्थितींत हिंदु राष्ट्राच्या राजकीय जाणिवेचें पुनरुज्जीवन व हिंदु सार्वभौमत्वाच्या ध्येयाचा पुनरुदय होईल तर त्यापासूनच काय तें आपल्या राजकीय वर्चस्वाला धोका येण्याचें भय आहे हें ब्रिटिश लोक पूर्णपणें जाणून होते. आपण हिंदु असल्याचा राजकीय दृष्ट्याहि अभिमान वाटणारा हिंदु ख्रिस्ताब्द १८५७ नंतरहि संशयास्पद मनुष्य म्हणून समजला जात असे हें सत्य आहे. कारण तो आपल्या हिंदु राज्याच्या हानीविषयीं नित्य चिंतन करी आणि म्हणूनच प्राथमिक क्रांतिकारक म्हणून त्याच्यावर पाळत ठेविली जाई. १८५७ तल्या क्रांतियुद्धांतील पराभवानंतरहि पंजाबांत रामसिंग कुका आणि महाराष्ट्रांत वासुदेव बळवंत फडके यांनीं केलेल्या सशस्त्र उत्थानांच्या योगानें ब्रिटिशांना येत असलेला तो संशय केवळ निश्चितच झाला.

शिवाजीच्या प्रमाणें स्वतंत्र हिंदु राज्याचें पुनरुज्जीवन करण्याच्या आकांक्षेनें वासुदेव बळवंत फडके ह्यानीं केलेलें उत्थान मोडून काढलें गेल्यानंतर तात्का-

ळच ' हिंदी राष्ट्रीय' सभेचा अर्थात् काँग्रेसचा जन्म झाला. येथें हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे कीं ब्रिटिश सरकार त्या चळवळीला अनुकूल होतें आणि एका व्हाइसरॉयनेंच ती आत्मीयभावानें पुरस्कारिली होती. ह्यूम, वेडरबर्न इत्यादीं सारख्या अनेक प्रमुख ब्रिटिश सनदी नोकरांकडेच ( —सिव्हिलियनांकडेच— ) वरींच वर्षें तिचें नेतृत्व चालू होतें. मोठमोठाल्या हिंदु पुढाऱ्यांनीं अत्यंतिक लोकहितबुद्धीनें प्रेरित होऊन तिची जोपासना केली आणि त्यामुळेंच ' हिंदी ' देशभक्तीच्या त्या नव्या संप्रदायाची ती संघटित नि अधिकृत प्रातिनिधि बनली.

ब्रिटिश हे ज्या अर्थी हिंदुराष्ट्राभिमानाच्या संभाव्य पुनरुज्जीवनावरील तोडगा ह्या हिंदी चळवळीला अनुकूलच होते, त्या अर्थी ह्या नात्याचा एकजिनसीपणा बाधित होणार नाहीं अशी काळजीहि ते ( ब्रिटिश ) दक्षतेनें घेतच होते. कारण मुसलमानसुद्धां जर त्या संप्रदायांत हिंदूंप्रमाणें पूर्ण मनोभावानें जाऊन मिळाले तर खरोखरीचेंच संयुक्त हिंदी राष्ट्र अस्तित्वांत येईल आणि ती घटना हिंदुस्थानांतील ब्रिटिश वर्चस्वाला हिंदुंच्या एकाकी पुनरुज्जीवनापेक्षांहि कदाचित् अधिक घातक ठरेल हें ब्रिटिश लोक पुरेपूर जाणून होते. हिंदीराष्ट्राभिमानाच्या खऱ्या, प्रामाणिक नि फलदायी उदयाची हिंदु-राष्ट्राभिमानाच्या पुनरुज्जीवनाहून अधिक नसली तरी तितकी तरी ब्रिटिशाना भीति वाटत होती व ते त्याचा द्वेष करीत होते. त्यामुळें एकीकडून त्यांनीं ' हिंदु राष्ट्रा 'विषयीं मुसल्मानांच्या ठिकाणीं असलेल्या माथेफिरूपणाच्या द्वेषाला, वैराला नि अविश्वासाला चोरून उत्तेजन नि साहाय्य देऊन कोणत्याहि प्रकारचें खरें हिंदी राष्ट्रीय ऐक्य मृगजळाप्रमाणें भ्रामक करून टाकलें, आणि दुसरीकडून एकजिनसी हिंदुराष्ट्राच्या उदयाचा विचार व्यावहारिक राजकारणाच्या कक्षेबाहेरच राहावा याकरितां हिंदूंना मात्र निदान प्रारंभीं तरी त्या 'हिंदी राष्ट्रवाद ' रूपी मृगजळाच्या मागें हांवरेपणानें धांव घेण्याला प्रोत्साहन दिलें. अर्थात ' हिंदी राष्ट्रवादा ' ला उत्तेजन देण्याच्या ब्रिटिशांच्या त्या धोरणाचे परिणाम आरंभीं–आरंभीं त्यांच्या अपेक्षा मुळींच पूर्ण करणारे नव्हते व त्यामुळें पुढें त्यांना तें धोरण पालटावें लागलें ही गोष्ट निराळी. परंतु त्यावरून मीं वर निर्देशिलेली गोष्ट खोटी ठरत नाहीं.

## ( ४ )

# ‘ हिंदी राष्ट्रवादा’चें ध्येय

सर्व हिंदुस्थानची एकजूट करून एक सुसंघटित असें राजकीय परिमाण बनविण्याच्या ध्येयांत हिंदूंना आक्षेपार्ह असें कांहींच आढळलें नाहीं, आणि तें अगदीं साहजिक होतें. कारण नित्य विश्वव्यापक दृष्टीनें तत्त्वविचार करणाऱ्या व संग्रहाकडेच कल असलेल्या हिंदूंच्या मनोवृत्तींशीं तें उत्तम मिळतेंच होतें. हेंहि खरेंच आहे कीं एकच मानवी राज्य, सर्व मनुष्यजात हे त्यांतील नागरिक, नि पृथ्वी ही त्यांची मातृभूमि असेंच ध्येय राजकारणाचें असावयास पाहिजे. अखिल मानवजातीच्या एक पंचमांशानें वसलेला हा सर्व हिंदुस्थान धार्मिक, वांशिक, नि सांस्कृतिक भिन्नभावांचा विचार न करतां त्या सर्वांना एका एकजिनसी गटांत बुडवून एक झाला तर तें सर्वमानवी राजकीय ध्येय प्रत्यक्ष गांठण्याच्या दिशेनें मानवजातीनें एक राक्षसीच पाऊल टाकलें असें होईल. ह्या कल्पनेच्या ध्येयात्मक भापेपुरता नि चित्रापुरताच विचार केला तर ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ’—हें सर्व केवळ एक नि अविभाज्य ब्रह्म आहे ’ असें धार्मिक नि सांस्कृतिक तत्त्वज्ञान प्रतिपादणाऱ्या हिंदूंसारख्या लोकांना तें आकर्षक वाटल्यावांचुन कसें राहावें ? परंतु त्या ब्रह्माला तत्त्वज्ञानाच्या दृष्टीप्रमाणें राजकीय दृष्टीनेंहि ‘ माया ’ ह्या विभाजक तत्त्वाचें दुसरेंहि अंग आहे. पण त्या ध्येयाविषयींच्या उत्साहभरांत त्या हिंदु देशभक्तांचे त्याच गोष्टीकडे नेमकें दुर्लक्ष्य झालें ! जर सर्व हिंदुस्थान एक झाला !—होय, पण त्या ‘ जर ’ नेंच सर्वांत मोठा घोंटाळा केला ! ‘ हिंदी राष्ट्र’ ही नवी कल्पना हिंदुस्थानच्या प्रादेशिक परिमाणाच्या एकाच समान बंधावर उभारलेली होती. एकजात कोणाच हिंदूंना त्यांच्या अत्युत्कट अशा धर्मविषयक वा संस्कृतिविषयक वा वंशविषयक भावनांना विरोधी असें त्या गृहीत कल्पनेंत कांहींच आढळलें नाहीं. कारण त्याचें राष्ट्रीय अस्तित्व हिंदुस्थान ह्या प्रादेशिक परिमाणाशीं पूर्वींच एकरूप होऊन गेलेलें होतें. हिंदुस्थान ही त्यांची केवळ निवासभूमीच नव्हती, तर साक्षात घरच, पितृभूच, मातृभूच आणि एकमेव पुण्यभूहि होती ! ‘ हिंदी देशभक्ति ’ हा त्यांना ‘ हिंदु राष्ट्रभक्ती ” चाच केवळ

एक दुसरा पर्यायशब्द होता. प्रादेशिक परिमाणसुद्धां त्याच्या वांशिक, धार्मिक नि सांस्कृतिक परिमाणाशीं इतकें पुर्णत्वानें एकरूप झालेलें होतें कीं, त्यांच्या दृष्टीनें ' हिंदी राष्ट्र ' ही ' हिंदु राष्ट्रा ' चीच केवळ प्रादेशिक संज्ञा होती. हिंदुस्थानाला ' हिंदुस्थान ' ( –इंडिया-- ) म्हणून संबोधिलें तरी तो ' हिंदुस्थान ' च राहिला असता, तत्त्वतः त्याच्यांत कांहींच अंतर पडलें नसतें, आणि म्हणून व्यवहाराकरितां ती गोष्ट दुर्लक्षिलीहि गेली असती.

पाश्चिमात्य शिक्षणांत पारंगत असतांनाहि जे हिंदुपणाच्या भावनेनें रसरसत होते असे ते हिंदु पुढारीसुद्धां पुढें–पुढें आपण धर्मानें, वंशानें नि संस्कृतीनें हिंदु असल्याविषयीं जे अभिमान धरूं लागले, त्या हिंदी राष्ट्रीय चळवळीला जे मिळते झाले, अंतःकरणपूर्वक कॉंग्रेसच्या कार्यांत जे सहभागी झाले, आणि हिंदुस्थानांतील इतर अहिंदु अल्पसंख्याकांशीं न्याय्य पायावर नि सन्मान्य सहवासी म्हणून समानता राखणारें असें खरें हिंदी संयुक्त राज्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें ब्रिटिश सरकारच्या हातून राजकीय सत्ता हिसकावून घेण्याकरितां चिकाटीनें झगडणारी अशी संपूर्ण राजकीय संस्थाच जोंपर्यंत ती होती तोंपर्यंत तिचें नेतृत्वहि त्यांनीं जें चालविलें, त्या सर्वांचें मीं वर सांगितलें आहे तेंच कारण होय.

परंतु जरी सर्व हिंदू संशयरहित उत्साहानें त्या ' हिंदी राष्ट्रीय सभे'च्या भोंवतीं गोळा झाले आणि तिच्या बुडाशीं असलेल्या प्रादेशिक राष्ट्रत्वाच्या तत्त्वाला जरी ज्यांनीं आपली प्रामाणिक निष्ठा अर्पिली, तरी हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या गळीं उतरण्याच्या संबंधांत तें तत्त्व अत्यंत अपेशीच झाल्याचें दिसून आलें. त्यांचा संबंध समाज पहिल्यापासूनच तिच्यापासून पाय मागें घेऊन होता आणि पुढें-पुढें तर तो तिच्यावर पुरा संतप्तच होऊं लागला. कशाहि रीतीनें राजकीय एक गट बनविण्याकरितां आपापलें वांशिक व धार्मिक व्यक्तित्व ' हिंदी राष्ट्रांत विलीन करण्याविषयींची मागणी सर्व हिंदी लोकांना कॉंग्रेसकडून जसजशी अधिकाधिक आग्रहानें होऊं लागली तसतसे मुसुल्मान अधिकाधिकच अविश्वासू नि अनावर होत चालले. कारण ' हिंदी देशभक्ती'ची कॉंग्रेसनें जी व्याख्या केली होती तिच्या योगानें त्यांच्या वांशिक, धार्मिक नि सांस्कृतिक आकांक्षांचे प्राण सर्वस्वच असणाऱ्या त्यांच्या मुसल्मानी राष्ट्राभिमानाल

प्रणांतिक टोला बसणार असें त्यांना स्वभावतःच वाटत होतें. ब्रिटिश सरकारनें उद्दिष्ट साधण्याकरितां त्यांच्या त्या कॅांग्रेसविरोधक प्रवृत्तीला उत्तेजनच दिलें. आपल्या हिंदु देशभक्तांच्या चिकाटीच्या प्रयत्नांनीं कॅांग्रेसचें राजकीय महत्त्व जों--जों अधिकाधिक वाढत चाललें, तिच्या मागण्या जसजशा अधिकाधिकं आग्रहाच्या होत चालल्या, व त्या मागण्यांचा पाठपुरावा करण्याची तिची शक्तिहि जसजशी प्रबलतर होत चालली, तों–तों अन् तसतसा मुसलमानांचा विरोध तिला अधिकाधिक स्पष्ट शद्बांत व निश्चित होऊं लागला आणि 'हिंदी राष्ट्रीय सभे' ची चळवळ निर्माण करण्यांतलें धोरण सरतेशेवटीं पुरतें अपेशी होऊन आपल्या अपेक्षा फार मोट्या प्रमाणांत फोल ठरल्या असल्याचें पटून–निराश झालेल्या ब्रिटिश सरकारला पटून—तें निराश झालें होतें. ब्रिटिश सरकारचेंहि त्यांना अधिकाधिक आग्रहाचें उत्तेजन नि अधिकाधिक चोरून असें साहाय्य मिळत गेलें.

'हिंदी राष्ट्रीय सभे' च्या चळवळीपासून हिंदु दृष्टीनेंहि आपणां हिंदूंना जे लाभ झाले आहेत ते न ओळखणारा मनुष्य मीं मुळींच नाहीं. मूळचा तसा विशिष्ट उद्देश नसतांनासुद्धां केवळ आपाततःच असलें, तरी पण प्रांतिक, भाषिक नि पंथविशिष्ट कुढेपणा, भेद नि भिन्नत्व घांसून काढून सबंध हिंदुजगाचें सामर्थ्यानें दृढीकरण घडवून आणण्यांत तिनें फार मोठा भाग घेतला आहे, एक सार्वजनिक राजकीय पीठ तिनें त्यांना पुरविलें आहे, संयुक्त व मध्यवर्ती राज्याच्या निश्चित ध्येयासह समान राष्ट्रीय अस्तित्वाच्या जाणिवेनें तिनें त्यांना सचेतनहि केलें आहे. जे दोष मध्यें घुसले असतील ते काढून सुधारतां येतील, पण जें चांगलें निष्पन्न झालें आहे तें नाकारण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानांत चालू करण्यांत आलेल्या पाश्चिमात्य शिक्षणाच्या नांवानेंहि मीं खडे फोडीत नाहीं. तें येथें चालू करण्यांतले ब्रिटिशांचे हेतू जरी कितीहि शंकनीय असले, तरी सरतेशेवटीं आपण हिंदू तो डाव उलटविण्यांत यशस्वीच झालों असून पश्चिमेशीं आपल्या त्यायोगें आलेल्या संबंधापासून आपला लाभ व हितच झाल्याचें दाखवितां येण्याच्या स्थितींत सध्यां आहों.

तथापि पश्चिमेशीं आलेल्या आपल्या संबंधापासून व सरकारी विश्वविद्यालयांतील इंग्रजी शिक्षणाच्या पुनरुज्जीवनापासून आपण हिंदूंनीं मिळविलेला लाभ

ही ज्याप्रमाणें ब्रिटिश सरकारच्या दुष्ट हेतूंना न जुमानतां मिळविलेला होता, तद्वतच आपल्या हिंदुराष्ट्राच्या पुढील दृढीकरणाच्या रूपानेंहि जें हित आपणां हिंदूंचें झालें तेंसुद्धां 'हिंदी राष्ट्रत्वा' च्या त्या नव्या संप्रदायाच्या किंवा 'हिंदी राष्ट्रीय सभे' च्या घोषित उद्देशाच्या बळावर झालेलें नाहीं, तर हिंदू ह्या नात्याची आपली वांशिक व धार्मिक जाणीव दडपून टाकण्याच्या तिच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रयत्नांना न जुमानतांच तें झालेलें आहे. प्रादेशिक देशभक्तांना आम्हीं हिंदु असण्याचें निदान राष्ट्रीय व राजकीय गट ह्या नात्यानें तरी बंद होणेंच पाहिजे होतें. त्यांच्यांतल्या कांहींना तर आपण हिंदु असल्याचें नाकारण्यांतच साक्षात् भूषण वाटलें. ते केवळ 'हिंदी' (–'इंडियन'–) होते; तसें करण्यांत आपण देशभक्तीचें एक मोठेंच उदाहरण घालून देत आहों असें मानून त्यायोगें मुसुलमानांनासुद्धां त्यांचें जातीय अस्तित्व सोडून देण्याविषयीं व त्या प्रादेशिक हिंदी राष्ट्रांमध्यें नामनिर्देशातीत रीतीनें विलीन होण्याविषयीं आपण वळवूं अशी त्यांची कल्पना बांधली !

परंतु मुसुलमान हे आधींहि मुसुलमान नि अंतींहि मुसुलमानच राहिले, 'हिंदी' केव्हांच झाले नाहींत ! भुरळ पडलेले हिंदू लाखोंनीं बंदिगृहांत जाऊन सहस्रांनीं आंदमानला जाऊन आणि शेंकडोंनीं फासांवर जाऊन सर्व 'हिंदी' लोकांसाठीं समान राजकीय अधिकार हिसकून घेण्याच्या हेतूनें ब्रिटिशांशीं झगडत होते तोंपर्यंत ते तटावरच निव्वळ मौज पाहात राहिले ! परंतु एकी-कडून कॉंग्रेसनिष्ठ हिंदूंनीं चालविलेली निःशस्त्र चळवळ आणि दुसरीकडून कॉंग्रेस-बाहेरील सशस्त्र हिंदु क्रांतिकारकांनीं चालविलेला अधिक भयंकर नि अधिक परिणामकारक असा प्राणपणाचा झगडा यांनीं ब्रिटिश सरकारवर पुरेसें दडपण आणून हिंदी लोकांच्या हातीं कांहींतरी भरींव राजकीय सत्ता देणें भाग पाडतांक्षणींच मात्र मुसुलमान पटापट त्या तटावरून उड्या टाकून धांवत आले आणि–"आम्हीं हिंदी आहों, आम्हाला आमचा प्राप्त वाटा पुरेपुर पाहिजे" –असा अधिकार सांगू लागले ! ! शेवटीं गोष्टी अशा थरावर आल्या कीं साक्षात् 'मुस्लीम लीग' सारख्या प्रतिनिधीभूत मुसुलमानी संस्थेकडूनच हिंदुस्था-नाचीं मुसुलमानी हिंदुस्थान व हिंदु हिंदुस्थान अशी दोन छकलें करण्याची सूचना निर्लज्जपणें पुढें करण्यांत आली आणि हिंदु विरुद्ध अहिंदी मुसुलमानी

राष्ट्राशींहि संगनमत करण्याची सिद्धता उघडपणें घोषित करण्यांत आली! अत्यंत शुद्ध हेतूनें पण विवेकशून्य श्रद्धेनें नि आंधळ्या धोरणानें धर्म, जाती नि संस्कृती यांनीं निरपेक्ष व केवळ प्रादेशिक एकतेच्या एकाच समान बंधावर आधारलेलें असें सर्व हिंदी लोकांचें मिळून एकच अविभक्त नि अविभाज्य हिंदी राष्ट्र बनविण्याकरितां ज्यांनीं अट्टाहासपूर्वक परिश्रम केले त्या उपर्युक्त हिंदु लहान लहान देशभक्तांच्या सर्व आशांचें हें असें शोचनीय भवितव्य होतें!

तर मग संयुक्त हिंदी राष्ट्रांत मुसुलमानांनीं आपण विलीन होण्याला अनुकूल व्हावें याकरितां त्यांची आराधना करण्याचा, कांहीं झालें तरी प्रथम हिंदी व नंतर मुसुलमान असण्याकरितां त्यांना वळविण्याचा कॉंग्रेसनें गेलीं पूरेपुर ५० (पन्नास) वर्षें चालविलेल्या सर्व प्रयत्नांना जें दारुण अपेश आलें त्याचें मूल कारण कोणतें? एक संयुक्त हिंदी राष्ट्र बनविणें मुसुलमानांनाहि रुचत नाहीं किंवा नको आहे असें नाहीं. परंतु, ऐक्याविषयींचा अर्थात् हिंदुस्थानच्या राष्ट्रीय ऐक्याविषयींची त्यांची कल्पना त्यांच्या प्रादेशिक एकतेवर मात्र मुळींच आधारलेलीं नाहीं. जर कोणा मुसुलमानानें आपलें खरें हृद्गत तेंहि शक्य तितक्या स्पष्ट शब्दांनीं आजवर प्रकट केलें असेल तर तें मोपल्यांच्या बंडाचा पुढारी अल्ली मुसालियार यानेंच होय. सहस्रावधि हिंदूंना बलात्कारानें बाटविण्याच्या किंवा पुरुष-स्त्रिया-मुलें सर्वांनाच एकदम खड्गाला बळी देण्याच्या आपल्या अत्याचारांच्या कांडांचें समर्थन करतांना त्यानें असेंच घोषित केलें कीं, सर्व हिंदुस्थान एक होऊन एकराष्ट्र बनला पाहिजे आणि त्याकरितां टिकाऊ असें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्याचा एकच एक अनन्य मार्ग म्हणजे सर्व हिंदुंनीं मुसलमान होणें हाच आहे. जे हिंदु तसें करण्याचें नाकारतील ते हिंदी ऐक्याच्या कार्याचे द्रोही होत व ते मरणालाच पात्र होत!! खोटा वेदांती नसलेला अल्ली मुसालियार हा खणखणीतपणें आपल्या खऱ्या त्या मूळ भाषेंतच बोलला; महमदअल्ली व इतर कांहींजण यांच्यासारख्या शिष्टाचारी मुसुलमानांची भाषा सुसंस्कृत लॅटिन नि ग्रीक अशी असते इतकेंच, पण सर्वांचा मथितार्थ एकच. अर्थात् प्रादेशिक एकता नव्हे, तर धार्मिक, वांशिक नि सांस्कृतिक एकता हीच राष्ट्रीय एकमान घडविण्याच्या

कार्यांत खरी महत्वाची होय. हें नेमकें ओळखण्याला कॉंग्रेस चुकली आणि तेंच तिच्या या संबंधातल्या अपयशाचें मूळ कारण होय.

( ५ )

# प्रादेशिक एकतेचा प्रश्न

राष्ट्रांच्या घडणींत प्रादेशिक एकता अर्थात् एकच समान निवासभूमि असणें ह्या गोष्टीपेक्षांहि धार्मीक, वांशिक, सांस्कृतिक नि ऐतिहासिक आप्तसंबंधाचेंच केवढें तरी मोठें महत्त्व असतें ह्या मूलभूत सामाजिक नि राजकीय तत्त्वाकडे दुर्लक्ष्य करण्याची कॉंग्रेसनें प्रारंभींच फार भयंकर अशी चूक केली. प्रादेशिक एकता हा सुद्धां त्या घटकातलाच एक घटक असतो, पण बहुधा सर्वच ठिकाणीं तो एकच एक घटक मात्र होऊं शकत नाहीं. इंग्लंड व इतर कांहीं युरोपियन यांचीं उदाहरणें घ्या. या उदाहरणांनींच ' हिंदी राष्ट्रीय सभे ' च्या हिंदु संस्थापकांना चुकीच्या मार्गावर नेलें. इंग्लंड आज जें एक एकजिनसी राष्ट्र बनलेलें दिसत आहे तें कांहीं तें एक अगदीं तंतोतंत असें प्रादेशिक परिमाण आहे ह्या एकाच कारणामुळें नव्हे. तेथील लोकांचा प्रादेशिक राष्ट्राभिमान हें कांहीं कारण नाहीं, तर तो त्यांच्या इतर सामाजिक व राजकीय आप्तसंबंधाचें कार्य अर्थात् परिणाम आहे. उदाहरणार्थ, इंग्लंड हें पूर्वीच्या काळींहि असेंच तंतोतंत प्रादेशिक परिमाण होतें. परंतु जेव्हां जिव्हाळ्याच्या धर्मभावना अतिशय खवळल्या तेव्हां आंग्ल कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट यांना आपण आपल्या आंतील देशबांधवांपेक्षां अनुक्रमें आपापल्या बाह्यदेशीय परधर्मीयांकडेच अधिक ओढले जात असल्याचा अनुभव आला. आंग्ल कॅथॉलिकांनीं इंग्लंडमधील आपल्या आंग्लच, पण प्रॉटेस्टंटांनीं रोमन कॅथॉलिक मताच्या आंग्ल राजाच्या स्थलीं हॉलंडमधून वुइल्यमलाच आपल्यावर राज्य करण्याकरितां पाचारण केलें. तशीच हॉलंडचीहि गोष्ट पाहा. हॉलंडचे लोक हे त्यांनीं प्रादेशिक एकता असूनसुद्धां आपल्या इतिहासांतील धार्मिक भागाच्या अभिमानानें प्रेरित झाल्यामुळें एकजिनसी राष्ट्र ह्या नात्यानें ते एक होऊं शकले नाहींत. तेथील कॅथॉलिक हॉलंडर

हें आपल्या स्वतःच्याच प्रॉटेस्टंट असलेल्या वुइल्यम ऑफ ऑरेंज ह्या राजाविरुद्ध स्पेनला मिळाले. ऑस्ट्रिया–हंगेरीचेंहि उदाहरण घ्या. तेथील लोकांना प्रादेशिक रीत्या विभागणारी कोणतीच ठळक गोष्ट नव्हती. ते सर्वजण एकत्रित होऊन त्यांचें एक साम्राज्यच बनलेलें होतें, आणि एकाच शासनाखालीं ते एक स्वतंत्र राजकीय गट म्हणून कित्येक शतकें नांदलेहि; परंतु त्यांच्या अंतःकरणांतून त्यांना परस्परां-कडे ओढणारे असे वांशिक, सांस्कृतिक, भाषिक वा ऐतिहासिक स्वरूपाचे कोणतेच आप्तबंध नव्हते. त्यायोगें अनुकूल संधि प्राप्त होतांच त्यांचें राष्ट्रीय नि राजकीय ऐक्य तात्काळ फुटलेंच.

अथवा असेंहि म्हणतां येणार नाहीं कीं— “ अहो ! ही तुमची वांशिक नि धार्मिक प्रौढी ही आतां कधींच गतकाळांतली गोष्ट होऊन गेलेली आहे ! त्यानंतर जग आतां अधिक शहाणें झालें आहे ! कोणताहि अद्ययावत् मनुष्य आजकाल त्यांच्याकडे ढुंकूनसुद्धां लक्ष्य देत नाहीं ! ” ह्या सर्वसाधारण घोषांत आम्ही आमचा असा सूर आणखी मिळवितोंः—‘ हिंदी मुसुल्मान इंडियन हे आजकालच्या जर्मन किंवा आयरिश लोकांहून अधिक अद्ययावत आहेत काय ? जर्मन किंवा आयरिश हे जगातल्या सर्वांत पुढारलेल्या, सुशिक्षित व अद्ययावत् अशा राष्ट्रांत गणले जाणार नाहींत काय ? पण तरीसुद्धां ते जर्मन किंवा आय-रिश आजच्या काळांतही समान वंश, भाषा, संस्कृति वा इतिहास यांच्या पेक्षां प्रादेशिक एकतेला अधिक महत्त्व देत असल्याचें आढळत आहे काय ? ”

सुडेटन जर्मन व म्हटल्यास प्रसियन जर्मनहि यांना बराच काळापर्यंत राजकीय एकराष्ट्रत्व ठावकें नव्हतें. ते एका राज्यांत अंतर्भूत नव्हते, जर्मनीच्या युद्धांत जर्मनीला जर्जर करणारा प्रहार केल्यानंतर त्यांनीं त्याचे तुकडे पाडले, ‘राष्ट्र’ म्हणून एक गांठोडें निर्माण करून तें एका प्रादेशिक परिमाणाच्या परिघांत बसविलें, आणि त्याला झेकोस्लोव्हाकिया हें नांव देऊन त्यांत सुडटेन जर्मन पोल, हंगेरियन, झेक, स्लोव्हाक यांची खिचडी केली. पण खरोखरच अशाप्रकारें त्यांनीं ती ‘ राष्ट्र ’ अशी वस्तु आकारास आणली काय ? सुडेटन जर्मनांना प्रादेशिक परिमाण ह्या नात्यानें आलेख्यावर प्रसियन जर्मनांच्या बाहेर काढून टाकण्यांत आलें होतें तरी सुद्धां त्याला न जुमानतां ते प्रसियन जर्मनांशींच एक होण्याची उत्कटतेनें आशा धरून होते; आणि प्रादेशिक नि राजकीय एकत्वाच्या

नात्यानें आलेख्यांत ते एकत्र रेखाटले असतांना सुद्धां तें न मानून दारचे शेजारी असणाऱ्या झेकांविरुद्ध बंड करून उठले अन् प्राणसंकटाचीहि क्षिति न बाळगतां प्रसियनांमध्येंच जाऊन मिळते झाले. असें त्या सुडेटन जर्मनांनीं खरोखर कां करावें ? झेकांपेक्षां किंवा स्लोव्हाकांपेक्षां प्रसियनांशीं त्या सुडेटन जर्मनांचा अधिक निश्चत असा प्रादेशिक लागाबांधा होता म्हणून खाचितच नव्हे तर जर्मनींतील जर्मनांशीं भाषिक, सांस्कृतिक, वांशिक नि ऐतिहासिक स्वरूपाचे जे त्यांचे जिव्हाळ्याचे आप्तबंध होतें आणि जर्मन लोकांचाच अवयव होण्यांत त्यांना जें भूषण वाटत होतें त्यामुळेंच होय. उलटपक्षीं जर्मन ज्यूंचा प्रकार पाहा. हे जर्मन ज्यू प्रादेशिक एकमानाच्या समान बंधानें जर्मनांशीं निगडित झालेले असल्यामुळें जर्मन भूमींत अनेक शतकें जर्मनांसह वसत आलेले होते इतकेंच नव्हे,–तर जर्मन राज्यांत ते प्रत्यक्ष समाविष्ट केले गेलेले होते, राजकारणी भाषेंतहि ते साक्षात् जर्मन म्हणूनच लेखले जात, जर्मनींतले नागरिक अधिकार समानतेनें उपभोगीत,–छे, राष्ट्रीय जर्मन विधिशासनांतले घटक ह्या नात्यानें जर्मन राज्यावरहि वर्चस्व गाजवीत म्हटलें तरी चालेल.

तसेच आणखी आयरिश उदाहरणहि पाहा. आयर्लंड व इंग्लंड दोन्ही मिळून एकच राजकीय गट असून कित्येक शतकें दोघांचेंहि एकच राज्य नि एकच पार्लमेंट चालत आलेलें होतें. इंग्लिश लोक पिढ्यान्‌पिढ्या आयर्लंडांत बेटीव्यवहार, रोटीव्यवहार नि एकाच इंग्लिश भाषेंतून वाग्व्यवहार करीत वसत आले होते. अल्स्टराइट इंग्लिश लोक आणि आयरिश लोक यांचा दोघांचाहि प्रादेशिक बंध एकच आहे आणि दोघांची भूमिहि स्पष्टपणें रेखाटली गेलेली आयर्लंड ही एकच आहे. त्यांचा धर्मसुद्धां एकच आहे. अथवा आयर्लंड हा कांहीं महाद्वीपावरील एखादा फार मोठा प्रदेश नाहीं. तो हिंदुस्थानांतल्या एखाद्या प्रांताएवढासुद्धां जेमतेमच मोठा असेल. परंतु हे सारे सामान्य घटक समान नि इतकें निकटचें वास्तव्य या गोष्टींना इंग्लिश आणि आयरिश लोकांचें एक राज्य बनलें आहे काय ? छे ! आयर्लंडांतहि नाहीं कीं ग्रेटब्रिटनमध्येंहि नाहीच. आयरिश लोक बंड करून उठले, त्यांना इंग्लिशांच्या सारखेपणानें मिळत असलेल्या बादशाही सवलती त्यांनीं तुच्छ मानल्या, मृतप्राय झालेली आपली स्वतःची आयरिश भाषा पुन्हां जिवंत केली, आणि आपलें स्वतंत्र आयरिश

राष्ट्रीय राज्य प्रस्थापित केलें. उलटपक्षीं अल्स्टराइट इंग्लिशहि, ज्याच्याशीं तो अनेक शतकें वसत आला त्या आपल्या अगदीं दारांतल्याच आयरिश मनुष्याशीं कसलाहि राष्ट्रीय संबंध ठेवण्याचें नाकारतो आणि ज्यांचें त्यानें कधीं तोंडसुद्धां पाहिलें नसेल नि जे त्याच्यापासून फार दुरवर समुद्रापैलाड राहतात त्या आपल्या इंग्लिश बांधवांशीं संयुक्त होण्याकरितां झुरतो ! हें तरी कां घडावें ? कारण एकच. आयरिश आणि इंग्लिश यांचें निव्वळ प्रादेशिक ऐक्य त्यांना जितकें आकर्षू शकतें त्याच्यापेक्षांहि त्यांच्यामधला वांशिक, सांस्कृतिक नि ऐतिहासिक आप्तबंधांच्या एकत्वाचा अभावच त्यांना एकमेकांपासून अधिक दूर लोटतो. सध्याच्या युद्धामुळें माझें प्रतिपादनालाच सत्य ठरविलें असून, त्या कल्पनेचा पूर्णपणें उच्छेद केला आहे. प्रादेशिक आकृतीं-प्रमाणें मारून मुटकून ज्या राष्ट्रांची मोट बांधण्यांत आली तीं उध्वस्त झालीं असून पत्यांच्या घरांप्रमाणें ढांसळलीं आहेत. संस्कृति, वंश, परंपरा नि यांसारख्या एकीकरणाच्या सामान्य बंधनांनी बद्ध नसतां, आणि अर्थातच एकराष्ट्ररूपानें संकलित राहण्याची सामान्य प्रेरणा अस्तित्वांत नसतां केवळ प्रादेशिक राष्ट्रकल्पनेच्या भुसभुशीत नि लटपटीत वाळूच्या आधारावर विभिन्न समाजांची खिचडीप्रमाणें राष्ट्रें बनविण्याचा उद्योग करणाऱ्यांना, पोलंड नि झेकोस्लोव्हाकिया यांच्या उदाहरणानें खडबडून सावध केलें आहे. हीं केवळ युद्धोत्तर संधीचेवेळीं निर्मिलेलीं राष्ट्रें त्यांना मिळालेल्या पहिल्याच संधीला फुटलीं; जर्मन अंश जर्मनीकडे गेला, तसेंच रशियन रशियाकडे, झेक झेकां-कडे नि पोल पोलांकडे गेले. सांस्कृतिक, भाषिक, वांशिक नि तत्सदृश बंधनें हीं प्रादेशिक बंधनांपेक्षां अधिक प्रभावी ठरलीं. युरोपमध्यें गेल्या तीन चार शतकें ते ज्या राष्ट्रांमध्यें प्रादेशिक एकसंधीपणाचे जोडीला, किंवा तो नसतांहि वंश, भाषा, संस्कृति नि तत्सदृश इतर बंधनांची परिणति होऊन एकजीव होण्याची इच्छाशक्ति निर्माण झाली तींच राष्ट्रें गेल्या तीन चार शतकांत आपले स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्व नि एकजीवपणा सतत राखू शकलीं. उदाहर-णार्थ इंग्लंड, फ्रांस, जर्मनी, इटली, पोर्तुगाल इत्यादि.

एकजीव नि स्वयंभू राष्ट्रनिर्मितिसाठीं एकेरी वा संयुक्त रीत्या उपयोगी पडणारी वरील लक्षणें विचारांत घेतां, हिंदुस्थानांत आम्ही हिंदु लोक स्वयंभू

नि स्थायी राष्ट्रच आहोत. आम्हाला एक सामान्य पितृभूमि, नि प्रादेशिक एकसंधीपणा तर लाभला आहेच पण त्या व्यतिरिक्त, जगांत इतरत्र क्वचितच मिळणारी, आपल्या सामान्य पितृभूशीं समव्याप्त अशी, पुण्यभूमीहि लाभली आहे. ही भारतभू, हें हिंदुस्थान, आमची पितृभू नि पुण्यभूहि आहे. अशा रीतीनें आम्हास संस्कृति, धर्म, इतिहास, भाषा नि वंश यांची जिव्हाळ्याचीं बंधनें असून अगणित शतकें चाललेले सहवास्तव्य नि संमिश्रण यांची परिणती होऊन आपले एकजीव नि स्वयंभू राष्ट्र निर्माण झाले आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे एकत्र नि एकसंस्थ राष्ट्रीय जीवन जगण्याची इच्छाशक्ति उत्पन्न झाली. हिंदु हे केवळ युद्धोत्तर संधीचे वेळीं रचलेले राष्ट्र नसून जिवंत नि स्वयंभु राष्ट्र आहे.

( ६ )

# मुसुलमान जातिनिष्ठ आहेत

आणखी एका विशिष्ट कोटीक्रमाचा परामर्श येथें घेतला पाहिजे, कारण त्यायोगें विशेषतः आमच्या काँग्रेसनिष्ठ बंधुंची दिशाभूल होत असते. राष्ट्रीय अस्तित्व सिद्ध करण्यास जी एकजीवता कारणीभूत होते तिचा अर्थ कांहीं असा नाहीं कीं, तींत असलेल्या पंथोपंथांत भाषा नि वंश यांचें अंतर्गत भेदाचा सर्वस्वी अभाव असला पाहिजे. तिचा अर्थ इतकाच कीं, त्यांची राष्ट्रीय घटक या नात्यानें इतरांपासून भिन्नता त्यांच्या अंतर्गत भेदांपेक्षां कितीतरी मोठी असते. ब्रिटन, फ्रान्स यांसारखीं आजचीं एकजीव असलेलीं राष्ट्रें घेतलीं तरीहि तीं कोणत्याहि धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक, वांशिक नि इतर पोटभेदांपासून किंवा आपसांतील विरोधापासून सर्वस्वीं मुक्त असूं शकत नाहींत. सामुदायिक रीत्या इतर कोणत्याहि लोकसमुदायापासून दिसून येणाऱ्या एकाद्या लोकसमुदायाच्या विभिन्नतेच्या उलट तुलनेनें दिसून येणारी त्यांची एकता म्हणजेच राष्ट्रीय एकजीवपणा होय.

आम्हां हिंदुंमध्यें सहस्रावधि अंतर्गत भेद असले तरीहि, आम्हीं धार्मिक सांस्कृतिक, ऐतिहासिक, वांशिक, भाषिक नि इतर अनेक एकजीवतेच्या बंधनांनीं

इतकें बांधलेलें आहों कीं, इंग्रज, जपानी किंवा हिंदुस्थानांतले मुसलमान घेतले तरी अशा कोणत्याहि अहिंदु लोकांच्या तुलनेनें निश्चितपणें स्वतंत्र नि एकजीवतेनें दिसून पडतों. म्हणूनच आज काश्मीरपासून मद्रासपर्यंत व सिंधपासून आसामपर्यंत आम्हीं हिंदु स्वयमेव राष्ट्र म्हणून नांदण्याची इच्छा प्रकट करतो तें यामुळेंच. उलट जर्मनींतील ज्यूंच्याप्रमाणें हिंदुस्थानांतील मुसलमान सामान्यतः हिंदुस्थानाबाहेरच्या मुसलमानांशीं नि त्यांच्या हितसंबंधाशीं जितक्या आत्मीयतेनें राहतात तशी आत्मीयता शेजारी राहणाऱ्या हिंदुसंबंधानेंहि त्यांची नसते.

कांहीं प्रामाणिक परंतु भोळसर हिंदु अशा सुखाशेंत निमग्न आहेत कीं, हिंदुस्थानांतील मुसलमानांपैकीं बहुसंख्य वंश नि भाषा या दृष्टींनीं आपल्याशीं एकरूपच आहेत, कांहीं तर या पिढीचे स्मृतींतच मुस्लीम धर्म स्वीकारलेले असे आहेत, त्यांना हिंदुंशीं रक्तसंबंध नि एकजीवता मान्य करण्यास नि एका राष्ट्रीय जीवनांत संमिलित होण्यास प्रवृत्त करतां येईल. आम्हीं केवळ त्यांना या बंधनांची आठवण करून त्यांच्या आधारें त्यांना विनविलें कीं झालें. या दुधखुळ्या जीवांची वस्तुतः कींवच केली पाहिजे. जणूं काय, मुसलमानांना ही सर्व वस्तुस्थिति विदितच नाहीं ! ! पण सत्य गोष्ट अशी आहे कीं, मुसल्मानांना हीं बंधनें पुरेपूर विदित आहेत. पण लक्षांत घेण्यासारखा भेद इतकाच. कीं, इकडे हिंदुहिंदुना एकत्रित करणाऱ्या या बंधनांचा जिव्हाळा हिंदु मानतात नि अभिमान बाळगतात तर उलट मुसलमान लोक मात्र या बंधनांचा निर्देश करतांच त्यांचा तिरस्कार व्यक्त करतात आणि त्यांची स्मृति देखील आमूलाग्र नष्ट व्हावी असा यत्न त्यांनीं चालविला आहे. त्यांचेपैकीं कांहीं, काल्पनिक इतिहास नि वंशवृक्ष पुढें करून आपला अरब वा तुर्क यांच्याशीं संबंध दाखवितात.

आपली स्वतंत्रच भाषा निर्माण करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू असून बांडगुळाप्रमाणें कशी तरी ती आरबी भाषेच्या खोडाला ते चिकटवूं पहात आहेत. कोंकणसारख्या प्रांतामध्यें धर्मांतरित मुसलमानांचीं ‘ तांबे, मोडक ’ इत्यादिकांसारखीं नांवें प्रचलित आहेत. तीं काढून टाकून आरबी नांवें आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अशा रीतीनें सामान्य हिंदु वंशांत ते एकेकाळीं कोणीतरी होते याचें प्रत्येक स्मृतिचिन्ह नाहींसें करून ते हिंदुमुसलमानांतील भेदभाव अधिक विस्तृत करीत आहेत. हिंदु काफर हे एक तर धर्मांतर करून मुसलमान झाले

पाहिजेत, किंवा त्या देशांत मुसलमानी राजसत्ता प्रस्थापित होऊन तिला ‘ जिजिया ’ कर देणारे दास असले पाहिजेत. असें होईपर्यंत हिंदुस्थान देशाला ‘ दार उल-इस्लाम ’ म्हणजे इस्लामियांनीं प्रेम करण्यासारखा देश असें म्हणतां येणार नाहीं, ही गोष्ट मुसलमानांच्या मनावर त्यांच्या धार्मिक आणि परंपरागत कल्पनांचे योगानें ठसविली जात आहे. हिंदुस्थान हा शब्द देखील त्यांना शल्या-प्रमाणें बोचूं लागला आहे. मी या गोष्टी येथें सांगत आहे त्या समर्थनासाठीं नव्हे किंवा निषेधासाठींहि नव्हे. कोणाहि मुसलमानाला सरळपणें नाकारतां याव-याची नाहीं अशी साधी वस्तुस्थितीच मी सांगत आहें. हिंदूंशीं कोणत्याहि रीतींचें सामान्य बंधन नसणारे त्यांच्याहून विभिन्न असें हिंदुस्थानांतील स्वतंत्र राष्ट्र म्हणून पुढें येण्याचा मुसुलमानांचा जाणून बुजून योजनापूर्वक प्रयत्न आहे. तेव्हां प्रामाणिक नि भोळसर अशा हिंदुंच्या हें स्पष्ट ध्यानांत आलें पाहिजे कीं एका सर्वसामान्य राष्ट्रीय जीवनाशीं मुसलमानांनीं समरस होण्याचें नाकारलें म्हणजे आपोआपच उरलेल्या हिंदुंचें एक स्वयंभू स्वतंत्र राष्ट्र उत्पन्न होतें.

तर मग हिंदुंशी होण्याविषयीं ती तशीं इच्छा हिंदी मुसुलमानांच्या ठायीं आहे काय ? हाच तर खरा प्रश्नांतला प्रश्न आहे; आणि कॉंग्रेसनिष्ठ हिंदु हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या प्रारंभी एक क्षणभरहि त्या प्रश्नाचा विचार कर-ण्यासाठीं थांबले नाहींत अथवा आजहि मुसुलमानांच्या प्रार्थनांच्या वेळांशीं जुळते घेण्याकरितां राष्ट्रीय कॉंग्रेसचें अधिवेशन तासन्‌तास स्थगित करतात त्या मधल्या वेळांतसुद्धां ते तो प्रश्न आपल्या डोक्यांत आणीत नाहींत ! ‘मुस्लीमलीग’ जातिनिष्ठ आहे असे नुसते घोषित करून कांहींच उपयोग नाहीं. ती कांहीं नव्यानें कळलेली वार्ता नव्हे. खरी गोष्ट अशी आहे कीं, कॉंग्रेसवाल्या मुसुलमानांसुद्धां सबंधच्या सबंध मुसुलमान समाजच जातिनिष्ठ आहे. जो प्रश्न समजून घेतला पाहिजे तो हा कीं ‘ते इतके जातिनिष्ठ कां आहेत ?’ कॉंग्रेसनिष्ठ हिंदु अगदीं पहिल्यापासून त्या प्रश्नाचा अभ्यास करण्याला धजतच नाहींत. कारण तशाप्रकारचा अभ्यास त्यांच्या प्रादेशिक राष्ट्रत्वाच्या-ते समजतात त्या अर्थानें हिंदी ऐक्याच्या-वेडाला शेवटचा श्वास सोडावयाला भाग पाडील असेंच त्यांना भय वाटतें ? ‘धर्मवेड ! माथेफिरूपणा !’ असें तुम्ही ओरडतां ? पण धर्मवेड किंवा माथेफिरूपणा ही मुसलमानांना भरींव नि तथ्यपूर्ण गोष्ट आहे.

तिला नांवे ठेवून तुम्ही तिचें निवारण करूं शकणार नाहीं. तर तुम्हांला तिला समोरासमोर तोंडच दिले पाहिजे. मुसुलमानांचा इतिहास, त्यांचें तत्वज्ञान व त्यांची राजकीय मनःप्रवृत्ति यांविषयीं सामान्यतः पूर्णपणें अज्ञानी असलेल्या कॉंग्रेसवाल्यांनीं जे प्रादेशिक राष्ट्रत्व कल्पिले आहे त्याच्या विषयीं मुसलमान स्वभावतःच उदासीन असणें येथें मागें-मागें निर्देशिलेल्या कारणांकरितां माझ्या मतें अगदीं मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. तुम्ही निदान पुढील गोष्टी लक्षांत ठेवाल तर हिंदी मुसलमानांची ही विरोधी वृत्ति तुम्हाला दुर्बिणीतून पाहिल्या-प्रमाणें खऱ्या खऱ्या स्वरूपांत स्पष्ट दिसूं शकेल.

आत्यंतिक धर्मनिष्ठतेची इतिहासकालीन स्थिति नि राज्याविषयींची देवभोळी कल्पना यांच्यावर लक्षांत येण्याइतकी सामान्यतः सर्वच आणि विशेषें करून हिंदी मुसलमानांची आद्यपि वाढच झालेली नाहीं.

त्यांचें तत्वज्ञान आणि राज्याच्या ईश्वरकृततेवर विश्वास ठेवून चाल-णारें त्यांचे राजकारण यांच्या योगानें मानवी जगाचे केवळ दोनच विभाग पडतात. एक मुसुलमानी भूमि, आणि दुसरी शत्रूंची भूमि. मुसलमानांनीं पूर्ण-पणें वसलेलें किंवा मुसलमानांकडून शासिले जाणारे असें सर्व प्रदेश ही मुसल-मानी भूमि होय. बहुशः मुसुलमानेतरांनीं वसलेले अथवा मुसुलमानेतर सत्तेकडून शासिले जाणारे असे सर्व प्रदेश ही शत्रूंची भूमि असून कोणत्याही निष्ठावंत मुसुलमानानें ह्या भूमीविषयीं कोणत्याहि प्रकारची निष्ठा ठेवतां कामा नये. इतकेंच नव्हे तर त्यानें आपल्या शक्तीप्रमाणें युक्तीनें, बलात्कारानें वा लबाडीनें वाटेल तें करून तेथील मुसुलमानेतरांना मुसलमान धर्मांत आणण्या-विषयीं आणि एखाद्या मुसलमानी राष्ट्राकडून त्या प्रदेशावर राजकीय स्वारी आणवून तो जिंकण्याविषयींहि आव्हानच केलेलें आहे. या म्हणण्याच्या विरुद्ध म्हणून मुसुल्मानी पुस्तकांतली इकडची-तिकडची वाक्यें पुढें टाकण्यांत अर्थ नाहीं. सबंध ग्रंथच वाचा म्हणजे त्याची एकूण प्रवृत्ति कळेल. आणि त्यांतूनहि पुस्तकांशी आम्हाला येथें कांहीं कर्तव्य नाहीं. तर त्या पुस्तकांचें अनुयायी आणि ते आपल्या वर्तनांत त्यांचे कसें अनुकरण करीत आहेत तोच येथें प्रश्न आहे. तुम्हांला नंतर कळून येईल कीं, समग्र मुसल्मानी इतिहास आणि त्यांची नित्याचीं कृत्यें ही सर्व मीं इतरत्र रेखाटलेल्या आकृतीनुसारच रचिलीं गेलेलीं

आहेत. अर्थात् मुसुल्मानी प्रदेशाशीं कांहीं संबंध नसेल तर प्रादेषिक राष्ट्र-भक्ति ह्या शब्दाचा मुसलमानास अर्थच कळत नाहीं. अफगाण हे राष्ट्रभक्त असूं किंवा होऊं शकतात, कारण अफगाणिस्थान आजहि एक मुसुल्मानी प्रदेश आहे. पण कोणताहि मुसुल्मान जर तो खरा मुसलमान असेल-आणि समाज ह्या नात्यानें ते सर्वच आत्यंतिक धर्म-श्रद्धाळू असतातच--तर देश म्हणून वा राष्ट्र म्हणून वा राज्य म्हणून हिंदुस्थाना-विषयीं त्याला धर्मानेंच एकनिष्ठा धरतां येणार नाहीं. कारण आज तो त्याचा शत्रूदेश आहे आणि येथें मुसल्मानेतरांची बहुसंख्या असल्यामुळें नि त्यांतूनहि त्यावर एखाद्या मुसलमानी राष्ट्राचें वा मुसलमानी राजाचें राज्य चालू नसल्यामुळें तो त्याला दुहेरी अंतरलेला आहे.

ह्याच्याच जोडीला हेंहि मिळवा कीं, या सर्व मुसुल्मानेतरांत हिंदु हेच मुसुल्मानी तत्त्वज्ञान्यांनीं सर्वांत धिक्कारार्ह मानलेले आहेत. कारण खिस्ती व ज्यू हे कसेंहि झाले तरी अंशतः समान असलेले असे धर्मग्रंथ त्यांना असल्यामुळें ' कितावी ' आहेत. पण हिंदु मात्र संपूर्णच ' काफिर ' आहेत! अर्थात् ' हिंदुस्थान ' ही त्यांची भूमि जोंवर तिजवर मुसल्मानांचें राज्य चालू झालेलें नाहीं किंवा सर्व हिंदूंनीं इस्लामला कवटाळलें नाहीं तोंवर प्रामुख्यानें ' शत्रूभूमी ' च होय! अद्यापहि धर्मिष्ठतेंतच वावरत असणाऱ्या हिंदी मुसलमानांची हीच धार्मिक मनोवृत्ति आहे. त्यांच्यांतले महमदअल्ली आदिकरून कांहीं थोडेजण व्यक्तिशः तितकेसे धार्मिक मनोवृत्तीचे नसूनसुद्धां समाजांत राजकीय, वांशिक नि सांस्कृतिक स्वरूपाचें एक अत्यंत सोईस्कर साधन म्हणून ती प्रवृत्ति चेतवीत असतात. तर अर्थातच मुस्लीम संघशासन घडविण्याकरितां ' हिंदी हिंदू ' पेक्षां बाहेरच्या अहिंदी मुसुल्मानी देशाशीं सख्य करण्याचा आपला हेतु ' मुस्लीम लीग ' नें उघडपणें घोषित करावा यांत आश्चर्य काय? त्यांच्या दृष्टीनें पाहातां त्यांच्यावर हिंदुस्थानच्या द्रोहाचा आरोप मुळींच ठेवतां येणार नाहीं. त्यांची बुद्धि शुद्ध आहे. कारण त्यांनीं आपल्या आजच्या ह्या ' हिंदुस्थान ' ला स्वदेश किंवा स्वराष्ट्र कधींच मानिलेलें नाहीं. त्यांना ही पूर्वीपासूनच एक परकी भूमि अर्थात शत्रूभूमिच आहे.

ही मुसुलमानांची धार्मिक व जीवंत असलेली मनःप्रवृत्ति झाली, अर्थात् तिला अनुसरून त्यांची राजकीय नि सांस्कृतिक मनःप्रवृत्तिहि मुख्यतः हिंदुविरोधीच आहे, आणि जोंवर ते मुसुलमान असणार नि 'निष्ठावंत' असणार तोंपर्यंत ती तशीच असावयाची हें निश्चित आहे. ते हिंदुस्थानांत शिरले ते विजेते म्हणून शिरले आणि त्यांनीं हिंदूंना आपल्या राज्यसत्तेखालींहि आणलें ह्या गोष्टीची त्यांना पुरेपुर जाणीव आहे. त्यांना अशा विलक्षण स्मरणशक्तीचीहि देणगी लाभलेली आहे कीं जी नेमकीच त्यांच्या पराभवांचें व धुळधाणीचें स्मरण करून देणाऱ्या एकूण एक गोष्टी पूर्णत्वानें विसरू जाते! ह्याच पुस्तकाच्या परिच्छेदांत दाखविल्याप्रमाणें हिंदूंनीं त्यांना शेंकडों रणक्षेत्रां-वर चांगलें झाडून काढून त्यांचा धुव्वा उडविला आणि सर्व हिंदुस्थान मुसुलमानांच्या जोखडाखालून मुक्त करून 'हिंदुपदपादशाही' ची पुन्हां स्थापना केली ही गोष्ट त्यांना कदापि आठवणार नाहीं. हिंदुस्थानांत आपलें प्रभावी अल्पमत आहे हें त्यांना माहित आहे. त्यांची लोकसंख्या प्रत्येक शिरगणतीच्या प्रतिवृत्तांत सारखी वाढती आहे. हिंदुसंघटनवाद्यांनीं विशेषत्वानें ध्यानांत ठेवावयास पाहिजे ती गोष्ट ही कीं, अस्पृश्यता, शुद्धीवरील बंदी, विधवाविवाहावरील बंदी यांसारख्या आपणा हिंदूंच्या कांहीं धर्मभोळ्या व आत्मघातकी सामाजिक चालींच्या योगानें त्यांना वाटवावाटवीला व मुसुलमानी धर्मांतराला चांगलेंच सुपीक क्षेत्र मिळतें. तेव्हां अशा वर्तमान परिस्थितींत त्यांनीं सारख्याच झपाट्यानें स्वतःची लोकसंख्या वाढविण्याची आणि हिंदूंची घटविण्याची आशा धरावी हें योग्यच आहे. हिंदूंच्या उदयाची व राजकीय आकांक्षांची ब्रिटिशांना भीति वाटत असल्यामुळें हिंदूंच्या विरुद्ध आपली फळी बळकट करण्याला त्यांच्याकडून फार काळपर्यंत प्रत्येक सवलत नि प्रत्येक प्रकारचें साहाय्य निश्चितपणें मिळत राहणार हें मुसुल्मानांना चांगलें माहित आहे. तसेंच केवळ प्रादेशिक एकतेच्या अव्यवहार्य अशा समान बंधावर आधारलेलें हिंदु-मुसुलमान ऐक्य घडवून आणण्याच्या खुळचट नादाच्या मागें लागलेले कॉंग्रेसनिष्ठ हिंदु हे मतभारण, विशिष्ट नि प्रमाणबाह्य प्रतिनिधित्व इत्यादीं संबंधांतल्या आणि मुख्यतः आपल्याला सध्यां टोंचत असलेल्या हिंदु-संघटनेच्या चळवळीला दडपून टाकण्याविषयींच्या आपल्या धमकावण्यांचें पाठबळ असलेल्या आपल्या मागण्यांना निश्चित वश होतील हें सुद्धां त्यांना पुरतें ठाऊक

आहे. ते अल्पसंख्य असतांनासुद्धां हिंदी सैन्यांत व सशस्त्र पोलिसांत त्यांना शेंकडा ६० जागा मिळाल्या असल्यामुळें त्यांचा तो वर्चस्वाचा घटक त्यांच्या आधींच प्रत्ययास आलेला आहे. या सर्व गोष्टी त्यांना अनुकूल अशाच असल्यामुळें जाणून वा अजाणतां पण त्यांचा असा पूर्ण विश्वास आहे कीं एखाद्या मोठ्या जागतिक युद्धांत ब्रिटिशांचा जर पराभव झाला तर हिंदुस्थानाच्या सीमेवर असलेल्या अहिंदी मुसुल्मानी राष्ट्रांच्या साहाय्यानें मुसुल्मान हेच कदाचित ब्रिटिशांच्या हातून हिंदुस्थानचीं सार्वभौम सत्ता हिसकावून घेतील आणि तेथें पुन्हां मुसुलमानी साम्राज्य प्रस्थापित करतील. मग तेव्हांच मात्र त्यांना 'मुसलमानी भुमि' म्हणून, स्वदेश म्हणून हिंदुस्थानावर प्रेम करतां येईल नि ते करतील आणि 'भारत हमारा देश है!' किंवा 'हिंदुस्थान हमारा' अशी गाणीं मनापासून गातील ! ! परंतु तोपर्यंत मात्र मुसुल्मानाला खऱ्या धर्मनिष्ठ मुसुल्मानाला-हा देश केवळ 'शत्रूभुमि' म्हणून असणार.

मला वाटतें ब्रिटिशांनीही ह्या वरील छेदकाच्या शेवटीं निर्देशिलेल्या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावें आणि मुसुलमानांना त्यांच्या हिंदुविरोधी चळवळींत फाजील उत्तेजन देण्याच्या आपल्या धोरणाला वेळींच आळा घालावा. हिंदुस्थानचे दोन तुकडे पाडणें, मुस्लीम संघशासन घडवून आणण्याकरितां हिंदुस्थानाबाहेरच्या परक्या मुसुल्मानी राष्ट्राला पाचारण करणें, आणि हिंदुस्थानांत एक स्वतंत्र मुसुलमानी राज्य स्थापणें याविषयींची 'मुस्लीम लीग' ची उघड घोषणा विचारांत घेतां, ब्रिटिशांनींसुद्धां हिंदुंना उखडण्याकरितां आपल्या ह्या 'लाडक्या बायको' वर अधिक विश्वास टाकतांना दोनदां विचार करावा. मुसुलमानी इतिहासांतलीं पडद्यांतलीं कारस्थानें सुप्रसिद्ध आहेत आणि न जाणो हिंदुंना उखडण्याकारितां म्हणून मुसुल्मानी विभक्तीकरणाला दिलेलें उत्तेजन स्वतःलाच उखडून घेण्याला उपयोगी पडल्याचेंहि कदाचित ब्रिटिशांना शेवटीं आढळून येईल; तथापि तो ब्रिटिशांचा प्रश्न आहे व त्याची ते योग्य ती काळजी घेऊ शकतीलच. आपणां हिंदुंपुढें जो प्रश्न आहे तो हाच कीं, आपल्याला ब्रिटिशांची किंवा मुसुल्मानांची बटीक होऊन राहावयाचें नसून आपल्या ह्या स्वतःच्या घराचें-ह्या हिंदुस्थानचें—हिंदूंच्या भूमींचें-खरेखुरे स्वामी व्हावयाचें आहे असा आपण आतां निर्धारच केला पाहिजे.

हिंदुस्थानच्या प्रदेशांत रहाणाऱ्या किंवा बाहेरच्या अशा कोणत्याहि अहिंदु लोकांचें वर्चस्व न चालतां ज्यांत हिंदूंना आपलें स्वत्व, म्हणजेच हिंदुत्व प्रभावानें स्थापित करतां येईल तेंच एकमेव हिंदूंचें स्वराज्य होय. हिंदुस्थानांत जन्मल्यामुळें कांहीं इंग्रज हे हिंदी आहेत व पुढेंही होतील. पण म्हणून अशा अँग्लो इंडियनांचे वर्चस्वाला हिंदूंचें स्वराज्य म्हणतां येईल काय? औरंगजेब आणि टिपू हे जन्मजात हिंदीच होते; इतकेंच नव्हे तर बाटलेल्या हिंदु आयांचें ते मुलगे होते. पण त्यायोगें औरंगजेबाचें नि टिपूचें राज्य हें हिंदुंचें स्वराज्य ठरलें काय? मुळींच नाहीं. प्रादेशिक दृष्ट्या ते हिंदी असले तरी ते हिंदुसमाजाचे सर्वांत घातक शत्रू ठरले आणि म्हणून शिवाजी, गुरुगोविंदसिंग, राणा प्रताप नि पेशवे यांना मुसलमानांच्या वर्चस्वाविरुद्ध युद्ध करून हिंदु स्वराज्य यथार्थ-रीतीनें प्रस्थापित करावे लागलें.

म्हणून सद्यः परिस्थितींत देखील 'हिंदी राष्ट्रीय राज्य' घेतलें तरी त्याचा अर्थ इतकाच होईल कीं, हिंदुस्थानांतील मुसलमान अल्पसंख्याकांना समान नागरिकत्वाचे अधिकार राहतील, समान संरक्षण मिळेल आणि संख्येच्या प्रमाणांत नागरिक जीवनांत अधिकार मिळतील. कोणत्याही अहिंदू अल्पसं-ख्याकांचें न्याय्य अधिकारांवर बहुसंख्यांक हिंदु अतिक्रमण करणार नाहींत. पण कोणत्याही परिस्थितींत लोकसत्ताक आणि न्यायबद्ध घटनेंत बहुसंख्य या नात्यानें जे अधिकार चालविण्याची सत्ता हिंदुंना लाभते ते अधिकार हिंदु सोड-णार नाहींत. विशेषतः अल्पसंख्य मुसलमान हे अल्पसंख्य राहिले हा कांहीं त्यांनीं हिंदुवर उपकार केला नाहीं. म्हणून राजकीय नि नागरिक अधिकाराचा प्रमाणशीर नि न्याय्य वांटा घेऊन आपलें जें योग्य स्थान आहे तेवढ्यांतच त्यांनीं संतुष्ट राहिलें पाहिजे. बहुसंख्यांकांच्या न्याय्य अधिकारांवर नि सत्तेवर एक प्रकारें बोळा फिरविण्याचा अधिकार अल्पसंख्य मुसलमानांना देऊन टाकून त्या घटनेला स्वराज्य म्हणणें हें सर्वस्वी विपरीत होय. एक धनी जाऊन दुसरा यावा अशी हिंदुंची इच्छा नाहीं. हिंदुस्थानच्या प्रदेशांत जन्माला आला म्हणून एडवर्डचे स्थानीं औरंगजेब आणून ठेवावा येवढ्याचसाठीं युद्ध करून प्राण देण्यास हिंदु सिद्ध झालेले नाहींत. आपल्या देशांत, आपल्या स्वतःच्या घरांत स्वतःच स्वामित्व चालवावें हीच एकमेव गोष्ट यापुढें हिंदुंना पाहिजे आहे.

याप्रमाणें विचार करतां आमच्या देशाला हिंदुस्थान हेंच नांव चालू राहिलें पाहिजे. मूळ सिंध शब्दापासून उत्पन्न झालेले ‘ इंडिया ’ किंवा ‘ हिंदु ’ असे शब्द वापरण्यास प्रत्यवाय नाहीं. पण तेही हिंदुंचा देश, हिंदु राष्ट्राचें वसतिस्थान याच अर्थानें वापरतां येतील. आर्यावर्त, भारतभूमि इत्यादि आपल्या मायभूमीची आपणांस प्रिय असलेलीं प्राचीन नावें अर्थातच सुसंस्कृत लोकांना प्रिय राहतील. आमच्या मायभूमीला हिंदुस्थान याच नांवानें संबोधलें पाहिजे हा आग्रह धरण्यांत अहिंदु अशा आमच्या देशबंधुंवर कोणत्याहि प्रकारें अतिक्रमणा वा मानहानी करण्याचा आमचा उद्देश नाहीं, आमचे पारशी नि ख्रिश्चन देशबंधु हे आजच आमच्याशीं सांस्कृतिक दृष्ट्या इतके समानशील आहेत, इतके स्वदेश-भक्त आहेत आणि अँग्लोइंडियन इतके समंजस आहेत कीं, ते या हिंदुंच्या न्याय्य भूमिकेवर येण्याचें मुळींच नाकारणार नाहींत. आपल्या मुसलमान देशबांधवांसंबंधीं बोलावयाचें तर हिंदुस्थान या नांवाची हिंदु-मुसलमान ऐक्याचे मार्गांत दुर्लंघ्य पर्वतासारखी अडचण आहे असे मानणारे त्यांच्यांत कित्येक आहेत, ही वस्तु-स्थिति लपविण्यांत अर्थ नाहीं; पण यांनीं हें ध्यानांत आणावें कीं, मुसलमान हे कांहीं एकट्या हिंदुस्थानांतच आहेत असें नाहीं किंवा मुसलमानी जगतांत हिंदी मुसलमान येवढेंच कांहीं एकमेव निष्ठामान मुसलमान अवशिष्ट राहिलेले नाहींत. चीनमध्यें कोट्यावधि मुसलमान आहेत. तद्वतच ग्रीस, पॅलेस्टाईन आणि हंगेरी नि पोलंडमध्यें देखील त्यांच्या राष्ट्रघटकांत सहस्रावधि मुसलमान समाविष्ट आहेत. पण तेथें ते अल्पसंख्य असल्यानें केवळ एक जाती म्हणून नांदत आहेत. आणि या देशांना त्यांतील मोठ्या बहुसंख्येनें असलेल्या वंशांची वसतिस्थानें म्हणून रूढ झालेलीं प्राचीन नांवें काढण्यासाठीं तेथें कोणी या अल्प-संख्य जातीच्या अस्तित्वाचें कारण पुढें करीत वा आणीत नाहीं तर पोल लोकांच्या देशांचें नांव पोलंड, ग्रीकांच्या देशांचें नांव ग्रीक हेंच चालू आहे. तेथील मुसलमानांनीं हीं नांवें विकृत केलीं नाहींत किंवा करण्यास धजले नाहींत तर उलट तसा प्रसंग येतांच पोलिश मुसलमान, ग्रीक मुसलमान किंवा चिनी मुसलमान अशा नांवानीं संबोधले जाण्यांत ते समाधान मानतात. तसेंच आमच्या मुसलमान देशबांधवांनीं राष्ट्रीय नि प्रादेशिक दृष्ट्या आपला निर्देश करण्याचे वेळीं हिंदुस्थानी मुसलमान या नांवांत समाधान मानावें. असें करण्यांत त्यांच्या

धार्मिक नि सांस्कृतिक स्वतंत्र अस्तित्वाला मुळींच बाध येत नाहीं, आणि हिंदुस्थानांत आल्यापासून येथील मुसलमान आपणांस हिंदुस्थानी असेंच म्हणत आले आहेत.

पण या सर्व गोष्टी न मानता आपल्या देशबांधवांतील कांहीं दुराराध्य मुसल्मान गट आपल्या या देशाच्या नांवालाच बाध आणतात, येवढ्यावरूनच आपणही आपला विवेक सोडून आत्मप्रत्ययहीन बनण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थान या सर्वत्र रूढ झालेल्या आपल्या मायभूमीच्या नांवानें ऋग्वेदकालांतील सिंधुपासून आपल्या पिढींतील हिंदु शब्दापर्यंत जी अखंड राष्ट्रीय परंपरा व्यक्त होते ती विच्छेदिण्यास वा तिच्याशीं प्रतारणा करण्यास हिंदुंनीं सिद्ध होऊं नये. जर्मनांचा देश जसा जर्मनी, इंग्रजांचा इंग्लंड, तुर्कांचा तुर्कस्थान नि अफगाणांचा अफगाणिस्थान, त्याचप्रमाणें हिंदुंचा देश म्हणून हिंदुस्थान या नांवानेंच आपण आपलें स्थान जगाच्या आलेख्यांत चिरंतन खोदून ठेवलें पाहिजे.

( ७ )

# ध्वज, भाषा व लिपी

कुंडलीनी–कृपाणांकित भगवा ध्वज हाच हिंदु राष्ट्राचा ध्वज होईल. त्यावरील ओम्, स्वास्तिक कृपाणादि चिन्हांमुळें वैदिक कालापासून चालत आलेल्या आपल्या हिंदु जातीच्या भावनांचें पोषण होतें. ज्यांना या ध्वजांतील अंगभूत हेतू नि त्याचेवरील आकृति व प्रतीकें यांची आवश्यकता हीं समजून घ्यावयाचीं असतील त्यांनीं त्यासंबंधानें मी लिहून प्रसिद्ध केलेलें ‘ अखिल हिंदुध्वज ’ हें पत्रक पहावें.

या संबंधांत ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, या ध्वजाव्यतिरिक्त हिंदूंमध्यें इतर ध्वज प्रचलित आहेत. अखिल हिंदु जातीचे सनातनी, जैन, शीख आर्यादि जे घटक आहेत त्यांचे रंग म्हणून हे ध्वज आहेत आणि त्यांनाहि प्रत्येक हिंदूनें मान दिला पाहिजे. कारण त्यांमध्यें देखील सामान्य अखिल हिंदुत्वाच्या भावनेचाच प्रकर्ष प्रगट झालेला आहे.

आमच्या अहिंदु देशबांधवांचें जे वेगळ्या रंगांचें ध्वज आहेत त्यांना प्रतिस्पर्धी विरोधक म्हणूनच हा हिंदु ध्वज आहे असेंहि मानण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या जातीचें प्रतीक म्हणून आपला स्वतंत्र ध्वज मुसुलमानांनीं सुखेनैव वागवावा. सारांश, या देशाचे विभाग म्हणून असणाऱ्या आपल्या देशबांधवांच्या कोणत्याही गटांच्या धार्मिक वा राजकीय ध्वजासंबंधीं आमचा आदरच राहील. मग तो मुस्लीम लीगचा ध्वज असो, कॉंग्रेसचा तिरंगी ध्वज असो वा रक्तध्वज असो. जोपर्यंत हे गट उलट आमच्या अखिल हिंदु ध्वजासंबंधीं आदर दर्शवितील नि द्वेष न करतां सहकारी ध्वज म्हणून त्यास मानतील तोपर्यंत आमचाहि त्यांचे ध्वजासंबंधीं आदरभाव राहील. पण अखिल हिंदु जातीचें प्रातिनिधिक प्रतीक म्हणून मात्र ' हिंदु ध्वज हाच एकमेव राहील. '

संस्कृत ही आमची देवभाषा किंवा पवित्र भाषा आणि संस्कृतनिष्ठ म्हणजे संस्कृतपासून निर्माण झालेली नि संस्कृतामधुनच वाढलेली हिंदी भाषा हीच आमची प्रचलित राष्ट्रभाषा होय. जगांतील प्राचीन भाषांमध्यें ती सर्वांत अधिक संपन्न नि सुसंस्कृत असून आम्हां हिंदुंना तर ती पूज्यांत पूज्य भाषा होय. आमचे धर्मग्रंथ, इतिहास, तत्त्वज्ञान नि वाङ्मय यांची मूळें या भाषेंत इतकीं खोल रुतलेलीं आहेत कीं, ती भाषा म्हणजे आमच्या हिंदुवंशाचें उत्तमांग होय. आमच्या प्रचलित मातृभाषांपैकीं अधिकांत अधिक मातृभाषांची ती माता असून तिनें आपलें स्तनदुग्ध पाजून त्या भाषांचें पोषण केलें आहे. आज हिंदुंमध्यें ज्या ज्या भाषा प्रचलित आहेत त्या संस्कृतापासून निर्माण झालेल्या किंवा संस्कृताशीं संलग्न असलेल्या अशाच आहेत आणि त्याची वाढ नि उत्कर्ष ही संस्कृत भाषेपासून घेतलेल्या जीवनरसावरच पोसलेलीं आहेत. म्हणून हिंदु तरुणांच्या उच्च अभ्यासक्रमांत संस्कृत भाषेचा भाग चिरकाल नि अनिवार्यपणें असलाच पाहिजे.

हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून अंगिकार करण्यांत कोणत्याही इतर प्रांतिक भाषांचा अवमान वा अधिक्षेप अभिप्रेत नाहीं. हिंदीप्रमाणेंच आपापल्या प्रांतिक भाषाहि आम्हांस प्रियच असून आपापल्या क्षेत्रांत त्यांचें संवर्धन नि प्रगति चालणारच. त्यांपैकीं कांहीं प्रांतिक भाषा तर आजहि हिंदीपेक्षां अधिक प्रगत आणि वाङ्मयसंपन्न आहेत. पण सर्व दृष्टींनीं विचार केल्यास

सर्व हिंदूंची राष्ट्रीय भाषा होण्यास हिंदींची पात्रता सर्वांहून अधिक आहे. हेंहि ध्यानांत घेणें अवश्य आहे कीं, हिंदी ही कांहीं मागणीनुसार कृत्रिम सिद्ध केलेली राष्ट्रभाषा नाहीं. वस्तुतः इंग्रज किंवा मुसलमान देखील हिंदुस्थानांत येण्यापूर्वींपासूनच सर्व हिंदुस्थानांत सामान्य स्वरूपाच्या हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचें स्थान प्राप्त झालें होतें. हिंदु यांत्रिक, प्रवासी, व्यापारी, सैनिक वा पंडित जेव्हां बंगाल ते सिंध, सिंध ते काश्मीर काश्मीर तें रामेश्वर संचार करीत तेव्हां ते भिन्न भिन्न प्रदेशांत हिंदी भाषेच्या साहाय्यानें आपला आशय व्यक्त करीत. ज्याप्रमाणें सुबुद्ध हिंदू क्षेत्रांत संस्कृत तद्वतच सामान्य हिंदू जातीमध्यें गेलीं सहस्र वर्षें तरी हिंदी हीच हिंदुस्थानची राष्ट्रीय भाषा म्हणून प्रचलित आहे. त्याचाच परिणाम म्हणून त्याचे भरीला आज देखील दुसऱ्या कोणत्याहि हिंदु भाषेपेक्षां संख्येनें पुष्कळच अधिक लोकांमध्यें मातृभाषा म्हणून हिंदी हीच रूढ व प्रचलित आहे. म्हणून प्रांतिक भाषांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष न करतां दुय्यम शिक्षणांत हिंदु विद्यार्थ्यास आखिल हिंदूंची राष्ट्रभाषा या नात्यानें हिंदीचें शिक्षण आवश्यक विषय म्हणून दिलें पाहिजे.

हिंदी म्हणजे अर्थात् शुद्ध संस्कृतनिष्ठ हिंदी. उदाहरणार्थ, महर्षि दयानंदांनीं लिहिलेल्या सत्यार्थ–प्रकाशांत दिसून येणारी हिंदी असेंच आम्ही मानतों. ही हिंदी भाषा किती साधी, अनवश्यक परकीय शद्बापासून अलिप्त नि इतकेंही करून कितीतरी अर्थवाहक आहे. हिंदुस्थानांतील आखिल हिंदूंची राष्ट्रभाषा हिंदी असावी या मताचा हेतुपूर्वक नि निश्चितपणें पुरस्कार करणारे पहिले हिंदु पुढारी स्वामी दयानंदजी हेच होत, या गोष्टीचा येथें ओघानें निर्देश करणें योग्य ठरेल. वर्धा योजनेंत पकविलेल्या तथाकथित ‘ हिंदुस्थानी ’ च्या खिचडीशीं संस्कृतनिष्ठ हिंदीचा कांहीं एक संबंध नाहीं. ती हिंदुस्थानी म्हणजे एक भाषिक विघटनेचा अत्याचार असून तो निष्ठुरपणें नामशेष करून टाकला पाहिजे. इतकेंच नव्हे तर प्रांतिक वा प्रादेशिक अशा प्रत्येक भाषेंतून इंग्रजी वा अरबी अनवश्यक परकीय शद्ब निष्ठुरपणें उच्छेदले पाहिजेत. आम्हीं इंग्रजीच्या वा कोणत्याहि भाषेच्या विरुद्ध नाहीं, इतकेंच नव्हे तर जागतिक वाङ्मय परिचयाचें सुलभ साधन म्हणून नि अनिवार्य आवश्यकता म्हणून इंग्रजी

भाषा अभ्यासली पाहिजे असें आम्हीं आग्रहपूर्वक प्रतिपादन करतों; पण परकीय शब्दांना, त्यांचें मूल्य पारखल्याविना नि त्यांची अनिवार्यता सिद्ध झाल्याविना आमच्या भाषेंत आक्रमण करूं देतां उपयोगी नाहीं. आमच्या बंगाली हिंदु बांधवांना या संबंधांत विशेषच धन्यवाद दिले पाहिजेत. कारण असल्या अनवश्यक परकीय शब्दांच्या अशुद्ध मिश्रणापासून बंगाली वाङ्मयानें प्रशंसनीय अलिप्तता राखली आहे. इतर प्रांतिक भाषासंबंधी नि वाङ्मया-संबंधी असें म्हणता येणार नाहीं.

हिंदु जगताची नागरी हीच राष्ट्रीय लिपी असली पाहिजे. आपला संस्कृतमधील मूळाक्षर संघ हा ध्वनिशास्त्रदृष्ट्या आजवर जगतांत निर्माण झालेल्या कोणत्याहि मूळाक्षरांच्या अपेक्षेनें अतिशय पूर्णत्वास पोचलेला आहे. आणि आज हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या बहुतेक सर्व लिपींनी तिचेंच अनुकरण केलेलें आहे. नागरी लिपींत हाच मूळाक्षर संघ घेतलेला आहे. आज दोन सहस्र वर्षेंपावेतों शतकानुशतकें सर्व हिंदुस्थानभर हिंदु साहित्य क्षेत्रांत हिंदी भाषेप्रमाणेंच नागरी लिपीहि प्रचलित आहे. आमच्या हिंदुधर्म-ग्रंथांची लिपी म्हणून "शास्त्री लिपी" असें तिला नामाभिधानहि प्राप्त झाले आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं अल्पस्वल्प सुधारणा केल्यास रोमन लिपीप्रमाणेंच तिलाहि आधुनिक यांत्रिक मुद्रणाची सुलभता प्राप्त करून देतां येईल. श्री. वैद्य आदिकरून गृहस्थांनीं महाराष्ट्रांत चाळीस वर्षांपूर्वी ही लिपी-सुधारणेची चळ-वळ हातीं घेतली. त्यानंतर माझे प्रेरणेनें संघटित चळवळ होऊन तिला प्रत्यक्ष व्यवहारांत ही सुधारणा प्रचलित करण्याचें श्रेय पुष्कळांशीं लाभलें आहे. नागरी ही आपली राष्ट्रीय लिपी सर्वत्र रूढ करण्याची पहिली पायरी म्हणून प्रांतो-प्रांतींच्या हिंदु वृत्तपत्रांनीं प्रत्येक अंकांत दोन स्तंभ तरी प्रांतिक भाषा नागरी लिपींमध्यें मुद्रित करावी, अशी माझी आग्रहपूर्वक सूचना आहे. बंगाली नि गुजराथी या भाषा नागरी लिपींत मुद्रित केल्या तर कित्येक प्रांतांत त्यांचें न्यूनाधिक्यानें वाचकांना आकलन करतां येईल. सर्व हिंदुस्थानभर एकमेव भाषा करणें अव्यवहार्य नि अजाणतेचें होईल. पण सर्व हिंदुस्थानांत सर्व सामान्य अशी एकमेव लिपी म्हणून नागरीला मान्यता देणें त्यापेक्षां पुष्कळच व्यवहार्य होईल. परंतु ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित अस-

लेल्या हिंदु लिपींना भविष्य काळांत स्थान राहील आणि नागरी समवेतच त्याही नांदू शकतील. हिंदु जगताचे सार्वत्रिक हिताचे दृष्टीनें तत्काल करण्यासारखी गोष्ट हीच कीं, हिंदी भाषेच्या समवेत प्रत्येक शाळेंत हिंदु विद्यार्थ्यांना नागरी लिपी हाहि आवश्यक विषय केला पाहिजे.

राष्ट्रभाषा आणि राष्ट्रलिपी यांचा हा प्रश्न सोडविण्यास दोन विख्यात कॉंग्रेस अध्यक्षांनीं कोणता उपाय सुचविला हे विचार करण्यासारखें आहे. मौलाना अबदुल कलाम आझाद हे हिंदुस्थानी भाषा सुचवितात आणि ती म्हणजे उर्दूच असा निर्वाळा देतात. पण पं. नेहरू त्यांच्याहि पुढें जाऊन म्हणतात कीं, २८ कोटी हिंदु असलेल्या हिंदुस्थानची राष्ट्रीय भाषा होण्यास उस्मानिया वा अलीगड विद्यालयांतील अत्यंत अरबी प्रचुर अशी उर्दू भाषा हीच सर्वांत अधिक पात्र आहे. देशगौरव सुभाषबाबूंनीं पंडितजींच्याहि कल्पकतेवर कडी करून हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून सुधारलेली सूचना केली कीं, रोमन लिपी हीच हिंदुस्थानाला सुलभ राष्ट्रीय लिपी म्हणून सर्वोत्कृष्ट ठरेल. हिंदुस्थानची म्हणे रोमन ही राष्ट्रलिपी ! काय या सूचनेची व्यवहार्यता ! वसुमती, आनंदबझार-पत्रिका आणि तुमचीं इतर बंगाली वृत्तपत्रें प्रतिदिनीं रोमन लिपींत प्रगट व्हावयाचीं ! या नव्या पद्धतीनुसार वंदेमातरम् गीत, "टोमारी प्रॅटीमा घाडी बे म्यॉंडीरे, म्यॉंडीरे," आणि गीता ही पुढील आकर्षक आवरणांत चाल चालू होणार ( Dharmakshettre Kurukshettre Shamavetha Yuyutsavah ) इत्यादी. अरबी लिपी मुद्रणास सुलभ नसल्यानें केमालपाशानें ती नष्ट करून रोमन लिपी स्वीकारली असें सुभाषबाबूंनीं सांगितले ते यथार्थ होय. पण त्या योगें उर्दू लिपीचा उमाळा प्रगट करणाऱ्या आमच्या मुसलमानांनीच बोध घ्यावयास पाहिजे. कारण येथे तर हिंदुंशीं कांहीं एक संबंध नसलेली अशी लिपी परिपूर्ण राष्ट्रलिपी म्हणून ते हिंदुंच्या माथीं मारीत आहेत. केमालपाशांनीं रोमन लिपी उचलली, याचें कारण तुर्कांना दुसरा कसलाच जुना आधार घेण्यासारखा नव्हता. अंदमानी लोक कवड्या गोळा करून त्याचा हार करतात पण म्हणून कुबेरानेंही तसेंच करावें काय ? उलट अरबस्थानला आणि युरोपला आम्ही हिंदुनीच नागरी लिपी आणि हिंदी भाषा अनुसरण्याचा उपदेश करण्यासारखा आहे. सर्व आर्यसमाजी गुरुकुलांत वेदांचा

रोमन लिपींतून अभ्यास आणि सर्व मराठ्यांची उर्दू ही राष्ट्रभाषा बनवावी अशा रीतीची सूचना गंभीरपणें अत्यंत व्यवहार्य म्हणून पुढें करणाऱ्या आमच्या येथील गाढ्या आशावादी लोकांना तरी निदान माझी वरील सूचना अव्यवहार्य वाटण्याचें कारण नाहीं.

( ८ )

# हिंदू-संघटणा

हिंदुमहासभा ही हिंदु जगताची राष्ट्रीय संघटना आहे. एखाद्या ख्रिस्ती मिशनसारखी हिंदुसभा ही केवळ धार्मिक संघटना आहे अशा भ्रांत कल्पनेनें इंग्रजी शिक्षण घेतलेल्या हिंदुंचा एक मोठा वर्ग हिंदुमहासभेपासून अलिप्त राहतो आणि हिंदुस्थानांतील व बाहेर राजकारणी मंडळींत हिंदुमहासभे-विषयीं उदासीनता असतें असें माझ्या प्रत्ययास आलें आहे. पण ही कल्पना अतिशय वस्तुस्थितीस सोडून आहे. हिंदुमहासभा म्हणजे कांहीं हिंदुमिशन नव्हें. ईश्वरी, एकेश्वरी, सर्वेश्वरी वा निरीश्वरी अशा प्रकारचें धार्मिक प्रश्न भिन्न भिन्न हिंदु संप्रदायावरच हिंदुसभा सोपविते. ती कांहीं हिंदुधर्ममहासभा नव्हे. तर हिंदु राष्ट्रीय महासभा आहे. म्हणून तिच्या घटनेनुसारच हिंदुमधल्या देखील कोणत्याहि विशिष्ट पंथाची वा संप्रदायाची पक्षपाती म्हणून पुढें येण्यास हिंदुसभेला प्रतिबंध आहे. हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या सर्व धर्मांचा समावेश करणारे राष्ट्रीय हिंदुधर्म पीठ ( चर्च ) त्याचें अहिंदुंच्या आघातापासून नि आक्रमणापासून संरक्षण करणें नि त्याचा प्रसार करणें हीं अशी हिंदुंची कार्यें हिंदूंची राष्ट्रीय संस्था म्हणून अर्थातच हिंदुमहासभा करील. पण केवळ धार्मिक अशा संस्थेहून तिचें कार्यक्षेत्र अतिशयच व्यापक नि संग्राहक आहे. हिंदू जगताचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि या सर्वांवरील राजकीय क्षेत्रांसह हिंदु जगताच्या समग्र राष्ट्रीय जीवनांशीं हिंदुमहासभा तादात्म्य मानते. हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्यबल नि वैभव यांचें ज्या योगें संवर्धन होईल त्या सर्व गोष्टींचें रक्षण आणि संवर्धन करण्यास हिंदुमहासभा बांधलेली आहे आणि हें ध्येय साध्य

होण्यासाठीं सर्व न्याय्य नि योग्य मार्गांनीं हिंदुस्थानचें निर्भेळ राजकीय स्वातंत्र्य किंवा पूर्ण स्वराज्य हिंदु महासभेला प्राप्त करून घ्यावयाचें आहे.

हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्यावर देखील हिंदुमहासभेनें आपलें अंगिकृत कार्य चालू ठेवलें पाहिजे. पुष्कळशा उथळ बुद्धीच्या टीकाकाकरांची अशी कल्पना दिसते कीं, मुस्लीम लीगचे किंवा काँग्रेस पुढाऱ्यांचे सध्यांचे हिंदुविरोधी धोरण यांना प्रतियोगित्वानें प्रतिरोधक शक्ति म्हणूनच केवळ योजण्यासाठीं हिंदुमहासभा उभी करण्यांत आली आहे, आणि हें तिचें आगंतूक समर्थक बाह्य कारण निघून गेलें म्हणजे ती निर्माल्यवत् होऊन आपोआपच विराम पावेल. परंतु या सभेचें ध्येय आणि उद्देश यांना जर कांहीं अर्थ असेल तर हें स्पष्ट होईल कीं, केवळ एखाद्या तात्कालिक पक्षाला विरोधण्यासाठीं किंवा एखादें गाऱ्हाणें दूर करण्यासाठीं क्षणिक उत्साहाच्या उद्रेकामुळें ती निर्माण झाली नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, कोणतीहि व्यक्ति वा संस्था जीवमान नि जगण्यायोग्य असेल तर बदलत्या परिस्थितीच्या विरोधी आवरणांत ती उभी राहिली असतां तिची संरक्षक आणि आक्रमक अशी उभयविध अंगें उपस्थित होतात. तद्वतच हिंदुराष्ट्र देखील काँग्रेसछाप भ्रांत राष्ट्रकल्पनेच्या गुदमरविणाऱ्या कोंडींतून आपली मुक्तता करून घेऊन आपल्या पायावर उभे राहिलें तेव्हां आधुनिक कालाच्या भिन्न परिस्थितींत जीवनसंग्रामांत झुंजण्यासाठीं त्यानें नवें साधन निर्माण केलें. हीच हिंदुमहासभा होय. ती क्षणिक प्रसंगानें निर्माण झाली नसून राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत आवश्यकतेपासून उद्भवली आहे. तिच्या उद्देशाची आणि ध्येयाची विविध अंगें पाहिलीं तर हें स्पष्ट होईल कीं, राष्ट्राच्या जीवनाइतकेंच तिचें कार्य चिरस्थायी आहे. पण तें असो. नित्य अस्थिर राजकीय घडामोडींना तोंड देण्यासाठीं आपलें धोरण ठरविण्याची दैनंदिन आवश्यकता घेतली तरी देखील हिंदुहितसंबंधांस जपण्यासाठीं नि संकटापासून त्यांचें रक्षण करण्यासाठीं हिंदु जगताला अशी एक स्वतंत्र नि केवळ हिंदूंची एक संघटना आवश्यक आहे कीं, ती कोणत्याहि अहिंदु वा उभयान्वयीं संस्थेच्या नैतिक नि बौद्धिक वर्चस्वाखालीं जातां कामा नये. सध्याच्या हिंदुस्थानच्या परतंत्र राजकीय परिस्थितीपुरतीच ही आवश्यकता नाहीं, तर हिंदुस्थान हें पूर्णपणें वा अंशतः स्वतंत्र होऊन

आपल्या राजकीय भवितव्याचें नियंत्रण राष्ट्रीय विधिमंडळाचे द्वारें करूं लाग-ल्यावर देखील हिंदुमहासभेसारखी केवळ हिंदूंची अशी संघटना निदान दोन शतकेंपर्यंत तरी हिंदु जगताच्या द्वाररक्षक स्तंभाप्रमाणें उभी असणें अधिकच आवश्यक आहे. मग ती सध्यांच्या हिंदुमहासभेचीच असो वा इतर कोणतीहि असो.

कारण कांहींतरी सर्वस्वी अघटित अशी व्यवहार्य राजकारणाच्या दृष्टि-पथांत न पडणारी घटना होऊन जगाच्या राजकारणाच्या चालू घडीची आमुलाग्र विघटना झाली नाही तोंपर्यंत निकटच्या भविष्यकालांत अनुमानानें संभाव्य वाटणारी अपेक्षा अशी कीं, आम्ही हिंदु इंग्रजावर प्रभाव पाडून वेस्टमिनि-स्टरच्या दंडकाच्या कक्षेत अभिप्रेत असलेली स्वयंशासित घटकाप्रमाणें हिंदुस्थानाची योग्यता मानणें इंग्रजांना अनिवार्य करूं शकूं. अशा स्वायत्त हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय विधिमंडळांत आज आहे तसेंच मतदार संघाचें स्वरूप प्रतिबिंबीत होईल. म्हणजे त्यांत हिंदु नि मुसलमान हे आज आहेत तसेंच राहतील. कदाचित् त्यांचें संबंध अधिक सुधारतील किंवा कदाचित् अल्प प्रमाणांत विघडतील. मुसलमानांची देशबाह्य कारस्थानें आणि हिंदुस्थानचें मुसलमानी राज्यांत परिवर्तन करण्याची त्यांची गुप्तप्रेरणा यामुळें स्वराज्यानं-तरच्या हिंदुस्थानी राज्यालाहि केव्हांना केव्हां मुसलमानांकडून परकीय आक्र-मकांना देशघातकी पाचारण किंवा अंतःस्थ युद्ध यांचा प्रसंग उपस्थित होणारच. कोणीहि व्यवहार-दर्शी मनुष्य हा संभव दृष्टिआड करूं शकत नाहीं. आपण दूरदर्शीपणा राखावयाचा तर स्वायत्त राष्ट्राच्या मालेंत हिंदुस्थान बसल्यावर देखील आपल्या दृष्टीपुढें वरील संभाव्य संकट नित्य ठेवलें पाहिजे. या संकटांस तोंड देण्यासाठीं हिंदुमहासभेसारखी केवळ हिंदु जगताचीच बलिष्ठ संघटना आपल्याला सबळ करण्यास निश्चित उपयोगी पडेल. केव्हांहि आधारासाठीं अवलंबण्याची राखीव शक्ति म्हणून तिचा उपयोग होईल. संयुक्त विधिमंडळा-पेक्षां अधिक परिणामकारक रीतीनें हिंदुंच्या दुःखाची वाच्यता करण्यासाठीं, भावी संकट वेळीच ओळखून हिंदुंना योग्य वेळीं सावधपणाची सूचना देण्या-साठीं आणि संयुक्त राज्य अभावितपणें एखादा राष्ट्रघातकी व्यूहांत जाऊं

लागल्यास त्या व्यूहाचा प्रतिरोध करण्यासाठीं अशा संस्थेची आवश्यकता राहील.

हिंदुस्थानांतलि हिंदुमुसलमानांप्रमाणें जेथें एखाद्या राज्यांत दोन वा अधिक परस्परविरोधी घटक नांदत असतील त्या ठिकाणीं त्यांतल्या अधिक सावध घटकानें बलिष्ठ विरोधी गटाचें राज्यावरील आक्रमणाचे वा प्रतारणेचे प्रयत्न हाणून पाडण्यास समर्थ व दक्ष असणारी आपली स्वतंत्र संघटना राखली पाहिजे. विशेषतः ज्या वेळीं त्या विरोधी घटकाचे संबंध देशाबाहेर सीमेपलिकडील परकीय राष्ट्रांशीं असतील अशा वेळीं तर ही संघटना राखलीच पाहिजे. असे विरोधी गट संयुक्त राष्ट्रीयत्वाच्या भावनेचें पोषण करून संयुक्त राष्ट्रांत विलीन होण्यास कधी काळीं हळूहळू शिकले तर शिकतील. तोपर्यंत अशा संयुक्त राज्यांतील घटकाचें द्वंद्व चालूच राहणार. हिंदुनी हें व्यावहारिक सत्य हृदयाशीं बाळगले तर हिंदु मनोभूमिकेंत जी आजच खोलवर बद्धमूल झाली असून सबळ होत आहे अशा अखिल हिंदुसंघटनेला भरीव नि समर्थ करण्याचा ते अधिकांत अधिक हिंदु प्रयत्न करतील. स्वराज्याच्या तुम्ही जसजसे अधिक संनिध जाल तसतशी बलिष्ट आणि एकजीव अशी अखिल हिंदुंची संघटना जसजशी प्रबलतर होत जाईल तसतसें तुम्ही खऱ्या स्वराज्याच्या संनिध जाल!

मला दिसतात त्याप्रमाणें हिंदुसंघटन चळवळीचा राष्ट्रीय नि राजकीय ध्येयवाद आणि तिचीं कांहीं मूलतत्त्वें नि प्रमेयें मी आतांपर्यंत विशद केलीं. आम्हांला हिंदु चळवळीची ही ध्येयनिष्ठा नि कल्पनाच व्यवस्थित मांडून लोकांपुढें ठेवावी लागत आहे. आणि भरीला भर म्हणून त्यांतच हिंदी राज्याच्या घटनेच्या आजच्या कल्पनेंतच क्रांति करण्यासारखें हिंदूलोकांच्या सार्वजनिक जीवनांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणें हाच त्या ध्येयाचा अर्थ आहे. आणि इतकें करून आपण हें पहिलेंच पाऊल टाकीत आहोंत यावरून पाहतां आमच्या व्याख्येप्रमाणें स्वतंत्र हिंदुस्थान निर्माण करण्याचे आमचें ध्येय प्राप्त करून घेणें शक्य होण्यापूर्वीं आम्हांला किती सातत्यानें नि परिश्रमानें झुंजावें लागेल हें दिसून येईल. एकदां ध्येय निश्चित झाल्यावर या युद्धाकडेच सर्वतोपरी लक्ष वेधलें पाहिजे. आणि म्हणून हें युद्ध अधिकांत अधिक परिणामकारक रीत्या

कसें चालवितां येईल आणि होणारा विरोध शक्य तितका मर्यादित कसा करतां येईल या संबधींचि धोरणाची आंखणी आपण शक्य त्या त्वरेनें केली पाहिजे.

आणि हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, ध्येय अचल राहिलें तरी तें गांठण्याचा मार्ग सरळ रेषेप्रमाणें क्वचित्‌च चालूं शकेल. वेळीं आपणाला विरोध तर वेळीं समन्वय, वेळीं युद्ध चालू ठेवणें, तर वेळीं मागें पाऊल घेऊन कटिबद्ध राहणें, या गोष्टी कराव्या लागतील. एखाद्या वेळीं आपल्या प्रतिपक्षीयांतल्या एकाशीं विशिष्ट विधेयापुरतें संगनमत करावें लागेल. तर पुढें त्याच संगत्याला विराधावेंहि लागेल. एकंदरीनें पाहतां इष्टसिद्धीच्या दृष्टीनें जर या क्रमानें आपण पुढेंपुढेंच जात राहूं तर आपल्या ध्येयाला पोंचण्याच्या दीर्घकालीन युद्धांत तात्कालिक अंगांमधील विसंगता हीच संगति होईल. मी आपल्यापुढें जें धोरण मांडणार आहे त्याकडे वरील व्यवहारचातुर्याच्या दृष्टीनें आपण पाहा. हें धोरण केवळ आपल्या प्राप्त परिस्थितीशीं फक्त संवद्ध आहे, त्रिकालवाधित असें निश्चित्तीनें घेऊं नये. आपली ही चळवळ अशीच चालून कधीं काळीं अशा स्थानावर येईल कीं, जेव्हां प्रचंड राक्षसी बलानें अप्रतिहतपणें पुढें सरसावून अधिकारवाणीनें नि अमर्याद वीरतेनें अशा इच्छित गोष्टी करण्यास समर्थ होईल कीं, ज्या आजच्या आपल्या अल्प आरंभाच्या वेळीं आपण कल्पिण्यास वा व्यक्तविण्यास देखील धजणार नाहीं.

हिंदुस्थानची अविभाज्यता राखणें हें आपल्या राजकीय कार्यामध्यें पहिलें आणि मुख्य लक्ष्य असलें पाहिजे. हिंदुस्थान म्हणजे केवळ तथाकथित ब्रिटिश हिंदुस्थान असा अर्थ नसून त्यामध्यें फ्रेंच नि पोर्तुगीज अधिकाराखालीं असलेल्या विभागांचाहि अंतर्भाव होतो. महाराष्ट्र नि बंगाल तसेंच गोमांतक नि पांडिचरी हे आमच्या मायभूमीचे अविभाज्य अवयव आहेत. सिंधु ते हिमालय तेथून पुढें तिबेट पुढें ब्रह्मदेश नि ब्रह्मदेशापासून दक्षिण आणि पश्चिम समुद्र यावरून या आमच्या देशाची सीमारेषा जात आहे. काश्मिर आणि नेपाळ, गोमांतक आणि पांडिचरी नि इतर फ्रेंच प्रदेश हे सर्व मिळून आमचा राष्ट्रीय भौगोलिक विभाग होतो आणि तो सर्वच्या सर्व एका स्वतंत्र केंद्रित सत्तेच्या राज्यांत संघटित

पणें समाविष्ट झाला पाहिजे. तो चिरंतन अविभाज्य नि अविभक्त राहिला पाहिजे. हिंदुस्थानचें हें प्रादेशिक नि राष्ट्रीय अविभाज्यत्व तोडण्याचा कोणताहि प्रयत्न, उदाहरणार्थ, हिंदु नि मुसलमान अशा अधिकार-कक्षेमध्यें तुकडे पाडण्याचा आजचा प्रयत्न या सर्वांच्या प्रवर्तकांस आपलें सामर्थ्य एकवटून प्रतिरोध करणें आणि राष्ट्रघातक नि राष्ट्रवंचक म्हणून त्यांस शासन करणें अवश्य आहे.

नुसतें भौगोलिक दृष्ट्याच बोलावयाचें तर एखाद्या अल्लाउद्दीन खिलजीचें किंवा औरंगजेबाचें राज्य चालू असतेवेळींहि दुसऱ्या कोणत्याहि अहिंदु सत्तेपासून भूमि व राज्य या नात्यांनीं हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्रच होतें. परंतु हिंदुस्थानचें त्या प्रकारचें स्वातंत्र्य हें हिंदु राष्ट्राला खरें-खरें मृत्यूचेंच आज्ञापत्र ठरलें. संग आणि प्रताप-गुरु गोविंदसिंह नि बीरबंदा-शिवाजी नि बाजीराव आपल्या या मातृभूमींत सर्वत्र जे लढले नि पडले नि अंतीं जयहि पावून मराठ्यांच्या नि रजपुतांच्या नि शीखांच्या नि गुरख्यांच्या सत्तेखालीं हिंदु साम्राज्याची प्रस्थापना करते नि अहिंदु अतिक्रमणाच्या मुठींतून आपलें हिंदुजगत् रक्षिते झाले ते ह्याच कारणानें होत. यावरून हिंदुस्थानचें निव्वळ भौगोलिक स्वातंत्र्य किंवा स्वराज्य म्हणजे कांहीं हिंदु राष्ट्राचें स्वातंत्र्य नव्हे इतकेंच नव्हे, तर उलट केव्हां केव्हां त्यांच्या जातीला तें दारुण शापच ठरतें असेंच स्पष्ट सिद्ध होत नाहीं काय ?

(९)

## ‘ एक मनुष्य एक मत ’

हिंदुस्थान हें हिंदुजातीचें आरंभापासून आजपर्यंतचें निवासस्थान आहे, ती आमच्या धर्मप्रवर्तक ऋषिमुनींची नि वीरपुरुषांची नि देवांची नि संतमहंतांची जन्मभूमि आहे. ह्याच कारणानें तें आम्हांला प्रिय आहे.

नाहींतर केवळ भूमीस भूमि एवढ्यापुरतांच विचार करावयाचा तर पृथ्वीच्या पाठीवर सोन्या-रुप्यानें इतकेंच संपन्न असलेले पुष्कळ देश असतील. नुसते नदीला नदी इतकेंच पाहावयाचें तर मिसिसिपी हीहि जवळजवळ गंगेइतकीच निर्मळ आहे आणि तिचें पाणीहि कांहीं एकंदरीनें कडवट नाहींच. हिंदुस्थानांतील दगड नि झाडे नि हिरवळी हीं इतर देशांतल्या त्या-त्या जातीच्या दगड नि झाडें नि हिरवळींइतकींच उत्कृष्ट वा निकृष्ट ठरतील. हिंदुस्थान हें जी आमचीं पितृभू नि पुण्यभू आहे तें कांहीं ती पृथ्वींतल्या दुसऱ्या कोणत्या भूमीहून पूर्णपणें विसदृश भूमि आहे म्हणून नव्हे, तर त्याचा आमच्या इतिहासाशीं जिव्हाळयाचा संबंध आहे आणि तें आमच्या वाडवडिलांचें पिढ्यानुपिढ्यांचें घर आहे-कीं ज्यांत आमच्या मातांनीं पिढीपिढीला आपल्या हृदयांशीं धरून आम्हांला पहिलें स्तन्य पाजलें नि आमच्या पित्यांनीं आपल्या मांड्यांवर घेऊन आम्हांला थोपटलें त्या कारणामुळेंच होय.

जेथें आपलीं प्रिय माणसें राहतात ती झोंपडी इतर ठिकाणच्या एखाद्या राजवाड्यापेक्षांहि आपल्या दृष्टीला अधिक आवडती वाटते. पण तींच तेथलीं प्रिय मुलकमलें तेथून दिसेनाशीं होऊं द्यात नि तेथून दुसरीकडे कोठें राहावयास जाऊं द्यात कीं पूर्वीची तीच झोपडी लागलीच एक उजाड खोपटें भासूं लागते. आपण तात्काळ तिचा त्याग करतों नि आपल्या प्रिय माणसांचा माग काढीत त्यांच्या नवीन निवासस्थानाकडे चालूं लागतों. हीच गोष्ट राष्ट्रांची. ज्यू किंवा पारशी यांचेंच उदाहरण पाहा. जेव्हां अरबांनीं त्यांच्यावर चाल केली आणि आपली भूमि किंवा आपली वांशिक नि सांस्कृतिक आत्मीयता यांतला कशाचा त्याग पत्करावयाचा एवढेंच ठरविणें त्यांच्या हातीं उरलें, तेव्हां आपल्या धार्मिक नि वांशिक आत्मीयतेपेक्षां भूमीचाच त्याग करून ते आपला धर्मग्रंथ नि आपली संस्कृति यांसह एखाद्या अधिक हितकर निवासस्थानाच्या शोधार्थ बाहेर निघून गेले. निव्वळ एका पेजेच्या खापराकरितां-नुसत्या निर्जीव मातीच्या एका तुकड्याकरितां त्यांनीं आपल्या वांशिक आत्म्याची देवाण करण्याचें साफ नाकारलें!

एवंच निव्वळ भूगोलावरील हिंदुस्थान नांवाच्या एका मातीच्या तुकड्याचें स्वातंत्र्य हा कांहीं स्वराज्याचा खरा अर्थ नव्हेच. हिंदूंना त्यांचें हिंदुत्व—त्यांची धार्मिक नि वांशिक नि सांस्कृतिक एकात्मता अबाधित राहण्याची शाश्वती जर त्यांत असेल तर तेंच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य काय तें मोलाचें वाटूं शकेल. आमच्या ' स्वत्वा ' चें—आमच्या साक्षात् ' हिंदुत्वा ' चें मोल देऊनच जें मिळणें शक्य असेल त्या तसल्या ' स्वराज्या ' करितां झगडण्याला नि मरण्याला आम्ही सिद्ध नाहीं!

ह्या योग्य नि खऱ्या अर्थाचें जर स्वराज्य अभिप्रेत असेल तर हिंदी स्वातंत्र्याकरितां चाललेल्या चळवळींत नि झगड्यांत आणि एक संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या कार्यांत हिंदू सर्वांच्या पुढें आघाडीवरच राहत आले आहेत. संयुक्त हिंदी राज्याचें स्वप्न जर पहिल्यानें कोणाला पडलें असेल तर तें त्यांनाच होय. आपल्या त्यागांनीं नि झगड्यांनीं तें राज्य कोणीं आजच्या व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेंत आणलें असेल तर तेंहि पुन्हां हिंदूंनींच होय. आपल्या बलाबलाचा योग्य विचार करून हिंदू हे एक समान नि संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या हेतूनें चाललेल्या ह्या सार्वलौकित झगड्यांत आपल्या अहिंदू वर्गांतील देशबांधवांची सहकारिता मिळविण्याला केव्हांहि अनुकूलच होते व आहेत. हिंदुस्थानांत आपली प्रचंड बहुसंख्या आहे, इतर अहिंदु वर्ग नि विशेषतः मुसुलमान हे राष्ट्रीय झगडा चालू असतांना कोठेंच आढळत नाहींत नि त्या झगड्याचीं फळें तोडण्याच्या वेळीं मात्र नेमके आघाडीस असलेले आढळतात, आणि आपण एकटेच आजवर सर्व लढा लढत नि त्यांतले आघात सोशीत आलों आहोंत,—या सर्व गोष्टींची जाणीव असूनसुद्धां तें एकीकडे ठेवून हिंदू हे सार्वलौकिक संयुक्त हिंदी राष्ट्र बनविण्यास समुत्सुक आहेत आणि आपले कोणतेहि राखून ठेविलेले असे स्वतंत्र हक्क वा सत्ता वा अधिकार हिंदुस्थानांतील अहिंदु वर्गांवर मुळींच लादुं इच्छीत नाहींत.

पण तें हिंदी राज्य मात्र निर्भेळ हिंदीच असूं द्या. त्या राज्यानें मताधिकार, नोकऱ्या, हुद्दे, कर यांच्या संबंधांत धर्माच्या व जातीच्या तत्त्वावर कसल्याहि मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळींच थारा देऊं नये. कोणताहि मनुष्य हिंदु आहे कीं मुसलमान आहे कीं ख्रिस्ती आहे कीं ज्यू आहे इकडे लक्ष्यच दिलें जाऊं

नये. त्या हिंदी राज्यांतील सर्व नागरिक सर्वसामान्य लोकसंख्येंतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेंकडेवारी विचारांत घेतली न जातां त्यांच्या-त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणांनुसार वागविले जाऊं द्या. इंग्लंड किंवा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें यांसारख्या जगांतील इतर प्रत्येक राष्ट्रांत असतें त्याप्रमाणें देशांतील प्रचंड बहु॰ संख्य लोकांना समजत असेल तीच भाषा नि तीच लिपि त्या हिंदी राज्याची राष्ट्रीय भाषा नि राष्ट्रीय लिपि होऊं द्या, आणि कोणत्याहि लादलेल्या नि वेड्या वांकड्या संकरानें ती भाषा नि ती लिपि भ्रष्ट करण्याला कोणत्याहि धार्मिक कारणाला मोकळीक न मिळूं द्या. कोणतीहि जाति किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारांत न घेतां 'एक मनुष्य एक मत' असा सर्वसामान्य नियम होऊं द्या. अशा स्वरूपाचें हिंदी राज्य जर दृष्टीपुढें धरावयाचें असेल तर हिंदु-संघटणावादी स्वतः हिंदुसंघटनाच्याच हितार्थ त्या राज्याला अंतःकरणपूर्वक पहिल्यानें आपली निष्ठा अर्पितील. मीं स्वतः आणि मजप्रमाणेंच सहस्रों 'हिंदुमहासभा' वाले यांनीं आमच्या राजकीय चरिताच्या प्रारंभापासूनच अशा हिंदीराज्याचा आदर्श आमचे राजकीय साध्य म्हणून सतत दृष्टीपुढें ठेविलेला आहे आणि आमच्या जीविताच्या अंतापर्यंत त्याच्या परिपुर्तीकरितांच झगडण्याचें आम्ही चालूच ठेवणार. हिंदी राज्यासंबंधीची ह्याहून अधिक राष्ट्रीय अशी कोणती कल्पना असूं शकल काय ?

न्यायदेवतेच्या आज्ञेनें मीं असें स्वच्छपणें घोषित करतों कीं हिंदी राज्या-संबंधींचे 'हिंदुमहासभे' चें नियत कार्य नि धोरण हीं प्रत्यक्ष 'हिंदी राष्ट्रीय सभे'च्या सद्यःकालीन धोरणाहून अधिक राष्ट्रीय आहेत.

आपण हिंदु आहों किंवा हिंदी लोकसंख्येमध्यें इतर अहिंदु वर्गांतील देश बांधवांपेक्षां केवढी तरी मोठी आपली बहुसंख्या आहे ह्या विशेष कारणांच्या बळावर हिंदी नागरिक ह्या नात्यानें प्राप्तव्य असेल त्याहून कांहींहि अधिक हिंदु मागत नाहींत. आपण हिंदु नसून मुसलमान आहों हा विशेष गुण आपल्या ठिकाणीं आहे असलें धर्मपिसाटपणाचें कारण पुढें करून त्याकरितां कांहीं विशेष लाभ किंवा संरक्षण किंवा मताधिक्य न मागतां ह्या खऱ्या खऱ्या राष्ट्रीय हिंदी राज्याला मिळण्यास मुसलमान सिद्ध आहेत काय ?

हिंदुंच्या सद्भाग्यानें म्हणा, मि. जिना व इतर 'मुस्लीम लीग' वाले यांनीं 'मुस्लीम लीग'च्या लखनौ येथील बैठकींत जाणून बुजूनच आपले खरे अंतःस्थ हेतू ह्यापूर्वीपेक्षां अधिक अधिकृतरित्या, अधिक उघडपणें नि अधिक धिटाईनें बोलून दाखविले आहेत, त्याकरितां मी त्यांचें आभार मानतों. संगतींत वागतांना एखाद्या संशयास्पद मित्रांपेक्षां उघड शत्रू अधिक पुरवितों. लखनौस झालेले त्यांचे ठराव वस्तुतः आम्हाला कांहीं नव्या वार्तेसारखे वाटणारे नाहींत. पण मुसलमानांची अराष्ट्रीय प्रवृत्ति नि त्यांच्या 'सर्वमुस्लीमीकरणा'च्या आकांक्षा सिद्ध करण्याचा भार आतांपर्यंत उणा–अधिक हिंदुंवरच जो होता त्याचें आयतेंच काम झालें. आतां मुसुलमानाच्या त्या सर्व हिंदुविरोधी, हिंदी-विरोधी नि बहिर्देशीय कारवाया स्पष्ट करून सांगण्याकरितां नुसतें लखनौंच्या बैठकींत करण्यांत आलेल्या लीगच्या अधिकृत भाषणांकडे नि ठरवांकडे बोट दाखविलें कीं झालें. त्यापेक्षां आपल्या अधिक कांहींच करावयाला नको. त्यांना निर्भेळ उर्दू हीच हिंदी राज्याच्या राष्ट्रभाषेच्या पदवीला चढविली जावयाला पाहिजे आहे. दोन कोटींहून अधिक मुसलमानांकडून स्वतःलाहि मातृभाषा म्हणून ती बोलली जात नाहीं, मुसलमान धरूनसुद्धां हिंदुस्थानांतील सुमारे वीस कोटी लोकांना ती समजत नाहीं, आणि सुमारे सात कोटी लोकांचीं मातृ-भाषा असलेल्या नि आणखी सुमारे दहा कोटी लोकांना सुलभतेनें समजत असलेल्या हिंदीपेक्षां वाङ्मयीन गुणसुद्धां तिच्यांत कोणतेच अधिक नाहींत,— यांपैकीं कोणतीच गोष्ट ते विचारांत घेऊं इच्छीत नाहींत! उर्दू ही जिच्यावर पोसली जाते ती प्रत्यक्ष अरबी भाषा तिकडे साक्षात् खलिफांच्याच भूमींत केमालनें नि तुर्कांनीं बहिष्कृत ठरविली असतांना इकडे मात्र सुमारें पंचवीस कोटी हिंदुंनीं उर्दू शिकावी नि आपली राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारावी अशी मुसलमान अपेक्षा धरीत आहेत! राष्ट्रीय लिपीच्या संबंधांतहि उर्दू लिपिच स्वीकारण्याविषयीं मुसलमानांचा आग्रह आहे, आणि कांहीं झालें तरी नागरी लिपीशीं मात्र त्यांना कर्तव्य नाहीं! असें कां? आजच्या गरजेला लागू न पडणारी म्हणून केमालनें प्रत्यक्ष अरबी लिपीचा त्याग केलेला असो; नागरी अधिक सशास्त्र नि अधिक मुद्रणक्षम असो, ती शिकावयाला अधिक सोपी असो, हिंदुस्थानांतील सुमारें पंचवीस कोटी लोकांत ती आधींच प्रचलित

असो किंवा त्यांना आधींच ती समजत असो,-तरीसुद्धां मुसलमान आपली सांस्कृतिक मत्ता म्हणून मानतात एवढ्याच एका गुणाकरितां उर्दू लिपी हीच राष्ट्रलिपि नि उर्दू भाषा हीच राष्ट्रभाषा झाली पाहिजे! आणि म्हणून त्यांना तें स्थान देण्याकरितां हिंदुस्थानांतील हिंदु नि अन्य मुसलमानेतर वर्ग यांच्या संस्कृति खड्ड्यांतच गेल्या पाहिजेत! मुसलमानांना 'वंदेमातरम्' गीतहि सहन होईनासें झालें आहे. विचारे ऐक्याचे आशिक हिंदु! त्यांनीं लागलींच तें गीत तोडून आंखूड करण्याची सुद्धां त्वरा केली! पण आज्ञेप्रमाणें काटाकाट करून ठेवलेला त्याचा भागहि मुसलमान सहन करतात असें नाहीं. तुम्हीं तें सबंध गीत गाळून टाका, कीं लागलींच नुसते 'वंदे मातरम्' हे शब्द सुद्धां मुसलमान आपला मूर्तिमंत अपमान असल्याची हाकाटी करतांना तुम्हांला आढळतील! एखाद्या अत्युदार अशा रवींद्राकडूनहि एखादें नवीन गीत रचून घ्या, पण तरीहि मुसलमानांचा त्यांच्याशीं कांहींहि संबंध असणार नाहीं. कारण किती झालें तरी रवींद्र हा हिंदु माणूस पडल्यामुळें 'कउम्' च्या ठिकाणीं 'जति' किंवा 'पाकस्तान' च्या ठिकाणीं 'भारत' वा 'हिंदुस्थान' असे कांहीं संस्कृत शब्द वापरण्याचा घोर अपराध तो केल्यावांचून राहणें शक्य नाहीं! एखाद्या इक्बलनें किंवा जिनानेंच स्वतः निर्भेळ उर्दूंत रचिलेलें नि हिंदुस्थानाला एक 'पाकस्थान'-मुस्लीम अधिराज्याला अर्पिलेली भूमि-म्हणून जयजयकारणारें असें एखादें राष्ट्रगीत सिद्ध झाल्यावांचून त्यांचें समाधान होणें शक्य नाहीं!

मुसुल्मानांच्या ह्या असंतोषाच्या मुळाशीं असलेला खरा प्रश्न इकडचा एखादा शब्द किंवा तिकडचें एखादें गीत अशा प्रकारचा नाहीं हें आमच्या ऐक्यबुभुक्षितांत ओळखणार तरी केव्हां? हिंदुस्थानच्या ऐक्यांत नि वीरवृत्तींत जर त्यायोगें आमच्याकडून खरी-खरी भर पडूं शकती तर आम्हीं बारा गीतें नि शंभर शब्दांचा आपण होऊन त्याग केला असता. पण हा दिसतो तितका साधा-सुधा प्रश्न नाहीं हें आम्हीं ओळखतों. दोन विभिन्न संस्कृती नि वंश नि राष्ट्रें यांच्यांतला हा लढा आहे आणि या क्षुल्लक गोष्टी म्हणजे मुसुल्मानांच्या मनांत खोल मुरलेल्या त्या रोगाचीं केवळ वरवरचीं नि ओझरतीं लक्षणें आहेत. त्यांना हिंदुजगत् नि हिंदुस्थानांतील इतर मुसुल्मानेतर वर्ग यांच्या कपाळावर आत्म-

१०८०२

शरणागतींची नि मुस्लीम वर्चस्वाची तप्तमुद्राच ठोकावयाची आहे. पण आम्ही हिंदू केवळ हिंदुजगाच्या हितार्थच नव्हे तर हिंदी राष्ट्राच्या हितार्थसुद्धां ती गोष्ट यापुढें यत्किंचित्हि सहन करणार नाहीं.

पण आम्हीं गोष्ट सहन केली नाहीं तर आमचें काय होईल तें नामदार फझलूल हक्कांनीं लखनौलाच तेथल्या तेथें सांगूनहि टाकिलें ! 'मुख्य मंत्र्या' च्या गादीच्या उच्च उंचीवरून त्यांनीं उघडपणें आश्वासन दिलें आहे कीं जर इतर हिंदूंनीं इतर कोठें 'मुस्लील लीग' च्या आज्ञा प्रतिधिटाईनें धाब्यावर बसविल्याचें आढळलें तर आपण बंगालांतील हिंदूंना 'सतावूं' (–'मै हिंदूओंको सताऊंगा') वास्तविक बंगालमधील मुख्य मंत्र्याची ती गादी म्हणजे बंगालमधील हिंदु देशभक्तांनींच आपल्या हौतात्म्यानें नि त्यागानें इंग्रजांच्या हातांतून झगडून घेतलेल्या सुधारणांचेंच फल आहे. इतर ठिकाणच्या प्रमाणेंच तेथील मुसलमानांनींहि हालअपेष्टांत नि त्यागांत कांहीं विशेष भाग किंवा भार उचललेला नाहीं. पण सुधारणा येऊन प्राप्त होतांच मुख्य मंत्र्याच्या गादीला मात्र कोण पात्र ठरूं नि ती बळकावूं शकला ? तर नामदार फझलूल हक्क ! आणि जे सर्वांत अधिक झगडले नि ज्यांनीं सर्वांत अधिक हालअपेष्टा सहन केल्या नि खरोखरच मि. हक्कांची गादीहि ज्यांच्या हाल–अपेष्टांचेंच ऋण आहे त्या बंगाल्यांतल्या हिंदूंनाच आतां ते मि. हक्क साध्या त्रास देण्यापासून तों पूर्ण चेपून टाकण्यापर्यंत सर्व छटांच्या अर्थांनीं आपण 'सतावूं' (–'सतायगा'–) म्हणून धमकी घालीत आहेत ! नामदार फझलूल हक्क यांना मी असें निश्चितीनें सांगूं इच्छितों कीं बंगालमधील हिंदू फुटण्याला फार कठिण कवचीचे ठरतील, त्यांचें काम फार बिकट आहे. त्यांनीं केव्हां–केव्हां बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याच्याहि लॉर्ड कर्झन सारख्या घोड्यावर चढलेल्या पुरोधिकाऱ्यांना खालीं उतरावयास लाविलेलें आहे ! पण जर फझलूल हक्कांनीं बंगाली हिंदूंचा कधीं छळवाद आरंभिलाच, तर आम्हीं हिंदूहि महाराष्ट्रांत नि इतरत्रहि पुरतें कांठोकांठ नि हलवून भरलेलें मापास माप ह्या न्यायानें त्यांच्या जातभाईंना तसेंच वागवूं शकूं हें त्यांनीं कदापि विसरूं नये !

'जातीय निवाडा' (कम्युनल अवॉर्ड) नि 'संयुक्त राज्यघटना' फेडरेशन यांच्या संबंधांतल्या मुसुलमानांच्या प्रवृत्तीचा मला येथें निर्देश

करण्याची आवश्यकता नाहीं. त्या संबंधांतहि हिंदूंना पूर्ण नमविण्याचा त्यांचा विचार आहे नि शायलॉकसारखा शेरभर मांसाचा ते हट्ट धरीत आहेत! मी तुम्हांला भाराभर आंकड्यांनीं हैराण करूं इच्छीत नाहीं. ते तुम्हां सर्वांना पाठच आहेत. काश्मीर, पंजाब, पेशावर नि सिंध या प्रांतांचा मिळून 'पाकस्थान' नांवाचा एक निराळा मुसलमानी देश बनविण्याच्या हेतूनें मुसलमानी हिंदुस्थान नि हिंदु हिंदुस्थान असे आपल्या मातृभूमीच्या राज्यमंडळाचे दोन तुकडे पाडण्याच्या मुसलमानांच्या मागणीसंबंधींच्या निर्लज्ज नि धाष्टर्याच्या सूचनेवर 'मुस्लीम लीग' मध्यें जो वादविवाद झाला त्याचीच तुम्हांला आठवण करून करून दिली कीं पुरे आहे.

हात आवरा, खाविंद, हात आवरा! अशा रीतीनें हिंदूंना त्यांच्याच देशांत दासांच्या पदवीला आणून सोडण्याचा जर तुम्हीं रोख धरीत असाल तर तेथें साम्राज्यसत्ता वहिवाटीत असतांच्या काळांतहि अनेक औरंगजेबांची मालिका सुद्धां तें अचाट कृत्य करण्यांत अपेशी ठरली आणि तो बेत तडीस नेण्याच्या प्रयत्नांत तिनें केवळ आपल्या स्वतःकरितां थडगें खणण्याचेंच यश मिळविलें हें चांगलें स्मरणांत असूं द्या! अनेक औरंगझेब जें साध्य करतांना अपेशी ठरले तें अनेक जिना नि अनेक हक्क निःसंशयच साध्य करूं शकत नाहींत.

हिंदूंच्या हें ध्यानांत येऊं द्या कीं ह्या खोडसाळपणाचें खरें कारण दुसरें तिसरें कोणतें नसून हिंदु-मुस्लीम-ऐक्यरूपी पिशाच्चदीपिके ('वुइलो-द-विस्प') च्या मागें लागण्याचा हिंदूंनाच लागलेला सोस हेच होय. ज्या दिवशीं आपण मुसुलमानांनीं हिंदूंशीं सहकार्य करण्याचा उपकार केल्यावांचून स्वराज्य मिळू शकणार नाहीं अशी त्यांची समजूत करून दिली त्याच दिवसापासून आपण सन्मान्य ऐक्य अशक्य करून बसलों आहोंत. जेव्हां कोणत्याहि देशांतील एखादी प्रचंड बहुसंख्या मुसुलमानांच्या सारख्या विरोधी अल्पसंख्येपुढें गुडघे टेंकून विनवणीपूर्वक साहाय्याची याचना करूं लागते नि तदभावीं आपली बहुसंख्य जाति निश्चित मरणार असल्याविषयींची तिला ग्वाही देते, त्या वेळीं जर त्या अल्पसंख्य जातीनें आपलें साहाय्य शक्य तितक्या भारी मोलाला विकलें नाहीं, त्या बहुसंख्य जातीचें तें ठरलेलें भवितव्य त्वरेनें ओढवून आणलें नाहीं, नि त्या देशांत आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित केलें नाहीं, तर तें एक आश्चर्यच ठरेल.

मुसलमान वेळोवेळीं हिंदूंना जो कांहीं परिणामाचा धाक धाक म्हणून दाखवीत असतात तो एवढाच कीं त्यांच्या अराष्ट्रीय नि पिसाटपणांच्या मागण्या जागच्या जागीं पुरविल्यावांचून हिंदी स्वातंत्र्याच्या झगड्यांत ते हिंदूंना मिळणार नाहींत. हिंदूंनीं आतां एकदांचें रोख-ठोक सांगून टाकून त्यांची ती धमकी गप्प करावी कीं–" मित्रहो ! आम्हांला केवळ त्याच प्रकारची एकी पाहिजे होती नि पाहिजे आहे कीं जिच्यायोगानें ज्यांत जाति वा पंथ वा वंश वा धर्म यांचा विचार न करतां सर्व नागरिक ' एक माणूस एक मत ' ह्या तत्त्वावर समसमान रीतीनें वागविले जातील असें हिंदी राज्य निर्माण होईल. ' आमची ह्या देशांत जरी प्रचंड बहुसंख्या असली तरी हिंदुजगाकरितां आम्हीं कोणतेहि विशेष अधिकार मागत नाहीं; इतकेंच नव्हे तर जर आपापल्या घरांतून आपापले मार्ग अनुसरण्याच्या हिंदुस्थानांतील इतर जातींच्या समान स्वातंत्र्यांत ढवळाढवळ करणार नाहीं आणि हिंदूंना नमविण्याचा नि त्यांच्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करणार नाहीं असें वचन मुसुलमान देतील तर त्यांची भाषा, संस्कृति नि धर्म यांच्या विशेष संरक्षणाची हमी देण्यासहि आम्ही अनुकूल आहों. परंतु अगदीं अलीकडे आक्रमक नि संरक्षक संधींनीं परस्परांशीं बांधल्या गेलेल्या अरबस्थानपासून अफगाणिस्थानापर्यंतच्या मुसुलमान राष्ट्रांची सांखळी जोडून सर्व इस्लामीकरणाच्या चळवळीच्या चालू असलेल्या हिंदूविरोधी योजना आणि धार्मिक नि सांस्कृतिक द्वेषानें हिंदूंना चिरडण्याच्या वायव्य सीमेवरील टोळ्यांच्या क्रूर प्रवृत्ती आम्ही हिंदु पुरेपुर ओळखून असल्यामुळें आम्हीं इतःपर केव्हांहि तुमच्यावर विश्वास टाकून आणखी कोणते ' कोरे–कागद ' तुम्हांला देणार नाहीं. इतर सर्व घटकांच्या ' स्वत्वा ' सवेंच आमचें ' स्वत्व ' हि ज्यांत सुरक्षित राहील तें स्वराज्य जिंकून घेण्याला आम्ही सिद्ध झालों आहोंत. केवळ एक धनी जाऊन दुसरा धनी यावा म्हणून कांहीं इंग्लंडशीं झुंझ खेळण्याला आम्ही उद्युक्त झालेलों नाहीं, तर आमच्या स्वतःच्या घराचे आम्ही स्वतःच धनी झालों पाहिजे हाच आम्हां हिंदूंचा रोख आहे. आमच्या शरणागतीवर नि स्वतः हिंदुत्वाचेंच मोल देऊन जें मिळूं शकणार असेल तें तसलें स्वराज्य आम्हां हिंदूंना आमच्या आत्महत्त्येसारखेंच आहे. परकीय अधिराज्यांतून जर हिंदुस्थान स्वतंत्र झालें नाहीं तर हिंदी मुसुलमानांना स्वतः दास होण्यावांचून

गत्यंतर नाहीं. जर त्यांना ह्या गोष्टीची सत्यता पटेल, जर नि जेव्हां हिंदूंच्या साहाय्यावांचून नि सदिच्छेवांचून आपलें चालणार नाहीं हेंहि त्यांना कळून येईल, तर त्यांनाच त्या वेळीं ऐक्याची मागणी करण्याला नि तेंहि हिंदुवर उपकार करण्याकरितां म्हणून नव्हे तर स्वतःच्याच उपकाराकरितां येऊं द्या. अशा प्रकारें जें हिंदुमुस्लीम ऐक्य घडून येईल तेंच खरें मोलाचें होय. मागें लागून ऐक्य मिळविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे तें गमावणेंच आहे हें ह्या प्रकरणांत हिंदूंना भरपूर मोल जाऊन पटलेलें आहे. यापुढें हिंदु-मुस्लीम ऐक्यासंबंधींचें हिंदुंचें सूत्र हेंच राहणार कीं–" याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावांचून, विरोधाल तर तुमच्या विरुद्धहि, हिंदु राष्ट्र आपलें भवितव्य बनेल तसें घडवील ! "

( १० )

# सीमेवरील राज्यें

पूर्वेकडील सीमेवरील ब्रह्मदेश आणि ईशान्य सीमेवरील तिबेट या आमच्या पार्श्वनिवासी राज्यांविषयीं आमचें धोरण शक्य तों मित्रत्वाचें आणि त्यांची इच्छा असेल तर राजकीय संगनमताचेंहि राहील. ते आमचे धर्मबांधव असून आमचे राजकीय हितसंबंधहि मूलतः विरोधी नाहींत. इतकेंच नव्हे तर आम्ही राजकीय संगनमत करून राहिलों तर आमच्या परस्परांच्या राजकीय शक्तींत सामान्यतः भरच पडलेली दिसून येईल.

पण वायव्य--सीमेवर असलेल्या मुसलमान राज्यासंबंधीं नि जातीसंबंधीं आम्ही सावधानतेचेंच धोरण ठेवल्याविना चालणार नाहीं. गेलीं कित्येक शतकें त्यांची प्रवृत्ति हिंदूंशीं धर्मवेड्या शत्रुत्वाची आहे, आणि पुढें एक शतकभर तरी ती तशीच चालण्याचा संभव दिसतो. ही सीमा मुसल्मानी सैन्यावर कधींहि अवलंबून न ठेवतां अधिकतम हिंदु सैन्यानें संरक्षित असली पाहिजे, असा हिंदु-संघटक पक्षाचा नित्याचा कटाक्ष राहणें अवश्य आहे. त्या सीमावर्ती राज्याशीं मित्रत्वाचे संबंध जोडण्यास आम्ही सदैव सिद्ध असावें नि अनवश्यक वितुष्टाला

निमित्त पुरवूं नये. परंतु त्या मुसलमान जातीकडून होणाऱ्या आकस्मिक आक्रमक उत्थानास नि त्या खिंडीतून येऊं पाहणाऱ्या कोणाहि हिंदुविरोधी परकीयाचे अपहारक हस्तक्षेपास प्रतिरोधण्यासाठीं आमचीं तेथील सैन्यें नित्य दक्ष नि युद्धकालिक सन्नद्धतेंत असलीं पाहिजेत.

नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्याशीं सर्व हिंदुजगत् अतीशय निष्ठेनें निगडित आहे आणि त्या राज्याचें अखंडत्व नि मान राखण्यासाठीं हिंदुजगत् सर्वशक्ति एकवटून यत्न करील. अवमानकारक अशा परकीय नि अहिंदु ध्वजानें कधींहि कलंकित न झालेलें खरें धर्मक्षेत्र असें ज्यास म्हणतां येईल असा आमच्या मातृभूमीचा तो एकमेव विभाग आजवर राहिला आहे. एका पराक्रमशाली हिंदु जातीचें निवासस्थान असलेल्या नेपाळी हिंदुराज्याच्या स्वातंत्र्यामध्यें हिंदुंची आशा नि अभिमान हीं केंद्रित झालीं आहेत. नेपाळच्या सामर्थ्याला वाढविणारा प्रत्येक शाक्तिकण सर्व हिंदु जगताचा मान नि भूमिका उंचावून सबळ करतो. उलट हिंदुस्थानांत इतरत्र कोठेंहि हिंदु जगताला दुर्बल वा अवमानित करणाऱ्या कोणत्याहि घटनेनें पर्यायानें नेपाळच्या बळास न्यून पडणें अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, वायव्य सीमेवरील मुसल्मानांचें उत्थान हें नेपाळांतील हिंदुराज्याच्या स्वातंत्र्याला देखील एक सततचें संकटच होय. हिंदु इतिहासापासून इतकाहि दूरदर्शीपणा आपल्याला प्राप्त झाला नसेल तर गझनी आणि घोरी यांच्या आक्रमणांचे योगानें विधिघटनेचे मनांतून जे बोध तुम्हांस द्यावयाचे होते ते तुमचेपुढें व्यर्थ गेले असेंच म्हटलें पाहिजे.

तरीहि ब्रिटिशराज्यांतील हिंदुस्थानाच्या प्रदेशांतील संकीर्ण नि भ्रमग्रस्त राजकारणानें केलेल्या विकृतींत नेपाळला ओढण्यासारखी कोणतीहि गोष्ट आपण करूं गेल्यास तें मूर्खपणाचें होईल. नेपाळच्यासारख्या स्थितींत असलेल्या स्वतंत्र राज्यावरील प्रसंगोपात्त धोरणाला परतंत्र जातींचें राजकारण मार्गदर्शक होणें शक्यच नाहीं. हिंदुस्थानाला दुसऱ्या कोणत्याहि अहिंदु आक्रमणापासून सुरक्षित ठेवण्यासाठीं नेपाळच्या राज्यानें ब्रिटिशांशीं राजकीय संगनमतानें राहण्याचें नि ब्रिटिश राज्याशीं मित्रत्वाचें संबंध राखण्याचें जें धोरण आज ठेवलें आहे त्याचें समर्थन करण्यास मला कोणताच संकोच वाटत नाहीं. म्हणूनच आपली स्वतःची सुरक्षितता नि सामर्थ्य अबाधित ठेवून जितके नेपाळी सैनिक हिंदी सैन्यास देतां

येतील तितकें पुरवण्याचें नेपाळचें धोरण अत्यंत शहाणपणाचें आहे. युरोपमध्यें नि अति पूर्वेकडील राजकीय गुंतागुंतीमुळें ब्रिटिश राज्यसत्तेला देखील हिंदुस्थानचें संरक्षण निश्चित करण्यासाठीं नेपाळचें वाढतें मित्रत्व नि सैन्यविषयक साहाय्य यांचे वर अवलंबून राहणें अवश्य होईल अशी निश्चिति आहे.

यासंबंधांत आणखी एका गोष्टीवर भर दिला पाहिजे. नेपाळच्या सीमेवरील जे कांहीं प्रदेश गतकालांत ब्रिटिशांनीं हस्तगत केले त्यांपैकीं कांहीं प्रदेश ब्रिटिशांनीं नेपाळचे महाराजांस परत द्यावेत. दुसऱ्या कोणत्याही कृत्यानें नाहीं इतकी या दोन राष्ट्रांतील मैत्रीची दृढता वरील कृत्यानें होईल.

उदयशाली राष्ट्राला अवश्य असणारी भविष्यभेदी दूरदृष्टी नेपाळला असेल आणि तें वेळींच सावध होईल तर नेपाळचा भविष्यकाळ निःसंशय उज्वल आहे. नेपाळनें आपलें सैन्यबल अद्यावत युरोपियन सैन्याप्रमाणें कार्यक्षम करावें. जमीनीवरच नव्हे तर आकाशमार्गें होणाऱ्या आक्रमणास तोंड देण्यासाठीं त्या देशानें प्रबल वैमानिक दल संपादन करावें. नेपाळचें सामर्थ्य म्हणजे एका मित्र राष्ट्राचेंच सामर्थ्य असल्यामुळें सद्यःपरिस्थितींत ब्रिटिशसरकार त्यायोगें अस्वस्थ होऊन नेपाळचें प्रयत्नास बाध न आणतां उलट ब्रिटिश सरकार त्यास या योजनेस साहाय्यच करील. नेपाळसंबंधीं प्रचंड ग्रंथ लिहिणाऱ्या मि. पर्सिव्हल लॅंडन या प्रख्यात ग्रंथकाराचे शब्दांनीं नेपाळचे भावी कालांत हिंदी राजकारणावर कसे परिणाम घडण्याचा संभव आहे हें दिसून येईल.

मि. लॅंडन लिहितात, "सद्यःकाळीं नेपाळला जें महत्व प्राप्त झालें आहे त्याकडे दुर्लक्ष करणें मूर्खपणाचें ठरेल. दक्षिण आशियांतील समतोलपणा राखण्याचे कामीं उपयुक्त अशी नेपाळची सर्वोच्च भूमिका आणि हिंदुस्थानाला सद्यस्थितींत ग्रासणारे प्रश्न सोडवितांना भावीकालांत नेपाळला प्राप्त होणारे वाढतें महत्व या गोष्टी समजून घेण्यासाठीं इंग्रजांनीं प्रयत्न केला पाहिजे. नेपाळ आज उदयाच्या संनिद्ध उभें आहे. त्याचा भविष्यकाळ त्यास एकाच दिशेनें पाचारित आहे. हिंदी राजकारणाच्या भिन्नभिन्न क्षेत्रांकडे पहातां नेपाळच्या अंतिम भवितव्याहून अधिक लक्ष वेधणारी दुसरी कोणतीच गोष्ट आढळणार नाहीं. हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचा हात काढून घेण्याचे आपलें सध्याचें धोरण असेंच

पुढें चालण्यास नेपाळचें महत्व उत्तरोत्तर वाढत जाणें हें अपरीहार्य आहे. हिंदुस्थानच्या भवितव्यावर देखील नियंत्रण चालविण्यास नेपाळला पाचारण करावें लागणें ही गोष्टही अशक्य कोटींतील नाहीं. ".

× × ×

आमचें परराष्ट्रीय धोरणहि स्पष्ट व निर्भेळ अशा हिंदु-दृष्टीनेंच ठरविण्यांत येईल. जीं राष्ट्रें हिंदु राष्ट्राशीं भिन्नत्वानें वागतील आणि जीं त्याला सहायभूत होण्यासारखीं असतील तीं सर्व आम्हीं आमचीं मित्र आणि सहकारि समजूं उलट जीं हिंदु राष्ट्राला विरोध करतील अथवा जीं हिंदूंच्या हितसंबंधाला घातक होण्यासारखी असतील, त्या सर्वांना आम्हीं विरोध करूं. यांपैकीं कांहींच न करतां जीं तटस्थ असतील त्यांच्याशीं आम्हीहि तटस्थपणाचें धोरण ठेवूं, मग त्यांनीं स्वतःपुरतां कोणत्याहि राजकीय तत्त्वाचा अंगीकार केलेला असो. आमचें परराष्ट्रीय धोरण ठरवितांना लोकशाही किंवा राष्ट्रीय समाज--सत्ता-वाद अर्थात् नाझिझम, फॅसिझम् इत्यादि पोकळ गर्जनांचा विचार आम्हीं करणार नाहीं. हिंदूंचें हित हीच आमची कसोटी. खिलाफत, पॅलेस्टाईनमधील आरबांचा प्रश्न, इत्यादि भ्रमोत्पादक गोष्टींत निरर्थक लक्ष घालून आणि त्यांच्याशीं सहानुभूति दाखवून आम्ही आत्मघातकीपणा करणार नाहीं. इंग्लंड देशाशीं येणारे आमचे संबंध हिंदु--हिताच्या धोरणानें म्हणजे हिंदुराष्ट्राच्या पूर्ण राजकीय स्वातंत्र्याची दृष्टि पुढें ठेवूनच ठरविले जातील.

## ( ११ )

# मुसलमानेतर अल्पसंख्याक

हिंदुस्थानांतील मुसलमानेतर अल्पसंख्यांकांच्या संबंधांत हिंदी राष्ट्राच्या दृढीकरणाला फारशी अडचण येऊं शकत नाहीं. इंग्रजी अधिराज्याच्या विरुद्ध पारशी हे हिंदुंच्या खांद्याला खांदा भिडवूनच सतत काम करीत आहेत. ते धर्मपिसाट किंवा माथेफिरू नाहींत. महात्मा दादाभाई नौरोजीपासून तों सुविख्यात क्रांतिकारक स्त्री कामा बाईपर्यंत पारश्यांनीं आपला हिंदी देशभक्तीचा वांटा उचललेला आहे. त्यांच्या वंशाचे खरे-खरे तारक ठरलेल्या हिंदु राष्ट्राविषयीं केवळ सदिच्छे-

वांचून दुसरी कोणतीच वृत्ति त्यांनीं कधीं प्रकट केलेली नाहीं. सांस्कृतिक दृष्ट्याहि ते आपले सर्वांत निकटचे आप्तसंबंधी आहेत. हिंदी ख्रिस्त्यांच्या विषयींहि थोड्या अल्प अंशानें तेंच म्हणतां येईल. जरी आजवर राष्ट्रीय लढ्यांत त्यांनीं फारच थोडा भाग घेतलेला असला तरी आमच्या गळ्यांत धोंडा होतील असे तरी ते वागलेले नाहींत. ते थोडे कमी धर्मपिसे असून राजकीय तर्कबुद्धीला अधिक मान तुकविणारे आहेत. ज्यू हे तर संख्येनें फारच अल्प आहेत नि ते आमच्या राष्ट्रीय आकांक्षांच्या विरुद्धहि नाहींत. आमचे हे सर्व अल्पसंख्याक देशबांधव हिंदी राज्यामध्यें प्रामाणिक नि देशाभिमानी नागरिक म्हणूनच वागतील याविषयीं निश्चिति आहे.

हिंदुंवर नि 'हिंदु महासभे' वर जातिनिष्ठतेचें जे आरोप करतात त्यांनीं ही गोष्ट नीट विचारांत घ्यावी कीं हिंदुंनीं या अहिन्दु अल्पसंख्यांकांशीं मित्रत्व-भावनांच्या देवाणीची कधींहि वाण केलेली आढळणार नाहीं, किंवा आपल्या त्या देशबांधवांच्या न्याय्य प्राप्तव्याविषयीं त्यांनीं कधींहि कुरकूर केली नाहीं.

आंग्ल--हिंदी ( अँग्लो--इंडियनां ) च्या संबंधांत हें स्पष्ट आहे कीं त्यांचा सध्यांचा उद्दामपणा नि प्रचलित 'सुधारणा निर्बंध' ( रिफॉर्म अॅक्ट ) न्वयें मताधिकारांत त्यांना मिळालेला सिंहाचा वांटा या गोष्टी इंग्लंडचें वर्चस्व दूर होतांच एका क्षणांत नाहींशा होतील. त्यांची धड असणारी राजकीय उपजतबुद्धि लवकरच त्यांना इतर हिंदी नागरिकांच्या ओळींत आणील. नाहींपेक्षां त्यांना सहज शुद्धीवर आणतां येईल.

परंतु मुसुल्मानांचें प्रकरण मात्र अगदीं निराळें आहे. मीं हिंदुंना बजावून सांगतों कीं, जर नि जेव्हां इंग्लंडची सत्ता निघून जाईल तर नि तेव्हांहि मुसुलमान हे आपल्या हिंदु राष्ट्राला नि समान हिंदी राष्ट्राच्या अस्तित्वाला मोठेंच धोक्याचे ठरण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत मुस्लीम राज्य स्थापण्याच्या धर्मवेड्या योजना मनांस काळजीपूर्वक पोसण्याचें त्यांचे सर्वंच जातीचेंच प्रयत्न अद्यापिहि चालूच आहे. ह्या वस्तुस्थितीची आपण आंधळे दगड बनून उपेक्षा करतां कामा नये. आपण एकतेकरितां झटूं या, आपण चांगल्याचीच आशा धरूं या. पण त्याचवेळीं आपण आपल्याविषयीं दक्ष नि सावधहि असूंच या !

कित्येक बालिश राजकारणी हिंदुस्थान हें पूर्वींच विसंवादरहित बनून गेलेलें राष्ट्र आहे किंवा तशी नुसती इच्छा करतांच तें तसें होणारें आहे असें मानण्यांत भयंकर चूक करीत असतात. हे आमचे सद्धेतुप्रेरित पण विचाररहित मित्र आपलीं स्वप्नें सत्यच समजून चालत असतात. ह्याच कारणानें जातीय गुंताड्यांनीं ते गोंधळून जातात आणि त्या गुंताड्याचें कारण जातीय संघटनांच्या माथीं मारतात. परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं जातीय म्हणून म्हटले जाणारे प्रश्न हा हिंदु आणि मुसुल्मान यांच्यामधील सांस्कृतिक, धार्मिक नि राष्ट्रीय विरोधाचा शतकानुशतकें चालत आलेला केवळ वारसा आहे. योग्य काल येतांच तुम्ही ते प्रश्न सोडवूं शकाल पण त्यांचें अस्तित्वच मुळांत नाकारून तुम्ही ते दडपून टाकूं शकणार नाहीं. कोणत्याहि खोलवर मुरलेल्या रोगाकडे दुर्लक्ष्य करण्यापेक्षां त्याचें निदान करून अवश्य ती परिचर्या करणें अधिक सुरक्षितपणाचें असतें. असेल त्या अप्रिय अशाहि वस्तुस्थितीला आपण छातीठोकपणें तोंड देऊं या. हिंदुस्थान हें एकता पावलेले व विसंवादरहित राष्ट्र आहे असें आज तरी मानतां येत नाहीं, तर उलट हिंदुस्थानांत हिंदू आणि मुसलमान अशीं मुख्यतः दोन राष्ट्रें विद्यमान आहेत. आणि अशाच परिस्थितींतें जगांतील अनेक देशांत जें घडून आलें आहे त्यास अनुसरून प्रस्तुत कालीं आपण अधिकांत अधिक ज काय करू शकू ते म्हणजे ज्यांत कोणालाहि वाजवीहून अधिक माल देऊन आपली राज्यनिष्ठा विकत घ्यावी लागणार असें हिंदी राष्ट्र बनविणें हेंच होय. मातृभूमीच्या रक्षणार्थ लढण्याकरितां भाडोत्री बाजारबुणगीं मोलानें विकत घेतलीं जातात— तिचे पुत्र नव्हत. हिंदू हें एक राष्ट्र ह्या नात्यानें समान भूमिकेवरून समान हिंदी राष्ट्राविषयींचें आपलें कर्तव्य बजावण्याला तयार आहेत. परंतु जर आमचे मुसलमान देशबांधव हिंदुंशीं जातीय तंटा उपस्थित करीत असतील आणि हिंदुस्थानांत मुसलमानी राज्यसत्ता किंवा वर्चस्व प्रस्थापित करण्याचा हिंदी—विरोधी नि बहिर्देशीय योजना रचीत असतील, तर हिंदुंनीं स्वतःपुरताच विचार करावा, आपल्या स्वतःच्या पायावर उभें रहावें आणि इंग्रजांच्या वा मुसलमानांच्या वा इतर कोणाच्याहि असो कोणत्याहि अहिंदुच्या जोखडापासून हिंदुस्थानची मुक्तता करण्याकरितां आपल्या सर्व शक्तीनिशीं एकाकीच लढावें.

हिंदुसंघटनी पक्षाचे मतें हिंदुस्थानची भावी राज्यघटना व्यापक तत्त्वावर आधारण्यांत येईल. सर्व नागरिकांना समान अधिकार नि

कर्तव्यें राहतील मग त्यांची जात वा धर्म कोणतेही असोत. मात्र त्यांनीं या हिंदुस्थानी राज्याशीं पूर्णपणें एकनिष्ठ राहण्याची आणि तिची एकमेव निष्ठा ठेवण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. भाषण, विचार, धर्म नि संघ इत्यादी संबंधींचे स्वातंत्र्याचे मूलभूत अधिकार सर्व नागरिकांना सारखेच उपभोगितां येतील. सार्वजनिक शांतता, सुव्यवस्था नि राष्ट्रीय आवश्यकता यांचे प्रीत्यर्थ या अधिकारांवर जीं बंधनें घालतां येतील तीं केवळ धार्मिक नि जातीय विचाराचे आधारें नसून सर्वसामान्य राष्ट्रीय कारणासाठींच घालण्यांत येतील. प्रादेशिक दृष्टीनें देखील या धोरणापेक्षां अधिक राष्ट्रीय असें धोरण कोणतेंच असूं शकणार नाहीं. आणि हेंच धोरण ' एका मनुष्याला एक मत ' या सूत्रानें थोडक्यांत दर्शविलें जातें. यावरून हें लक्षांत येईल कीं, सामान्य हिंदी राष्ट्राच्या वाढीशीं हिंदु राष्ट्राची कल्पना कोणत्याही प्रकारें विसंगत नाहीं. कारण या हिंदी राष्ट्रांत सर्व पंथ, उपपंथ, वंश जाती, धर्म, नि सांप्रदाय हिंदु, मुसलमान, अँग्लो इंडियन, ख्रिश्चन इत्यादि सर्वांना एका राजकीय घटनेंत समानतेनें नि सलगपणानें एकत्रित करतां येईल. अशा प्रकारचें संयुक्त हिंदुस्थानी राज्य हेंच हिंदी राष्ट्र होय.

हिंदुस्थानी राष्ट्रीय राज्य घटनेसंबंधाचें हिंदुमहासभेचें हें धोरण निश्चितपणें नि अर्थपूर्णतेनें मुस्लीम लीग किंवा कॉंग्रेस यांच्या धोरणापेक्षां अधिक राष्ट्रीय आहे. आपल्याला राष्ट्रीय म्हणविणारी कॉंग्रेस देखील जितकें ठणठणीत राष्ट्रीय धोरण मांडू शकत नाहीं तितकें ठणठणीत राष्ट्रीय धोरण, ' अराष्ट्रीय, ' ' दुराग्रही ' ' जातीय, ' अशा रीतीनें जिची हिंदुराष्ट्रकल्पना कॉंग्रेसनें नि लीगनें डावलली आहे त्या हिंदुमहासभेचीं आहे. वस्तुतः कॉंग्रेस हीच सरळ अर्थानें जातीय आहे इतकेंच नव्हे तर विपरीतपणें जातीय आहे. कारण हिंदुबहुसंख्य नि मुसलमान अल्पसंख्य या विभागांना मान्यता देऊनहि पुनः सांस्कृतिक अधिकार, मतदान नि राज्ययंत्रांतील घटक यांमध्यें बहु संख्याकांचा न्याय्य प्रमाणांत अंश द्यावयाचा तो काढून घेऊन धार्मिक दृष्ट्या अल्पसंख्य मुसलमानांना द्यावयास कॉंग्रेस भाग पाडीत असते. आणि हें मूल्य देऊन मुसलमानांकडून देशभक्ति नि संयुक्त राष्ट्रीय राज्यावरील निष्ठा विकत घेऊं पाहते. दुसरीकडे मुस्लीम लीग, राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवर जे न्यायतः अधिकार मिळतील

त्यापेक्षां अतोनात अधिक अधिकार हिंदूंच्या हिताचा विघात करून, स्वतंत्र घटक म्हणून मागते, आणि असें न केल्यास आततायीपणानें फुटून जाऊन परकीय सत्तेशीं संगमत करण्याच्या शस्त्राचा धाक दाखविते. एवंच मुस्लीम लीगच्या अराष्ट्रीय भूमिकेची सीमा कपटी विश्वासघातापर्यंत पोंचली आहे. एका मुसलमानास तीन मतें याप्रमाणें मागणी करून मुस्लीम लीग भयंकर आक्रमक जातीयताच प्रगट करते तर तीन हिंदुंना एकच मत देण्याच्या सूचनेस मान्यता देऊन शरणागति स्वीकारल्यानें कॉंग्रेस हि भित्रेपणाची जातीयताच प्रगट करते. आणि याच दोन संस्था, एक मिथ्या राष्ट्रीय कॉंग्रेस नि दुसरी उजळ माथ्यानें राष्ट्रविघातक असणारी मुस्लीम लीग, उलट हिंदुसंघटना पक्षाला जातीय नि अराष्ट्रीय म्हणून निंदण्याचें धाष्टर्य करतात. भाकरीच्या एकाद्या तुकड्यासाठीं आपला जन्मसिद्ध अधिकार टाकून देणें हिंदुसंघटनी पक्षाला मुळींच मान्य नाहीं, तो पक्ष मुस्लीम लीगची साथ करून ' री ' ओढीत नाहीं नि कॉंग्रेसकडून मिळणाऱ्या कुचकामी ' राष्ट्रीय'त्वाच्या प्रशस्तिपत्राची अपेक्षा करीत नाहीं.

एकदां हिंदु महासभेनें " एका माणसास एक मत " हें तत्त्व अंगिकारलें इतकेंच नव्हे तर पुरस्कारलें, आणि राज्ययंत्रांतील सेवक केवळ गुणांनुसार नेमले गेले आणि मूलभूत अधिकार नि कर्तव्यें, धर्म नि जात यांचा भेदाभेद न करतां सर्वांचीं सारखीं मानलीं म्हणजे त्यानंतर अल्प संख्यांकांच्या अधिक कांहीं अधिकारांचा उच्चार करणेंहि अनवश्यक इतकेंच नव्हे तर आत्मविरोधी होय. तरीहि व्यवहारिक राजकीय धोरणीपणा म्हणून नि आमच्या अहिंदु देशबांधवांचे संशयाचें भूतहि उठू नये असें हिंदुसंघटकांना वाटतें म्हणून, आम्हीं हेंहि स्पष्ट करण्यास सिद्ध आहों कीं धर्म, संस्कृति, नि भाषा या संबंधाच्या अल्पसंख्यांचें न्याय्य अधिकाराविषयीं उल्लेखपूर्वक निश्चितीची घोषणा करण्यांत येईल. याला अट मात्र इतकीच कीं, तत्सदृश्य बहुसंख्यांचेहि समान अधिकार आहेत त्यांस बाध आणतां येणार नाहीं किंवा त्यावर आक्रमणहि करतां येणार नाहीं. प्रत्येक अल्पसंख्य वर्गाला आपल्या भाषेचें आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठीं शाळा काढतां येतील आणि धार्मिक

नि सांस्कृतिक संस्था चालवितां येतील. त्यांना राज्याकडून आर्थिक अंशहि मिळेल. मात्र तो सदैव अर्थकोषामध्यें ज्या मानानें त्या जातीकडून भर पडत असेल तेवढ्याच प्रमाणांत मिळेल. तेंच तत्त्व अर्थात् बहुसंख्य वर्गालाहि सारखेंच लागू करण्यांत येईल.

याच्याहि भरीला, जरी ' प्रत्येकीं एक मत ' या निर्भेळ राष्ट्रीय तत्त्वानुसार संयुक्त मतदार संघावर राज्यघटना न आधारतां ' जातीय विभागणीचें ' तत्त्व मानलें तरी ज्या अल्पसंख्यांनां विभक्त मतदार संघ नि राखीव प्रतिनिधि-संख्या पाहिजे असेल त्यांना ती मिळेल. मात्र केवळ त्यांच्या संख्येचे प्रमाणांत आणि याच अटीवर कीं, यथाप्रमाण प्रतिनिधित्वाचा बहुसंख्याच्या अधिकाराला बाध येतां कामा नये.

वर सामान्य रूपरेषाः मांडल्याप्रमाणें घटना केल्यास मुसलमानांव्यतिरिक्त खिस्ती, पारशी, ज्यू नि इतर अल्पसंख्यांचे पुरें समाधान होईल. कारण ख्रिश्चन नि ज्यू आणि विशेषतः पारशी हे सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय संलग्न नि देशाभिमानी आहेत नि अँग्लोइंडियन समंजस आहेत. त्यांना हें पटल्याशिवाय राहणार नाहीं कीं, राष्ट्रीय राज्याचें अबाधित्व, अधिकार, एकजीवता नि सामर्थ्य राखणारी कोणतीहि घटना घेतली तरी ती वरील मर्यादापलीकडे जाऊं शकत नाहीं. बहुसंख्यांकाहून भिन्न असे अल्पसंख्यांकांचें विशेष अधिकार संरक्षणासाठीं वर निर्दिष्ट केलेल्या सूचना पुरेशा आहेत हेंहि या इतर अल्पसंख्यांकांना समजेल. पण जी अल्पसंख्य जाति, राज्यांत फूट पाडण्याचे गुप्त हेतु बाळगते, राज्याचे पोटांत दुसरें स्वतंत्र राज्य करू इच्छिते, किंवा राष्ट्रीय राज्य उलथून टाकून इतर सर्वांवर वर्चस्व गाजवूं पाहते त्या जातीकडून एकावर एक वाढत्या मागण्या सारख्या येत राहाणार हें निश्चित. मुसलमानां व्यतिरिक्त इतर आतांच निर्देश केलेल्या अहिंदू अल्पसंख्य जातींपैकीं कोणीहि असले राष्ट्रघातकी व्यूह मनांत बाळगीत नाहींत. मुसलमानांसंबंधीं मात्र असा विश्वास बाळगतां येत नाहीं.

ख्रिस्ती, ज्यू, पारशी आदीकरून आपल्या देशबांधवांच्या राजकीय, नि सांस्कृतिक हितसंबंधाचे दृष्टीनें एक विशेष दूरगामी महत्त्वाचा विचार प्रामुख्यानें नि ठसठशीतपणें निर्देशला पाहिजे. मुसलमानांचे अराष्ट्रीय व आक्रमक धोरण

हें फक्त हिंदूंनाच नव्हे तर मुसलमानेतर अल्पसंख्यांकानाही धोक्याचें होऊन बसलें आहे. तो इतका उघड आहे कीं, त्याची येथें अधिक चर्चा करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानच्या राजकीय व नियामक प्रगतीला विरोध करण्यास ब्रिटिश सरकारला अल्पसंख्य मुसलमानांचे अराष्ट्रीय धोरणच एक कारण सांपडलें आहे. आपला एकमेव अपराध लपविण्यासाठीं आपल्या धोरणाच्या भरीला इतर अल्पसंख्यांकांना मुसलमान लोक ओढीत असतात. अराष्ट्रीय मागण्या करणाऱ्या मुस्लीम लीगच्या प्रमाणेंच इतर अहिंदू अल्पसंख्य जातीहि दुराराध्य नि दुराग्रही आहेत असें जगाला भासविण्याचा त्यांचा हेतू असतो. अहिंदु अल्पसंख्यांकाचे आपण पुढारी आहोंत असा मुस्लीम लीग बहाणा करीत असते. परंतु ख्रिश्चन, ज्यू व त्यांतल्यात्यांत आपले पारशी बंधु यांचे आपणा हिंदूशीं अनेक शतकें फार सलोख्याचे संबंध आहेत ही वस्तुस्थिति होय. आणि ह्या मुसलमानेतर अल्पसंख्याकांनीं अराष्ट्रीय व निष्कारण हक्कांचा केव्हांच पुरस्कार केलेला नाहीं. किंवा राजकीय महत्त्व पटविण्यासाठीं त्यांनीं राजकीय गुंडपणा व माथेफिरू दंगे या सारखे मूर्खपणाचे मार्ग केव्हांहि अनुसरले नाहींत. म्हणून आपल्या ख्रिश्चन, ज्यू, पारशी व इतर मुसलमानेतर अल्प संख्यांक बंधुंना माझी सूचना आहे कीं मुस्लीमलीगच्या कारवायाशीं आपला संबंध नाहीं असें घोषित करावे व अल्पसंख्यकांचे नांवावर मुसलमानांशीं आपला संबंध जोडण्याच्या खोडसाळपणाचा उघडपणें व निश्चयपूर्वक प्रतिकार करावा. त्याचप्रमाणें संबंध अल्पसंख्याकांच्या वतीनें मुस्लीमलीगला बोलण्याचा हक्क नाहीं असें बजावून आपआपल्या प्रतिनिधिस राजकीय संस्थेमार्फत वर दिलेल्या अटीवर राष्ट्रीय ऐक्य करण्याकरतां हिंदूंशीं सहकार्य करण्यास तयार असल्याचें जाहीर करावे. ख्रिश्चन, ज्यू, पारशी आणि इतर मुसलमानेतर अल्पसंख्यांक आणि हिंदु सर्वसंमत धोरण ठरवून एकजूट करतील तर पुढें होणाऱ्या वर्तुळ परिषदेंत अगर घटनासमितीमधें मुसलमानांनाच आपण तेवढेच एकटे बाहेर पडलों याची जाणीव होईल आणि सर्व अल्पसंख्यकांच्यातर्फे बोलण्याची त्यांची भाषा त्यांना सोडून देणें भाग पडेल. इतकेंच नव्हे तर अराष्ट्रीय व माथेफिरूसारख्या मागण्यांची जबाबदारी एकट्या मुसलमानांवरच पडेल.

(१२)

# मुसलमान व कॉंग्रेस

खिलापतीच्या चळवळीपासून गांधीजी व त्यांच्या प्रभावळींतील पुढारी यांच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेसनें केलेल्या असंख्य गंभीर चुकांची यादी तयार करावयाची माझी इच्छा नाहीं व मला येथें सवडही नाहीं. त्या गंभीर चुकांचा लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद आणि त्यांसारख्या इतर हिंदु पुढाऱ्यांनीं विरोध केला असतांही तिकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. या चुकामुळें हिंदु समाजाचें प्रत्येक बावतींत नुकसान झालें, हिंदु समाजाचा अपमानही झाला. चुकांचें गांभीर्य लक्षांत घेतां जितक्या कडकपणें निषेध केला पाहिजे तितका निषेध करण्याची माझी इच्छा नाहीं. कारण त्यांच्यापैकीं कांहींनीं आपल्या मायभूमीची महत्वाची सेवा केली असून त्यांच्यापैकीं कांहींचा हेतूही चांगला होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं चाललेल्या युद्धांत कॉंग्रेसवाल्यांच्या बरोबरीनें तर कांहीं बाबतींत अधिक स्वार्थत्याग व देशसेवा हिंदुसभावादी पुढाऱ्यांनीं केली असतां ती मान्य करण्याचें बाबत कॉंग्रेस ही संस्था मात्र कांहींशीं कृतघ्न आहे. तरीसुद्धां जे पूर्ण स्वार्थविन्मुख व त्यागी आहेत अशा आपल्या कॉंग्रेस-वाल्यांच्या देशसेवात्मक हेतूविषयीं प्रत्येक हिंदुसंघटणवाद्यांनीं बंधुभावानें त्यांचें कौतुकच करावें. त्यांचा हेतू वाईट नाहीं पण विचारसरणी चुकीची आहे. कांहीं एक दोन बावतींत तर त्याच्या नालायकीमुळेंच हिंदुंचें अपरिमित नुकसान झालें.

आणि म्हणून खिलापतीच्या चळवळीशीं साक्षात् संबंध जोडण्यांत कॉंग्रेसवाल्यानीं केलेली फार मोठी चूक निष्फळपणें स्मरणांतून काढून टाकणें शक्य नाहीं. उलट गांधीवादी पुढाऱ्यांनीं चालविलेल्या तशाच दुर्दैवी चळवळींतील कांहीं खऱ्या पण घातुक धोरणाकडे लक्ष वेधणें मला अवश्य वाटते. थोर लोक-मान्यांच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून जातीय, धार्मिक व जादा प्रादेशिक असलेल्या खिलापतीच्या चळवळीशी मुसलमानांना खूष करण्याकरितां गांधींजींनीं कॉंग्रेसचा संबंध जोडला व स्वराज्याचा प्रश्न हा खिलापतीच्या मतें दुय्यम आहे असें आग्रहानें

सांगण्यापर्यंत त्यांची स्वस्तांची मजल गेली. इतकेंच नव्हे तर गांधीजी आणखीही म्हणाले कीं, "खलिफाला साहाय्य करणें हें हिंदूंचें धार्मिक कर्तव्य होय!" आणि असें असूनहि याच कॅांग्रेस पुढाऱ्यांनीं निजाम निःशस्त्र प्रतिकार चळवळीला जातीय आणि अराष्ट्रीय ठरवून तिला दुरूनहि स्पर्श करण्याचें टाळलें. ही चळवळ जातीय कां तर ती हिंदूंचे धार्मिक नि सांस्कृतिक अधिकार मागत होती म्हणून! आपल्या शब्दांप्रमाणें या कॅांग्रेसवादी हिंदु पुढाऱ्यांनीं केवळ कल्पनेंतच स्वराज्याला खिलाफतीच्या अंकित केलें नसून अमानुल्लाखानास हिंदुस्थानावर सैनिक आक्रमण करण्यासाठीं उत्तेजन देणाऱ्या मुसल्मान पुढाऱ्यांशींहि त्यांनीं संगनमत केलें. त्यासंबंधांत स्वामी श्रद्धानंदजींच्या लेखाचें प्रमाण उपलब्ध आहे. स्वामीजींनीं आपल्या 'लिबरेटर' पत्रामध्यें या घटनेचा स्पष्ट निषेध केला होता. आणि मौलाना महंमद अलीनीं अफगाणिस्तानचे अमीरास केलेल्या एका तारेचा गांधीजींच्या हस्तें लिहिलेला मूळ लेख आधार म्हणून त्यांनीं प्रसिद्ध केला. दिनांक ९–६–२१ च्या 'यंग इंडिया'च्या अंकांत गांधीजींनीं स्वतःच मान्य केलें आहे कीं, आव्हानाचा जय झाला तर ते हिंदुस्थानांत आपलें राज्य स्थापन करतील हें निश्चित आणि तरीहि अफगाण आक्रमणास प्रवृत्त करणाऱ्या मुसल्मानांच्या उघड वा गुप्त क्रियांपासून कॅांग्रेस हिंदु पुढाऱ्यांनीं आपला संबंध तोडला नाहीं. इतकेंच नव्हे तर या राष्ट्रघातकी व्यूहाला त्यांनीं पाठिंबाच दिला. दिनांक ४।५।२१ च्या 'यंग इंडियांत' गांधीजी लिहितात, 'अफगाणिस्थानचे अमीरानीं ब्रिटिश राज्याविरुद्ध युद्ध केलें तर एका अर्थानें मी अमीरास साहाय्य करीन. मी आपल्या देशबांधवांना उघडपणें सांगेन कीं, ब्रिटिश राज्याला साहाय्य करणें पाप आहे इत्यादि.' हे सद्गृहस्थ या संबंधांत किती पुढें गेले होते हें तुम्हांस पहावयाचें असेल तर श्री. अ. ज. करंदीकर यांनीं त्यावेळच्या कॅांग्रेसपुढाऱ्यांच्या भाषणांतले आणि गांधीजींच्या यंग इंडियांतले उतारे गोळा केलेले आहेत ते पहा. 'मराठा' पत्राचे संपादकांनीं स्वतंत्र पत्रक रूपानें ते प्रसिद्ध केले आहेत. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं अलीबंधु आणि 'राष्ट्रीय' मौलाना आझाद यांच्याहि पुढें जाऊन या हिंदुपुढाऱ्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं अमीरांनीं दिल्ली जिंकली कीं, आम्हांला स्वराज्य मिळालेंच! कारण त्यांनीं निश्चित उद्गार काढले कीं, अफगाणांचें राज्य म्हणजेच 'स्व–राज्य'! 'आम्ही

हिंदु आणि मुसल्मान हे एक नि अविभाज्य राष्ट्र आहेत.' त्यावेळीं मी बंदीवासांत असतां तेथें माझी जी गांधीवादी हिंदु पुढाऱ्यांशीं संभाषणें झाली तीं मला अद्याप स्पष्ट आठवतात. किती उत्सुकतेनें अमीराचें सैन्य येऊन लाहोर घेणार या गोष्टींची ते प्रतिज्ञा करीत होते! इकडे खिलाफतीला तुर्कांनीं स्वतःच उच्छेदिलें आणि अमीर अमानुल्ला दिल्लीचे सम्राट न होतां स्वतःच काबुलामध्यें बच्चा-ई-साकू- कडून पदच्युत झाले. एवंच खिलाफतीच्या चळवळीपासून हिंदुस्थानानें मिळविलें तें इतकेंच कीं, सर्व हिंदुस्थानभर हिंदी मुसलमानांमध्यें मुसलमानी-जगत् करण्याचा धर्मवेडेपणा बोकाळला. त्यांना स्वतः हिंदूनीं उत्तेजनच दिलें आणि त्यांचें प्रायश्चित्त म्हणून मलबार, कोहाट, पंजाब नि बंगाल या ठिकाणीं भोगलें. आणि जर ते प्रतिकार करण्यास शिकले नाहीं तर आणखी भोगतील.

गांधीजींच्या डोक्यांत जोपर्यंत खिलाफतीचा भ्रम होता तेव्हां लंडनच्या डेली एक्सप्रेसच्या प्रतिनिधीला उत्तर देतांना गांधींनी धर्मवेड्या उच्छृंखल अफगाणांचें शांतताप्रिय नागरिकांमध्यें परिवर्तन करण्याच्या आपल्या योजनेचा परिस्फोट केला तो असा, ' अफगाणी जातीमध्यें देखील मी चरख्याचा प्रसार करीन आणि त्यायोगें हिंदुस्थानवर सैनिक आक्रमण करण्यापासून ते परावृत्त होतील. माझा विश्वास आहे कीं, आपल्या परीनें या अफगाण जाती देखील पापभीरूच आहेत. ''

हां, ' आपल्या परीनें ' यांतच सर्व उपद्रवाचें बीज आहे. सिंधपासून काश्मिरपर्यंतच्या सीमेवर हिंदूंच्या घरादारांना यांनीं आगी लावल्या असतांना त्यांचा जो भयानक प्रकाश पडला त्या मधून पापभीरूपणाचा या जातींचा अर्थ आपल्याला स्पष्ट दिसून आला. केवळ हिंदूच मारले ! केवळ हिंदु स्त्री-पुरुष पळविले ! ! इपीचा फकीर देखील आपल्या परीनें एक पापभीरू मनुष्य नव्हे काय ? आणि चरख्याचा योगानें म्हणे तें आक्रमणापासून निवृत्त होणार ! पण याला किती शतकें लागणार ? आणि मध्यंतरीं आम्हां हिंदुनी काय करावयाचें ! वर्तुल परिषदेच्या एका अधिवेशनांत गांधीजींनीं अगदीं गंभीरपणानें सुचविल्या-प्रमाणें सीमाप्रांतावर हिंदु सुंदरीचा तांडा हातांत चरख्याचें दिव्यास्त्र देऊन उभा करावयाचा कीं काय ?

सद्गृहस्थहो, या घटनांचा उल्लेख मी केवळ उपहास बुद्धीनें करीत नाहीं. जे अद्याप कॉंग्रेसची धुरा वहात आहेत त्या हिंदु पुढाऱ्यांची मनोवृत्ति नि कल्पना यांचें तुम्हांला योग्य आकलन व्हावें येवढी माझी इच्छा आहे. गांधी घ्या वा पंडित नेहरू घ्या इतकेंच नव्हे तर सुभाषबाबू नि रॉयहि पहा. गांधी गटाच्या वरील सारख्या कांहीं विक्षिप्त कल्पनांचे आहारीं ते गेले नसले तरी 'मुसुल्मानांना इतके द्या कीं, अधिक मागण्याची त्यांची इच्छाच रहाणार नाहीं.' या वाक्यानें ध्वनित केलेल्या विचारसरणीवरच अद्यापीहि या सर्वांची निष्ठा आहे. आणि त्यालाच मी म्हणतो कीं, ते या विचारसरणीला बळी पडले आहेत. राष्ट्रीयत्वाचें आणि दूरदर्शित्वाचें हें एक गमक म्हणून ते प्रामाणिकपणें समजत असतील. पण हिंदुजगत् पराभूत नि अपमानित होऊन दास्यत्वाला पोचावें अशी ज्यांची इच्छा नाहीं त्या तुम्हाला ही गोष्ट पटते काय ? जर नसेल तर भविष्यकाळीं होणाऱ्या एखाद्या वर्तुल परिषदेंत हिंदूंचे प्रतिनिधि म्हणून जाऊन हिंदूंच्या वतीनें मुसलमानांशीं एखादा नवा देवघेवीचा व्यवहार करण्यासाठीं याच लोकांना पुन्हा निवडणुकींत तुम्हीं अधिकार द्याल काय ? किंवा एकेकाळीं जसे अल्लीबंधु होते तसे आज गांधींचे अधिकृत हस्तक नि कॉंग्रेसचे प्रतिनिधि म्हणून मानलेल्या खानबंधुंच्या हातीं वायव्य सीमाप्रांतांचें भवितव्य देण्यास तुमची मान्यता आहे काय ? ज्या हिंदुंनी अद्याप आपला हिंदुपणा टाकला नाहीं पण जे आंधळया रूढीशरणतेनें कॉंग्रेसला अनुसरीत आहेत अशा सहस्रावधी हिंदुंना या प्रश्नावर शक्यतो व्यग्रतेनें विचार करण्याची विनंति आहे.

खिलाफतीनंतर कोरे चेक आले. त्यानंतर जातीय निवाडा व निर्णय आला. स्मृतिविच्छेदामुळें कॉंग्रेसचे पुढारी त्याला कधीं तें नांव देतात. पण कोणत्याही नांवानें घेतला तरी तो निर्णय त्यांना सदैव अप्रतिषिद्ध नि प्रत्यक्ष व्यवहारांत मान्य केलेला नि चालवलेला असाच आहे. त्यानंतर सर्व कॉंग्रेस प्रांतांतून मंत्र्यांनीं काढलेल्या पत्रकांचा पूर आला. उदाहरणार्थ, श्री. पंत यांनीं इतर गोष्टींबरोबर असें आश्वासन दिलें कीं, (त्यांच्यांचशब्दांत) " मोहरमच्या सर्व कालमर्यादेंत बाराबंकी येथें हिंदूंना आपल्या स्वतःच्या देवळांत आरति करण्यास नि शंख वाजवण्यास कॉंग्रेस–मंत्रिमंडळानें प्रतिबंध केला. आणि होळीच्या दिवसांत

पुष्कळ ठिकाणीं हिंदूंना हिंदूंवर देखील आपसांत रंग उडविण्यास बंदी केली. जोनपूर येथें मुसलमानांनीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटवर प्रहार केले पण मुस्लीम लीगच्या मंत्र्याचे भलावणीवरून आरोपींना सोडून देण्यांत आलें. मुसलमानांची संख्या केवळ शें. १४ असतांना त्यापेक्षां कितीतरी अधिक प्रमाणांत कॉंग्रेस-राज्यानें त्यास प्रतिनिधित्व दिलें. कॉंग्रेस राज्यांत नव्या नेमलेल्या चार कलेक्टर-पैकीं तीन मुसल्मान नि तेरा डे. कलेक्टरपैकीं ८ मुसलमान होते. " इ. संयुक्त प्रांताच्या कॉंग्रेस मंत्र्यांनीं प्रसिद्ध केलेलें हें सर्वच्या सर्व पत्रक प्रत्येक हिंदूनें वाचण्यासारखें आहे. तो एक आत्मनिंदेचा उच्चांक आहे. तें गुप्तपणें मुसल्मानां-मध्येंच प्रसृत केलें गेलें होतें. पण दुर्दैवानें 'त्याज्य, जातीय, देशद्रोही' अशा हिंदुसभावाल्यांच्या हातीं त्याच्या कांहीं प्रती लागल्या. आणि या राष्ट्रीय पाप-मोचनाला त्यांनीं पुनर्मुद्रित करून प्रसाराचा लाभ करून दिला. याच आदेशानुसार प्रकट झालेली मध्यप्रांत, मद्रास आदि करून प्रांतिक राज्याचीं पत्रकें उद्धृत करणें स्थलाभावामुळें मला शक्य नाहीं. या सर्व पत्रकांमधून संकलित रीत्या मुस्लीम लीगच्या न्यायासनापुढें असें आवेदन पत्र मांडलें जात होतें कीं, " महाराज, सर्वत्र आम्ही हिंदूंचे न्याय्य अधिकार काढून घेऊन मुसल्मानांना प्रमाणानुसार अधिकारापेक्षां अतोनात अधिक अधिकार देऊन टाकले आहेत. जेथें मुसलमानांची तशी मागणी करण्याची लहर लागेल तेथें हिंदूंना आम्ही यथाशक्य छळलेंहि आहे. म्हणून लीगनें कृपाळू होऊन आतां कॉंग्रेस-मंत्रिमंडळांना प्रमाण-पत्र द्यावें कीं, ती मंत्रिमंडळें पूर्ण राष्ट्रीय नि अतिशय निःपक्षपाती होतीं ! ! ! " शेवटीं मुस्लीम लीगनें प्रमाण-पत्र दिलें तें, गेल्या दोन वर्षांच्या आंतील कालांत ज्या कॉंग्रेसच्या छळाखालीं मुसल्मान विवळत होते त्यांतून झालेल्या मुक्ततेचा 'मुक्तता-दिन' साजरा करून. एकाअर्थानें तो छळच होता; कारण ज्या प्रांतांत मुसल्मान संख्येनें केवळ ७ ते १२ होते तेथें केवळ शिक्षण, पोलीस नि इतर राज्यव्यवस्थेच्या विभागांत कॉंग्रेसनें त्यांना कृपणपणानें केवळ शेंकडा ४० ते ७५ प्रमाणांत नेमले. पण वस्तुतः त्यांना मोंगल सम्राटांचे औरस जातीय वंशज म्हणून त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाचा विचार करून त्यांना शेंकडा शंभर प्रमाणांत नेमावयास पाहिजे होते ! गेल्याच महिन्यांत लॉर्ड झेटलंड यांनीं मुसल्मानांच्या युद्धविषयक गुणांचा उल्लेख करून एके वेळीं मुसल्मान सम्राटांनीं हिंदुस्थानावर राज्य केल्याची स्मृति कॉंग्रेसवाल्या हिंदूंना करून दिली नाहीं काय ? त्यायोगें

त्यांनी ध्वनित केलें कीं, मुसलमान हे हिंदूंपेक्षां कोणी वरच्या प्रतीचे प्राणी आहेत. सुदैव हें कीं, लॉर्ड झेटलंड महाशय आपल्या पूर्ववयांत एखाद्या मराठी प्राथमिक शाळेंत पढले नाहींत. कारण तसें होतें तर त्यांना मुसल्मानी साम्राज्याच्या अवस्थेचें अधिक ज्ञान प्राप्त झालें असतें. या ' युद्धश्रेष्ठ ' मुसलमानांच्या सैन्यांना प्रतिशोधक हिंदु सैन्यानीं शेंकडों युद्धक्षेत्रांत छिन्नविच्छिन्न केले नि तेंच मोंगल-साम्राज्य त्यानीं मोडून टाकलें. आणि मुसल्मानी वैभवाच्या आणि सत्तेच्या अवशेषांवर स्वतंत्र हिंदु साम्राज्याची उभारणी केली. आणि मोंगल सम्राटांना वृत्तीजीवि नि बंदी म्हणून वागवलें. याप्रमाणें लॉर्ड झेटलंड महाशयांना ज्ञान झालें असतें तर त्यांना वरील कोटीक्रमाचा लाभ मिळाला नसता.

परंतु मुस्लीम लीगच्या या अलीकडच्या चळवळीनें आमच्या काँग्रेस मित्रांनी आतां रुष्ट होण्यांत अर्थ नाहीं. आजचा मुक्तता-दिन हा पूर्वीं कॉंग्रसनें आनंदानें साजरा केलेल्या खिलाफत–दिनाचा क्रमप्राप्त नि अपरिहार्य परिणाम आहे. तुम्हीच मुसल्मानांमध्यें हा विश्वास निर्माण केला कीं, ते जितकें अधिक मागतील तितकें तुम्ही देतां, ते जितके डोळे वटारतील तितका तुम्ही अनुनय करतां, ते जितकें कनवठीस लावतील तितकें तुम्ही अधिक पुढें करतां, ते जितके अधिक कृतघ्न होतील तितके तुम्ही त्यांच्याकडून कृतज्ञता संपादन करण्याच्या तीव्र इच्छेनें विव्हल होतां. तुम्हींच त्यांना कोरे चेक देऊं केलें नाहीं काय ? मग लहर लागेल तितकी खंडणी त्यावर त्यांनीं लिहिण्यास आरंभ करतांच तुम्ही कां दिङ्मूढ होतां ? डॉ. मुंजे, भाई परमानंद आदि करून हिंदु सभेच्या पुढाऱ्यांनीं तुमच्या खिलाफतीच्या धोरणाचा निषेध केला, तुमच्या कोऱ्याचेकांचा निषेध केला, ' ना मान्य ना अमान्य ' अशा तुमच्या विक्षिप्त, अर्थहीन धोरणाचा धिःक्कार केला. तेव्हां तुम्हीच त्यांना दुष्ट, जातीय लोक म्हणून धिःकारलें. आंतल्या आवाजाशीं साक्षात-संस्पर्श प्राप्त झालेले जगाचे मार्गदर्शक म्हणून, केवळ प्रेमानें जग जिंकण्याच्या ईर्शेनें पुढें आलेले नवधर्म-संस्थापक म्हणून तुम्हींच मिरविलांत आणि ज्यांनीं खड्ग धारण करून राज्य आक्रमिलें त्या शिवाजी नि राणा प्रताप यांना तुम्हीच भ्रांत देशभक्त ठरवलेंत. असें असतां आज केवळ एका व्यक्तीला-मुस्लीम लीगच्या अध्यक्षाला-प्रेमानें जिंकण्याच्या नि तोषविण्याच्या कामांत मार्गदर्शक कोणी नाहीं म्हणून खिन्न होत आहां. आणि

गव्हर्नरांच्या दाराशीं, त्यांचा या कामीं हातभार लागावा म्हणून याचकासारखे उभे आहांत, ही तुमची आजची दैन्यावस्था अतिशय अनुकंपनीय होय. दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या ज्या वेळीं कोणा ब्रिटिश अधिकाऱ्यानें हिंदुमहासभेच्या धोरणाच्या एखाद्या अंगाची किंचित् प्रशंसा केली त्यावेळीं आमचे काँग्रेसचे राष्ट्रीय लोक ओरडून उठत असत कीं, " हें पहा, ब्रिटिश लोकांनीं त्या त्यांच्या धोरणाच्या अंशाची प्रशंसा करावी यापेक्षां या जातिनिष्ठ हिंदुसभावाल्यांचा अराष्ट्रीयत्वेचा दोष सिद्ध करण्यास आतां दुसर कोंणतें प्रमाण पाहिजे. ? " आणि आज या राष्ट्रीय काँग्रेस पुढाऱ्यामध्यें अक्षरशः चढाओढ चालू झाली आहे ती यासाठीं कीं काँग्रेस मंत्री कांहीं झालें तरी इतके वाईट नव्हते आणि ब्रिटिशांना समाधान देण्यासारखें त्यांनीं राज्ययंत्र चालविलें हें सिद्ध करण्यासाठीं ब्रिटिश गव्हर्नर व व्हाइसरॉय यांच्याकडून प्रशंसा-पत्र मिळवावें आणि तें जगापुढें आढ्य-तेनें मांडावें ! मुसलमानांच्या सीमा-प्रांतांतील, मलबारांतील वा बंगाल्यांतील अत्याचारांविरुद्ध जेव्हां जेव्हां ब्रिटिश राज्याकडून हिंदुसंघटनवाद्यानीं न्याय्य संरक्षण मागितलें तेव्हां तेव्हां ज्या काँग्रेस पुढाऱ्यांनीं संघटनवाद्यांस दोष दिला, तेच काँग्रेसचे पुढारी आज अहमहमिकेनें व्हाइसरॉयकडे आणि गव्हर्नराकडे धांव घेत आहेत आणि विनंति करीत आहेत कीं, मुस्लीम लीगनें काँग्रेसविरुद्ध केलेल्या आरोपासंबंधीं त्यांनीं न्यायाधीश म्हणून निर्णय द्यावा आणि काँग्रेसला निरपराधी-पणाचें निकालपत्र देऊन तिची प्रतिष्ठा राखावी. हें दृश्य अतिशय मनोरंजक आहे. आपल्या मुस्लीम बांधवांशीं आपले जे कांहीं आपसांतले मतभेद आहेत ते सोड-विण्यासाठीं त्रयस्थ आणि बाहेरच्या ब्रिटिशांना पुढें येण्याची विनंति करणें हेंहि आतां राष्ट्रविघातक नव्हे काय ?

' तिसऱ्या पक्षा ' ची काँग्रेसनिर्मित उपपत्ति भ्रमात्मक असून ती पुष्क-ळच प्रमादांना कारणीभूत झालेली आहे हेंहि येथें सांगणें बोधक नि म्हणू-नच आवश्यक आहे. काँग्रेसवाले नित्य कल्पना बाळगत होते कीं, मुसलमान लोक स्वतः होऊन राष्ट्रविरोधी नि हिंदुविरोधी व्यूह रचणार नाहींत. जिना हक्क--हयातखानादि मुसलमान हे सरळ मनाचे असून राजकीय कपट-व्यूह करण्यासारखे नाहींत; आणि इस्लाम म्हणजे शांतता नि सौजन्य यांचे भक्त असल्यानें स्वतः होऊन ते हिंदूविरोधी राजकीय आक्रमणाची आकांक्षा

धरणार नाहींत. इतकेंच नव्हे तर कॉंग्रेसवाल्यांना असाहि भ्रम आहे कीं, " सीमाप्रांतीय मुसलमान जाति, " शूर मोपला बंधू " आणि हिंदूंवर भयंकर अत्याचार चालविणारे बंगाल नि सिंधमधील मुसलमान यांना या अत्याचारांची अंतर्गत स्वयंभू प्रेरणा मुळींच नाहीं. ' ब्रिटिशांच्या तिसऱ्या पक्षा'नेंच त्यांना हिंदुविरुद्ध उठावणी करण्यास भाग पाडलें आहे; ब्रिटिशांनीं येथें पाऊल ठेवलें नव्हतें तेव्हां आम्ही हिंदु मुसलमान पूर्ण सलोख्यानें नि बंधूभावानें नांदलों, आणि हिंदुमुसलमानांचे दंगे कधींच झाले नाहींत. "

सहस्त्रावधि कॉंग्रेसनिष्ठ हिंदुंना या अत्यंत मूर्खपणाच्या भ्रांत कल्पनेनें ग्रासल्याचें दिसून येतें. महमद कासीम, गझनी, घोरी, अल्लाउद्दिन औरंगजेब इत्यादिकांनीं धर्मवेड्या क्षोभानें हिंदुंच्या हिंदुस्थानावर सशस्त्र आक्रमण करून तें उध्वस्त केलें. त्यावेळीं त्यांना जणूं काय ब्रिटिशांच्या तिसऱ्या पक्षानें प्रोत्साहन दिलें! गेल्या १० शतकांचा हिंदुमुसलमानांमधील सततच्या युद्धाचा इतिहास म्हणजे जणूं काय प्रक्षिप्त वा कल्पित कादंबरीच आहे! जणूं काय मि. जिना नि सर शिकंदर यांचे सहकारी म्हणजे केवळ शाळेंतील मुलें नि त्यांना उनाड ब्रिटिश पोरांनीं वर्गांत खाऊ देऊन बिघडविलें आणि त्यांच्या नादीं लागूनच केवळ हीं मुलें शेजाऱ्यांच्या घरावर दगड फेकूं लागली. ते म्हणतात कीं, " ब्रिटिश येण्यापूर्वी हिंदुमुस्लीम दंगा ही अश्रुतपूर्व गोष्ट होती. " होय. पण याचें कारण दंग्याचे ठिकाणीं युद्धेंच चालू होती म्हणून !

पण गांधीं म्हणतात त्याप्रमाणें, मुसलमानांना मोह पाडून हिंदुविरोधास नि राष्ट्रद्रोहास प्रवृत्त करण्याचा दोष सर्वस्वी ब्रिटिशांच्या तिसऱ्या पक्षावर येतो असें क्षणभर मानलें, तर आज गांधी नि त्यांचे कॉंग्रेसनिष्ठ सहकारी याच " तिसऱ्या पक्षा'स कां बोलवीत आहेत, नि मुस्लीम लीगनें, कॉंग्रेसवर केलेल्या आरोपाप्रमाणें कॉंग्रेस ही वस्तुतः दोषी आहे कीं काय याचा न्याय करण्यास व्हाइसरायांना आणि गव्हर्नरांना पंच म्हणून का आणवीत आहेत ? सर्वांत प्रमुख असा आरोपीचा सहकारी हाच उत्तम पंच होईल काय ? ज्याला तुम्ही अपराधाचा मुख्यच प्रवर्तक म्हणतां त्याला त्याच अपराधासंबंधींचा न्याय करण्यास तुम्ही बोलावणार ! जर कॉंग्रेसचा भ्रम खरा असेल तर ज्या

योगें कॉंग्रेस नि लीग यांच्यातील वितुष्ट नि अविश्वास दृढ होईल असाच निर्णय हे ब्रिटिश पंच देतील नि त्यामुळें हिंदुमुसलमान ऐक्याचा नि समजुतीचा संभव अधिकच दुरावेल. म्हणजे एक तर तुमची तिसऱ्या पक्षाची उपपत्ती तरी असत्य नि भ्रामात्मक असली पाहिजे नाहींतर या आगलाव्या तिसऱ्या पक्षाकडेच पंच म्हणून जाण्यांत तुम्ही उघड घोटाळा करीत आहांत.

मुसलमानी धर्म, धर्मप्रवर्तकांची त्यांची परंपरा नि इतिहास या सर्वांचे योगें त्यांचे मनांत मूलतः इस्लामी राजकीय वर्चस्वाची आकांक्षा निर्माण होते. ही साधी गोष्ट कॉंग्रेसनिष्ठ हिंदूंनीं अद्यापहि लक्षांत घ्यावी म्हणजे या प्रमाद-परंपरेपासून ते वाचतील. ब्रिटिशांचें धोरण त्यांच्या सोयीप्रमाणें; कधीं कधीं आगलावेपणाचें असतें. पण स्फोटक द्रव्याचें भांडार मूळ मुसलमानांचेच. त्याला प्रतिबंधांत ठेवतां येईल, पण जो कोणी त्याच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करून केवळ आगलावी काडी म्हणजेच स्फोट साठा अशा भ्रमांत राहील त्याची अवस्था कठीण. ब्रिटनकृत काडी नसली तर तेंच कार्य दुसरीहि काडी करूं शकेल. इतकेंच नव्हे तर आपोआप घर्षणानें पेट घेण्याचाहि या स्फोटक द्रव्याचा स्वभाव आहे. दुसरें असें कीं, मुसलमान हे पराकोटीचे व्यवहारवादी राजकारणी आहेत. यामुळें ते स्वभावतः जो बलिष्ठ असेल त्याचेपुढें नम्रता नि मित्रभाव दाखवितात, मग तो शत्रूतला शत्रू का असेना, आणि दुर्बलांशीं दमदाटी चालवितात. इंग्लंडनें त्यांना हिंदुस्थानांत नि इतरत्र परतंत्र अवस्थेला नेले नाहीं काय? सध्या इंग्लंड हें अधिक बलिष्ठ आहे. म्हणून ते इंग्लंडशीं लडिवाळपणा दाखवितील आणि हिंदूंविरुद्ध आक्रमणाचें धोरण चालवितील. उद्यां हिंदु जर बलिष्ठ झाले तर ते हिंदुंशींहि नम्रभावानें नि बंधुभावानें वागतील. पेशव्यांच्या वेळीं महाराष्ट्रांत नि रणजितसिंगाचे वेळीं पंजाबांत ते असेच वागले. कॉंग्रेसच्या ठराविक शब्दजालानुसार–' हिंदु नि मुसलमान यांचे दंग्याची गोष्ट पूर्वी ऐकूं येत नव्हती '–ती याच कारणामुळें.

मुस्लीम लीगच्या या उठावणी विरुद्ध चडफडण्याचें सोडून किंवा गांधी-वादी गटांचे हातून होणारी संभवनीय गोष्ट म्हणजे अधिक नमतें घेणें, तीहि सोडून देऊन, आमच्या कॉंग्रेसनिष्ठ बंधुंनीं या प्रकारापासून नेत्रांजन मिळाल्या-प्रमाणें सावध होऊन आजवर त्यांनीं चालविलेल्या घातकी गर्तेतून आपले पाऊल

परत वळवावें आणि यापुढें मुसलमानांशीं मुसलमान म्हणून कोणतीहि बोलणीं करण्याचें नाकारावें, येवढीच माझी त्यांना कळकळीची विनंति आहे. ही मुळांतच झालेली चुक राष्ट्रीय सभेनें सुधारावी म्हणजे ती यथार्थ राष्ट्रीय सभा होईल. आपल्या प्रादेशिक राष्ट्रकल्पनेपासून तिनें यत्किंचितहि दूर जाऊं नये आणि मागील पाटी स्वच्छ करून नव्या लिखाणास आरंभ करावा. आपण पुढीलप्रमाणें तत्त्वांना बांधले आहोंत अशी तिनें एकदांच स्पष्टपणें घोषणा करून टाकावी. पहिलें तत्त्व असें कीं काँग्रेस कोणाहि मुसलमानाला मुसलमान म्हणून, ख्रिश्चनाला ख्रिश्चन म्हणून नि हिंदूला हिंदु म्हणून ओळखीत नाहीं; तर त्या सर्वांना केवळ हिंदी याच नात्यानें पाहून त्याच नात्यानें सर्वांशीं सारखा व्यवहार ठेवते. आणि म्हणून सर्व नागरिकांना निश्चित प्राप्त होणाऱ्या मूलभूत हितसंबंधाखेरीज इतर कोणत्याहि विशेष जातीय, धार्मिक वा वांशिक हितसंबंधाशीं काँग्रेस कांहीं एक संबंध ठेवणार नाहीं. दुसरें तत्त्व हें कीं, राज्यघटनेंतील स्थानावर केवळ गुणानुसारच निवडणुका होतील आणि मतदार संघाचे संबंधांत माणसागणिक एक मत या वाचून दुसरें कोणतेंहि तत्त्व काँग्रेस मानणार नाहीं. हिंदुस्थानांतली विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन केवळ एकच अपवाद मानण्याची काँग्रेसनें दया दाखवावी. तो अपवाद असा कीं, जातीय प्रतिनिधित्व जर ठेवावयाचेंच असेल तर तें प्रतिनिधित्व तंतोतंत संख्याबलाच्या प्रमाणांत रहावें. राज्ययंत्रांतील स्थानांचे संबंधांतहि तसेंच प्रमाण रहावें. पात्रतेनुसार मात्र तें असलें पाहिजे.

तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची ही गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, जोंपर्यंत अशी राष्ट्रीय नि न्याय्य घटना निर्माण करतां येत नाहीं तोंपर्यंत जातीय मतदार संघावर आधारलेल्या सध्याच्या घटनेमधील निवडणुकींत काँग्रेसनें कोणताहि भाग घेण्याचा मोह सोडावा. कारण या घटनेचा उद्देशच हिंदुस्थानांतील लोकांच्या एकसंधीपणाचा भंग करण्याचा असून तिचा पायाच जातीय भेदावर उभारलेला आहे. त्यायोगें ती बहुसंख्य जातीला घातक आहे नि अल्पसंख्याकांना राष्ट्रीयत्वाविरुद्ध विद्रोह करण्यास चिथावणी देणारी आहे.

जोवर मुसलमानांचें सर्वसामान्य असे विभक्त मतदार संघ आहेत आणि सर्वसामान्य याचा अर्थ व्यवहार्यतः हिंदु मतदार संघ असाच आहे, तोंवर केवळ

मुस्लीम लीग नि व हिंदुमहासभा यांनाच निवडणुकींत भाग घेऊं द्यावा आणि यथार्थत्वानें शुद्ध राष्ट्रीय संस्था म्हणून कॉंग्रेसनें त्यापासून सर्वस्वी अलिप्त रहावें, आणि विशिष्ट जातीय मतदार संघाशीं आत्मीयता पत्करून आपल्या भूमिकेवरून खालीं उतरूं नये.

जर कॉंग्रेस आपलें पूर्वीचें हिंदुविरोधी आणि राष्ट्रविरोधी धोरण सुधारील आणि मी वर निर्देश केल्याप्रमाणें भूमिका येईल तर यथार्थानें राष्ट्रीय संस्था म्हणून कॉंग्रेसची प्रतिष्ठा त्याच क्षणी वाढेल. असें झालें तर हिंदुमहासभा तिच्यावर प्रायः पूर्ववत् हार्दिक विश्वास ठेवील.

पण कोणत्याहि निमित्तानें आजच्या प्रमाणें हिंदु मतदार संघाच्या वतीनें निवडून यावयाचें आणि नंतर राष्ट्रीय म्हणून हिंदूंचे न्याय अधिकार बुडवावयाचे असला दुतोंडी व्यवहार कॉंग्रेसला आतां चालवितां येणार नाहीं. एकदां एक नि एकदां दुसरें याप्रमाणें कॉंग्रेस सुधारली नाहीं तर एकीकडे मुसलमान तिला केवळ हिंदुंची संस्था म्हणून सरळच म्हणणार आणि दुसरीकडे हिंदुसभा तिला राष्ट्र आणि हिंदुत्व या दोघांनांहि घातक असा भ्रमात्मक राष्ट्रीयतेचा उपद्रव म्हणून मानणार.

कॉंग्रेसचे डोळे उघडतील अशी मी आशा करावी काय ? अद्यापहि वेळ गेली नाहीं. माझे मित्र पुण्याचे श्री. केतकर 'मराठ्या'मध्यें सूचना करतात कीं, मुस्लीम लीगच्या मुक्तता दिनाला प्रतिरोधी म्हणून कॉंग्रेसनें आपला 'भ्रमनिरसन दिन' साजरा करावा आणि वर दिल्याप्रमाणें सर्व घडी उलटल्याची घोषणा करावी. आणि मुस्लीम लीगला सर्व पत्रव्यवहार थांबविणारा शेवटचा निरोप पाठवावा कीं, 'महाशय, आपण याल तर आपल्यासह, न याल तर आपल्यावाचून आणि विरोध कराल त्याला उच्छेदून आम्ही हिंदूंचें राष्ट्रीय स्वराज्य प्राप्त करून घेण्यासाठीं शक्य त्या मार्गानें प्रयत्न करूं.'

आणि आमच्या मुसलमान मित्रांना आपले अधिकार निश्चित करण्यासाठीं 'रॉयल कमिशन' पाहिजे असेल तर कॉंग्रेसनें त्यांना निर्धारपूर्वक असें सांगावें कीं, 'तुम्हाला स्वतंत्र पंचांचा निवाडा पाहिजे असेल तर त्या प्रकारचें सर्वोच्च न्यायासन राष्ट्रसंघ हेंच होऊं शकेल. आणि या राष्ट्रसंघानें सर्व जगभर असलेल्या अल्पसंख्य जातींविषयीं सार्वजनिक नियम पूर्वीच ग्रथित केलेले आहेत.

हिंदुस्थानांतील अल्पसंख्यांचा प्रश्नहि या राष्ट्रसंघाच्याच हातीं द्यावा.' वस्तुतः डॉ. मुंजे यांनीं पूर्वीच वर्तुल परिषदेचे वेळीं सुचविल्याप्रमाणें ही भूमिका काँग्रेसनें निर्धारानें घेतली असती तर सध्याप्रमाणें काँग्रेसची भलतीकडे वाताहात झालीच नसती.

( १३ )

# वर्गहितांचा राष्ट्रीय समन्वय

निवडणुकीचें घोषणापत्रक काढावयाच्या वेळीं हिंदुमहासभेला आपल्या आर्थिक धोरणासंबंधाचा कार्यक्रम लौकरच आखावा लागेल. सध्यां मी केवळ कांहीं सामान्य तत्त्वें सुचवून ठेवणें एवढेंच करूं शकतों. स्थलाभावामुळें अधिक विस्तार करीत नाहीं. प्रथम हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, मनुष्य हा केवळ एक आर्थिक जीव नाहीं. मनुष्य हा केवळ भाकरीवर जगत नसतो असें ख्रिस्तानें म्हटलें आहे तें समर्पक आहे. तें वचन जसें आध्यात्मिक दृष्ट्या सत्य आहे तसेंच वांशिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय नि इतर अनेक मानवी स्वभावाच्या अंशालाहि तें लागू पडतें. म्हणून सर्व मानवी व्यवहार नि इतिहास केवळ आर्थिक सूत्रांत सामावूं पाहणें हें सर्वस्वीं एकांगीपणाचें आहे. आणि त्याचा अर्थ असा होईल कीं, भुकेशिवाय दुसरी कोणतीहि जीवनाची प्रेरणा नाहीं. भाकरीचा प्रश्न नि भूक यां व्यतिरिक्त तितक्याच मूलभूत अशा वैषयिक, बौद्धिक, भावनानिष्ठ अनेक इच्छा मनुष्याला आहेत. त्यांतल्या कांहीं स्वाभाविक तर कांहीं कृत्रिम, कांहीं वैयक्तिक तर कांहीं सामाजिक असून त्यायोगें मनुष्याचें जीवन नि तसाच त्याचा इतिहास देखील संकीर्ण झाला आहे. मनुष्याला पोट आहे. पण पोट म्हणजेच केवळ मनुष्य नव्हे. म्हणून, जगांतील मनुष्यजातीस विभागणाऱ्या सर्व धार्मिक, वंशविषयक, राष्ट्रीय नि इतर वैरांचा निरास करण्यास आर्थिक हितसंबंधांचें बंधन हेंच सर्वोत्तम साधन म्हणून कधीं कधीं सुचविण्यांत येतें, तें केवळ वरवरचें नि अर्धवटपणाचें आहे. ज्या युरोपमध्यें या पंथाचे द्रष्टे निर्माण झाले आणि जेथें त्यांनीं आपलें उपदेशकार्य केलें त्याचप्रमाणें जेथें सर्व मानवी संस्थांमध्यें क्रांति करून त्यांची आर्थिक साचांत पुनर्घटना करण्या-

साठीं प्रचंड प्रयत्न झालें तेथेंहि धार्मिक, वंशविषयक नि राष्ट्रीय भेद विकोपास गेले आहेत. आणि शतकानुशतकें आर्थिक हितसंबंधांवर भर देऊन तेथें सतत प्रचार चालू असतांहि जर्मनीं, इटली, फ्रान्स, पोलंड, इंग्लंड, स्पेन इत्यादि देशांत हें धार्मिक, वांशिक नि राष्ट्रीय भेद दुर्दमनीयरीत्या पुढें येत आहेत. या एकाच गोष्टीवरून हें ध्यानांत येईल कीं सर्व धार्मिक, वंशविषयक नि राष्ट्रीय घटक एका क्षणांत नाहींसें करून टाकणें तुम्हांस शक्य नाहीं. कांहीं लोक असा सुलभ कोटिक्रम मांडतात कीं, ' सर्वांना एकाच आर्थिक भूमिकेवर एकत्रित करून वंश, संस्कृति इत्यादि भ्रममूलक भेद विसरून जाण्यास प्रवृत्त करणें जर शक्य झालें तर, ' इत्यादि. पण हे लोक मुसल्मानांचा विचार करीत नाहींत. तात्त्विक दृष्टि बाजूला ठेवून त्यांच्या विधानांतील ' जर तर ' या शब्दावरूनच व्यावहारिक दृष्ट्या तें व्यर्थ ठरतें. म्हणून सर्व हिंदुसंघटनवाद्यांच्या पुढें हिंदुस्थानभर उत्पन्न होणारे सांस्कृतिक, वांशिक नि राष्ट्रीय बिकट प्रश्न आर्थिक कार्यक्रमाच्या योगानेंच केवळ सुटूं शकतील अशा भ्रमांत त्यांनीं पडूं नयें.

त्याचप्रमाणें त्यांनीं हेंहि लक्षांत ठेवावें कीं, हिंदुस्थानच्या सद्यःपरिस्थितींत आर्थिक प्रश्न देखील धार्मिक नि वंशविषयक विघटनांशीं निगडित झालेले आहेत. हिंदुसंघटन क्षेत्रांतील कार्यकर्त्यांच्या अनुभवांवरून त्यांस अशीं सहस्रावधि उदाहरणें दिसून आलीं आहेत कीं, जे व्यवसाय मुसलमानांच्याच सर्वस्वीं हातीं आहेत, त्यांत हिंदु प्रवेश करूं गेल्यास त्यांचा छळ होतो. हिंदु पिंजारी किंवा टांगेवाला याना मारण्याचें भय दाखविण्यांत येतें. सीमाप्रांतात मुसलमान लुटारू नगरें आणि गांवें लुटतात तेथें नगारे वाजवून घोषणा करतात कीं, ' आम्हीं केवळ हिंदूंनाच लुटणार, कोणा मुसलमान व्यापाऱ्याला वा सावकाराला हात लावणार नाहीं. ' अशाप्रकारचीं शेंकडों उदाहरणें दाखवितां येतील. आतां या हिंदूंना तात्काळ संरक्षण नि साहाय्य करावयाचें तर हिंदु म्हणूनच त्यांची संघटना केल्यावांचून अन्य गति नाहीं. मुसल्मान पोलीस हे मुसलमान म्हणून त्यांचें संरक्षण करीत नाहींत; हा एक धार्मिक, जातीय, वंशविषयक रोग असून अर्थवादी रामबाण गोळ्यांनीं त्यांचें निवारण होणें शक्य नाहीं. या लाखों धर्मवेड्यांना, उदाहरणार्थ सक्कर विभागांतील गुडांना, हिंदूंचे आर्थिक हितसंबंध एक आहेत असा उपदेश करून त्यांच्यांत बंधुभाव निर्माण करणें शक्य होईल काय ?

ज्यांना वाटेल, त्यांनीं तो उपाय करून पहावा. पण तो यशस्वी होण्यास किती शतकें लागणार ? आणि मध्यंतरीं हिंदूंची गत काय ? चरख्याच्या साधनानें सर्व जग नित्य शस्त्रहीन करूं पाहणाऱ्या गांधीजींच्या एकेरी भ्रमात्मक उपाया-प्रमाणेंच यांचा हा उपाय आहे ! तरीहि मांजराचे गळयांत घंटा बांधण्याची नामी युक्ति व्यवहारांत आणण्याचें काम ती कल्पना सुचविणाऱ्या उंदराकडे सोंपवून द्यावें आणि इतरांनीं मात्र मध्यंतरीं व्यावहारिक उपाय नि साधनें यांच्यामागें लागावें !

सर्वांच्या आर्थिक हितसंबंधाच्या ऐक्यावर भर देऊन आणि निदान हिंदुस्थानांतले सर्व लोक तरी एका आर्थिक भूमिकेवर एकत्रित केल्यानें सर्व धार्मिक, वंशविषयक, राष्ट्रीय आणि सांस्कृतिक वैरभाव चुटकीसरसे नाहींसे होतील असल्या मृगजलाच्या आशांच्या नादी न लागतां आणि मानवी आर्थिक फळी उत्पन्न करण्याचें पुस्तकी शास्त्रीय उपाय सोडून देऊन हिंदु संघटनी लोकांनीं व्यावहारिक राजकारणी धोरणानें केवळ हिंदूराष्ट्राच्या आर्थिक उन्नती-पुरताच आपला तात्कालिक आर्थिक कार्यक्रम मर्यादित ठेवावा.

हिंदुस्थानांत असलेली विशिष्ट परिस्थिती आणि सामाजिक प्रगतिची आजची पायरी लक्षांत घेतां जवळच्या भविष्यकाळांत आपल्या आकांक्षाशीं जुळणारा जर कोणता अर्थशास्त्र विषयक सांप्रदाय असेल तर तो राष्ट्रीयत्ववादी अर्थशास्त्रज्ञांचा होय.

आमच्या आर्थिक धोरणांचे मुख्य घटकावयव एका सुलभ सूत्रांत मांडावयाचे तर त्याला ‘ वर्गहितांचा राष्ट्रीय समन्वय ’ असें नांव द्यावेंसें मला वाटतें. हिंदुसंघटनी भूमिकेचा हा आर्थिक पैलू होय.

प्रथम आम्ही यंत्राचें स्वागतच करतों कारण हें यंत्रयुग आहे. हस्तव्यव-सायांना देखील एक स्थान आहे आणि ते उत्तेजनार्हही आहेत. परंतु राष्ट्रीय उत्पादन हें शक्य तितक्या अधिकतम विस्तृत यांत्रिक प्रमाणावरच चालेल.

शेतकरी आणि कामकरी वर्ग हाच राष्ट्रीय संपन्नतेचा, शक्तीचा आणि आरोग्याचा मुख्य पाया आहे. कारण देशाला आरोग्य आणि संपत्ति पुरवणाऱ्या

याच दोन वर्गांवरच बलिष्ठ सैन्याच्या भरतीचीं केंद्रें मुख्यतः अवलंबून असतात. म्हणून त्या वर्गांच्या शक्तीचें आणि त्यांचीं निवासस्थानें म्हणून खेडेगांवांचें पुनरुज्जीवन होणें अवश्य आहे. केवळ जीवनाला नितांत आवश्यक वस्तु त्यांना मिळाव्यात इतकेंच नव्हे तर सर्वसामान्य सुखसोयींचा लाभ त्यांना व्हावा आणि तो लाभ करून घेण्यास त्यांना समर्थ करण्याइतका राष्ट्रीय संपत्तीच्या वाटणींत त्यांचा विभाग त्यांना मिळवतां येईल अशी व्यवस्था झाली पाहिजे. तरीहि हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सर्व सामान्यपणें राष्ट्राचेच ते अवयव आहेत आणि अर्थात् त्यांनीं आपल्या कर्तव्याचा नि उत्तरदायीत्वाचा वाटा उचलला पाहिजे. म्हणून राष्ट्रीय उद्योगधंदे, उत्पादन नि संपत्ति यांची सुरक्षितता आणि सर्व समाजाची प्रगति यांच्याशीं सुसंगत होईल अशा रीतीनेंच त्यांना त्यांचा अंशभाग मिळेल.

राष्ट्रीय उद्योग आणि उत्पादन त्यांच्यासाठीं राष्ट्रीय भांडवल असणें अपरिहार्य असल्यानें आणि तें भांडवल सद्यःपरिस्थितींत मुख्यतः वैयक्तिक असल्यानें त्यालाहि उत्तेजन आणि पुरस्कार योग्यप्रकारें देण्यांत येईल.

परंतु भांडवल आणि श्रम या दोहोंचें हितसंबंध सर्व राष्ट्राच्या सामान्य आवश्यकतेला पूरक म्हणूनच मानण्यांत येतील.

एखादा उद्योग जर भरभराटींत असेल तर त्याच्या लाभांतून मोठा विभाग श्रमिकांना मिळेल. परंतु उलट जर तो उद्योग आर्थिक दृष्टया हानिकारक होईल तर केवळ भांडवलवाल्यालाच नव्हे तर कांही अंशीं कामकऱ्यालाहि अल्पलाभावर संतुष्ट राहावें लागेल. हेतु हा कीं भांडवलवाले व कामकरी यांच्या स्वार्थी वर्ग-हिताच्या अवास्तव धोरणानें राष्ट्रीय उद्योगांची सर्वस्वी वाताहात होऊं नये. सारांश भांडवल नि श्रम यांच्या आकांक्षांचा वेळोवेळीं समन्वय करून सर्व राष्ट्राचे उद्योग आणि उत्पादन यांचें संवर्धन व्हावें आणि राष्ट्र स्वयंपूर्ण व्हावें असा प्रयत्न करण्यांत येईल.

व्यक्तिगत प्रयत्नांपेक्षां जे उद्योग अधिक कार्यक्षमतेनें चालवतां येतील आणि जे उद्योग राष्ट्रीय राजसत्ता स्वतः चालवू शकेल असे मुख्य मुख्य उद्योग-धंदे यांचें सर्वस्वी राष्ट्रीकरण करण्यांत येईल.

तेंच तत्त्व शेतीलाही लागू पडेल. कूळ किंवा शेतकरी आणि शेताचे धनी यांच्या स्वार्थी वर्गविषयक हितसंबंधांचें द्वंद्व माजूं न देतां शेताचे धनी आणि शेतकरी यांच्या हितसंबंधांचा अशा रीतीनें समन्वय करण्यांत येईल कीं, एकंदर राष्ट्रीय शेतीच्या उत्पन्नाचें संवर्धन व्हावें.

मोठ्या यंत्राच्या सहाय्यानें मोठ्या प्रमाणांवर आणि शास्त्रीय पद्धतीनें राज्याकडूनहि शेती विकत घेऊन कांहीं अंशीं चालवण्यांत येईल. यांत हेतु हा राहील कीं, याचा उपयोग शेतकऱ्यांना शेतीचें शिक्षण देण्याकडे व्हावा.

राष्ट्राची आर्थिक शक्ति ज्यायोगें क्षिण होईल आणि सामान्यतः राष्ट्रीय उद्योग नि उत्पादन यांची हानी होणें अपरिहार्य होईल अशा रीतीनें किंवा तशाच उद्देशानें जे संप किंवा टाळेबंद होतील त्यांचा निकाल राष्ट्रीय पंचायती मार्फत करण्यांत येईल आणि गंभीर परिस्थिती उत्पन्न झाल्यास निग्रहानें त्यास प्रतिबंधहि करण्यांत येईल.

व्यक्तिगत मिळकत ही सामान्यतः सुरक्षित मानण्यांत येईल.

कोणत्याही परिस्थितींत योग्य मूल्य ठरल्याशिवाय राजसत्ता अशा व्यक्तिगत मिळकतीचा अपहार करणार नाहीं.

विरोधी परकीय उद्योगधंद्यांपासून राष्ट्रीय उद्योगाच्या संरक्षणाचे कामीं राज्याकडून सर्वप्रकारें प्रयत्न होईल.

या वर दिलेल्या गोष्टी उदाहरणादाखल जातांजातां दिल्या आहेत. राष्ट्राच्या आर्थिक शक्तीचें संवर्धन व्हावें आणि तें आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावें या दोन मुख्य सूत्रांवर वरील सर्व धोरण आधारलेलें आहे.

अहिंदूंच्या आर्थिक आक्रमणाची भीति जेव्हां हिंदु आर्थिक हितसंबंधांना निर्माण होईल तेव्हां तेव्हां त्या हिंदु हितसंबंधाचे संरक्षण करणें हा अर्थातच हिंदुसंघटनावादी अर्थशास्त्राचा भाग राहील.

निजामी संस्थान, पंजाब, भोपाळ, आसाम आणि हिंदुस्थानचे इतर अनेक विभाग ह्यांमध्यें आज अशाच प्रकारचें हेतूपूर्वक आर्थिक आक्रमण घडत आहे. सर्व ठिकाणच्या हिंदुसभांनीं असा कटाक्ष ठेवावा कीं, हिंदु शेतकरी, हिंदु

व्यापारी, हिंदु कामकरी यांची अहिंदु आक्रमणाचे योगानें हानि होऊं नये नि त्याचप्रमाणें हिंदूंमधीलच परस्पर विरोधी होणारे आर्थिक हितसंबंध हे वर दिलेल्या सामान्य तत्त्वांचे अनुषंगानें सोडविण्यांत यावेत.

( १४ )

# हिंदू संघटणेचा पहिला विजय

चालू वर्षांत झालेल्या सर्व घटनांमध्यें हिंदूंचे दृष्टीनें सर्वोच्च आणि आपल्या आगामी कार्यक्रमांत नि धोरणांत नित्य ध्येयरूपानें नांदणारी अशी घटना कोणती असेल तर ती अर्थात् या वर्षातील पूर्ण सहा मासपर्यंत निजामी राज्यांतील हिंदु विरोधी धोरणास तोंड देण्यास्तव आपणास कराव्या लागलेल्या निःशस्त्रप्रतिकाराचे चळवळीची. तें एक क्रूसेड ( धर्मयुद्ध ) होतें तितकेंच पवित्र नि वीरतेचें होतें. आपल्या आर्यसमाजी बंधुंना या युद्धांतील अघाडीचे आघात सहन करावे लागले. दहा सहस्रांवर आर्य या युद्धांत प्रविष्ट झाले आणि धैर्यानें तें युद्ध चालवून त्यांनीं सिद्ध केलें कीं, आपल्या कालांतील पहिले नि अग्रगण्य हिंदुसघटक श्रीमहर्षि दयानंदसरस्वती यांनीं प्रज्वलित केलेला यज्ञीय अग्नी दिनप्रतिदिन अधिकच प्रज्वलित होत असून त्यांचें अंगिकृत कार्य योग्य अशांचेच हातीं पडलेलें आहे. हिंदुमहासभेची फळी घेतल्यास, तिचे वतीनें पांच सहस्र प्रतिकारकांनीं निजामनिर्मित हिंदूविरोधी निर्बंधांचा भंग करून अविचलित धैर्यानें नि प्रशंसनीय धोरणीपणानें ही झुंज चालू ठेवली. अशारीतीनें आर्यसमाज नि हिंदुमहासभा यांनीं युद्धाचा मुख्यतः भार उचलला असला तरी, व्यापक हिंदुत्वाचें दृष्टीनें विशेष उल्हसित करणारी अशी गोष्ट ही कीं, केवळ आर्यसमाज वा हिंदुमहासभाच नव्हे तर सर्वच्या सर्व हिंदु बांधव हिंदुध्वजाखालीं सामील होऊन त्यांनीं जिव्हाळ्यानें या युद्धांत भाग घेतला. या अखिल भारतांतल्या हिंदुमात्रांची त्यागबुद्धी नि सहानुभूति आपल्या मागें नसती तर हें युद्ध आपल्याला असें चालवितां आलेंच नसतें. हिंदुसंघटनवाद्यांनीं निजामी सत्तेला ज्या मागण्या मान्य करावयास भाग पाडले त्या व्यतिरिक्त, वर निर्दिशिलेली घटना हीच माझ्यामतें निर्देशयोग्य नि स्थायी अशी आपली यशसिद्धी होय.

कारण पवित्र हिंदु कार्यार्थ चालविलेल्या या धर्मयुद्धानें हें प्रात्यक्षिक पटविलें कीं, जाति नि पंथ, सांप्रदाय नि मार्ग, असूनहि सर्वव्यापक हिंदुत्वयुक्त समाज, सामान्य राष्ट्रीय जीवनानें अद्यापहि धगधगतो आहे. ज्यांना त्यांनीं कदाचित् व्यक्तिशः पाहिले नसेल वा ज्यांचा परिचयहि नसेल अशा निजामीतील आपल्या स्वधर्मीय व स्वराष्ट्रीय लोकांस सोडविण्यासाठीं आपलें जीवितहि संकटांत घालून, आपली घरें–दारें नि आप्तस्वकीय यांचा त्याग करून सहस्त्र–सहस्त्र हिंदू धांवून गेले. पंजावी नि सिंधी, बंगाली नि बिहारी मराठे नि मद्रासी, ब्राह्मण नि भंगी, सनातनी, आर्यसमाजी, शीख, जैन, लिंगायत धनिक नि निर्धन, असे हिंदु म्हणून अभिमान मानणारे सर्व लोक सामान्य हिंदुध्वजाखालीं हिंदूंचा मान राखण्यासाठीं पुढें सरसावले आणि असंख्यात आपत्ति, भयानक दंगली, लाठीमार नि संगिनी, उपासमार नि शोष आणि प्रत्यक्ष मरण यांनाहि न जुमानतां शेवटच्या श्वासापर्यंत " हिंदु धर्म–की जय, हिंदुस्थान हिंदुओंका " हें घोषित राहिले.

उदाहरणार्थ, " वंदेमातरम् किंवा हिंदुओंका " या घोषणा करण्यास्तव ज्यांना फटके वा वेत मारण्यांत आले ते श्री. रेड्डी किंवा इतर हिंदु संघटक यांची गोष्ट घ्या. प्रत्येक फटक्यागणिक वा वेताच्या आघातासरशी ते ' वंदेमातरम् नि हिंदुस्थान हिंदुओंका ' या घोषणांचा पुनरुच्चार करीत गेले. जे अनेक शूर छळ सोशीत मेले त्यांच्यांत कुमार सदाशिव पाठक नांवाचा सोळा वर्षाचे आंतील एक महाराष्ट्रीय युवक होता. छातींत भयंकर कळा येत असल्याविषयीं तो विव्हलतने सांगत असतांहि त्याला जड दगड प्रत्यहीं वहावयास लावले. तरीहि त्यानें शरणागती लिहून देण्याचें नाकारून आपले प्राण सोडले. आर्यसमाज नि हिंदुसभा या उभयतांकडून लौकरच या युद्धाचे विश्वसनीय इतिहास प्रसिद्धिले जाणार आहेत. त्यांतून धैर्ययुक्त नेटाची अशीं अनेक उदाहरणें आपल्याला वाचावयास मिळतील.

या धर्मसैनिकांना कोणतेंहि वेतन मिळालें नाहीं किंवा त्यांच्या कुटुंबीयांना वृत्तिवेतन मिळण्याचेंहि आश्वासन कोणी दिलें नव्हतें. त्यांतील कित्येकांनीं क्वचित् सहस्त्राहूनहि अधिक मासिक वेतन वा प्राप्ति असणाऱ्या उद्योगांचा व अधिकारांचा त्याग केला होता. या सर्वांना विदित होतें कीं, त्यांना स्वतः शस्त्रहीन राहून

सशस्त्र बळापुढें उभें रहावें लागणार होतें. आणि पूर्वी पुढें गेलेल्यांच्या अनुभवावरून त्यांना हेंही कळून चुकलें होतें कीं, त्यांना छळ, उपासमार, लाठीमार नि संगिनी यांना तोंड द्यावें लागणार. तरीहि स्वेच्छेनें ते पुढें चालले होते, त्यांच्यावर नैतिक नियोजनाखेरीज दुसरें कोणतेंहि नियोजन नव्हते. आपल्याला ऐकून आश्चर्य वाटेल कीं, औरंगाबाद येथील हिंदुसंघटक बंद्यांवरील भयंकर लाठीमाराचें वृत्त आल्यावरहि आपल्या शिबिरांतून प्रविष्ट होण्यास अधिकाधिक संख्येनें स्वयंसैनिक येत होते. एकवार प्रतिकार करून निजामी बंदीवासांत शिक्षाकाल संपवून परत आल्यावर नि त्वरित, पुन्हां निजामींतील हिंदुविरोधी निर्बंधाचा भंग करण्यास पुनः धाडा असा आग्रह कित्येक करीत होते. हिंदुसंघटण पक्षानें युद्धाचें शिंग फुंकताक्षणीं चौदापंधरा सहस्र प्रतिकारकांचें हें हिंदु बल उभें राहू शकलें यावरून आपल्याला नि जे आपल्या मागण्यांना अवमानतात त्यांनाहि बोध घेण्यासारखा आहे. नैतिक धैर्याचे दृष्टीनें हे पंधरा सहस्र हिंदु संघटकांचें बल आज युरोपमध्यें झुंझणाऱ्या इंग्रजांच्या वा जर्मनांच्या सैन्यबलापेक्षां उच्च प्रतीचें होय. ही केवळ निःशस्त्रच अशा प्रतिकाराची चळवळ नसती नि आम्हांस प्रतिपक्षीयांच्या संगिनीला संगीन नि रायफलीला रायफल रोखतां आली असती तर आम्हीं सशस्त्र प्रतिकारांकहि युरोपीय सैनिकांहून सरस ठरलों असतों असा संभव आहे. परंतु संभवनीय गोष्टी सोडून दिल्या तरी, केवळ प्रत्यक्ष घडलेल्या घटनाहि हिंदुस्थानांतील हिंदुसंघटनवादी पक्षांमध्यें आत्मविश्वास नि नैतिक जय मिळविल्याची प्रोत्साहक जाणीव निर्माण करण्यास पुरेशा आहेत. आणि त्याच घटना हिंदुविरोधी दलांनाहि बजावण्यास पुरेशा आहेत कीं मागें हिंदुमहासभेचे ठराव जसे कःपदार्थ मानीत आलें तसे आतां मानण्या आधीं तीनदां विचारच केला पाहिजे. गेल्या वर्षी नागपूर नि सोलापूर येथें ठराव रूपानें आपण जे शूरत्वाचे शब्द उच्चारले ते आज पुनः कलकत्त्यास नव वर्षापूर्वी एकत्रित होण्याचे आधींच शूरत्वाच्या कृतीचे रूपानें परिणत झालेले आहेत.

या युद्धासंबंधाचा आणखी एक अंश विशेष उल्लेखनीय आहे, कारण त्या योगें हिंदू आंदोलनाच्या भावी क्रमावर विशुद्धीकारक परिणाम होणार आहे. गेल्या वीस वर्षांत एक घातक समज हिंदूंच्या मनाला ग्रासून राहिला आहे. तो असा कीं, एकादें कार्य अंगभूत गुणांनीं हिंदूंच्या दृष्टीनें कितीहि उदात्त असलें

तरी कॉंग्रेसनें त्या कार्याला ' राष्ट्रीय ' म्हणून मान्यतापत्र देण्याची लहर प्रगट केली नाहीं तोंपर्यंत तें कार्य योग्य मानावयाचें नाहीं. आणि या संबंधांत शंभरांत नव्व्याणव वेळा ' राष्ट्रीय ' शब्दाचा अर्थ नेमका ' हिंदुविरोधी ' असा ठरावयाचा; त्याचप्रमाणें सर्व हिंदुस्थानव्यापी चळवळ यशस्वीपणें चालवावयाची तर ती कॉंग्रेसच्या ध्वजाखालींच चालली पाहिजे ! निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीनें हा भ्रम दूर केला आहे. कोहाट येथें पूर्वी मुसलमानांनीं जे हत्याकांड माजविलें त्यावेळीं किंवा मलबारांतलि गांवागांवातून मोपल्यांनीं हिंदूंची सरसकट हत्या केली त्यावेळीं देखील अखिल भारतांत अखिल हिंदू भूमिकेवरून या मुसलमानी धर्मवेडाचा धिःकार करण्यास हिंदु धजले नाहींत. कारण तसें करणें ' राष्ट्रीय ' ठरतें असें कॉंग्रेसचें आज्ञापत्र नव्हते ! तोच खेळ निजामी चळवळीचे वेळीं चालविण्याचे कॉंग्रेसच्या मनांत होतें. आणि तिनें निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीला सर्वाधिकारीत्वाच्या आविर्भावानें जातीय नि अराष्ट्रीय ठरविलें. पण यावेळीं हिंदु संघटण पक्षापाशीं आपली स्वतःची स्वतंत्र तत्त्वनिष्ठा होती. तर्कशुद्धपणें राष्ट्रीय काय आणि अराष्ट्रीय काय याची योग्य कल्पना या पक्षाला आलेली होती. त्याचप्रमाणें हिमालयी प्रमादांस निश्चयेंकरून ज्यांत अवसर राहतो असें स्वतःच मान्य करणारा ' आंतला ध्वनी ' ( आवाज ) किंवा अंधकार देखील पुरेसा उजळ न करू शकणारा ' नवा प्रकाश ' किंवा कॉंग्रेसरूपी चर्चच्या पोपनें काढलेलीं आज्ञापत्रें इत्यादिकांना आंधळेपणानें आणि हूं का चूं न करतां मान नमविण्याचे वृत्तींतून हिंदु संघटण पक्ष मुक्त झालेला होता. आणि म्हणूनच तो निजामी संस्थानांतील आपल्या धर्मबांधवांना आणि राष्ट्रबांधवांना सोडविण्यासाठीं हिंदुध्वजाखालीं पुढें सरसावला. पेशावरपासून मद्रासपर्यंत सर्व देशभर सर्व दिशांनीं ही चळवळ त्वरेनें पसरली. उदाहरणार्थ, एकाच दिवशीं हिंदुसंघटण पक्षाच्या आज्ञेला अनुसरून प्रांतोप्रांतींच्या मुख्य नगरांमध्यें आणि गांवांमध्येंहि सर्वत्र मिळून 'निजाम निषेधादिन' नि 'हिंदुराष्ट्रदिन' पाळण्यासाठीं कोटीहून अधिक हिंदु एकत्रित झाले होते. त्यांनीं पुरस्कारिलेली हिंदुत्वाची चळवळ जो जो कॉंग्रेसनें जातीय नि अराष्ट्रीय म्हणून विरोधावी वा शापावी तो ता जणूं काय त्या येगेंच ती वाढत चालली.

कॉंग्रेसनें या चळवळीला विरोध कां केला? कॉंग्रेस संस्थानांची सुधारणा करूं इच्छिणारांना? ठीक, तर मग हैद्राबाद हें सर्व हिंदुस्थानांतील मोठें संस्थान असूनहि सर्वांत अधिक दुर्व्यवस्थेचें नि अनियंत्रीत संस्थान नव्हतें काय? निदान तालुक्याएवढ्या राजकोट संस्थानांत जितक्या निकडीनें घटनात्मक सुधारणा प्रस्थापित करणें नि नागरिक स्वातंत्र्य मिळवून देणें अवश्य होतें तितकेंच निजामी संस्थानांतहि होतें हें निश्चित; क्षुद्र राजकोट संस्थान सुधारण्याच्या चळवळीनें अखिल भारतीय प्रश्नाचें प्रचंड रूप धारण केलें आणि वीरावाल्याच्या अल्पशा चहाच्या चषकांत समग्र हिंदी महासागराला आग लागली असें गांधींनीं आपल्याला भासविलें नाहीं काय? आणि तरीहि निजामी संस्थानांतील सुमारें एक कोट प्रजाजनांच्यासाठीं घटनात्मक सुधारणा-मागणीच्या प्रश्नांवर हिंदुमहासभेनें हातीं घेऊन लढविलेली चळवळ गांधींना हिंदी प्रश्नापासून इतकी दूरची नि असंबद्ध वाटली कीं आफ्रिकेंतील हवशी आणि युरोपमधले स्पॅनिश वा झेक यांच्या प्रीत्यर्थ गांधींनां जितकी सहानुभूती वा आत्मीयता वाटली तितकीहि या चळवळी-संबंधानें त्यांना दाखवावीशी वाटली नाहीं. केवळ गांधीजीच नव्हे तर प्रतिगामी, पुरोगामी, वा अंतर्गामी गटांपैकीं कोणीहि कॉंग्रेसवाले गट वा त्यांचे म्होरके औरंगाबाद बंदीगृहांतील अमानुष लाठीहल्ल्यानंतर वा हैद्राबादच्या रक्तपातमय दंग्यानंतर देखील निषेध करण्यास पुढें आला नाहीं. त्याचप्रमाणें कॉंग्रेसनें नागरिक अधिकाराचा पुरस्कार केला आहे ना? आणि निजामी राज्यांत लक्षावधि हिंदूंचें जीवित नि वित्त प्रतिदिनीं संकटांत होतें आणि कोणत्याहि प्रकारें भाषण, पूजा वा संघ यांचें स्वातंत्र्यहि तेथें अस्तित्वांत नव्हते ही वस्तु-स्थिति सत्य नाहीं काय? मग या संस्थानांत नागरिक स्वातंत्र्य मिळण्यासाठीं जी प्राणपणाची झुंज हिंदुसंघटणवादी लोकांनीं चालविली होती त्यांत कॉंग्रेसनें सहकारिता कां केली नाहीं? निदान त्यांच्या मागण्यांच्या न्याय्यतेला पुष्टी देणारे ठरावहि कां केले नाहींत? हिंदुसंघटनवादी लोक हिंदी म्हणून नव्हे तर हिंदु म्हणून रणक्षेत्रांत उतरले म्हणूनच ना? ठीक, हिंदु या नात्यानें पुण्यकर्म करणें हें देखील हिंदूंचें पाप असेल, मात्र निवडणुकीचे दिवशीं आपल्याला हिंदु म्हणून लिहून देणाऱ्या आणि हिंदु मतदार संघाचा घटक म्हणून उभा राहिलेल्या कॉंग्रेसवाल्याला मात्र हिंदूनें मत द्यावें! उलट ज्यावेळीं काश्मीरांतील

मुसलमान बाहेरच्या मुसलमानांच्या सहाय्यानें तेथील हिंदु राजाविरुद्ध सशस्त्र विद्रोह करून उठले नि मुसलमानांना मुसलमान म्हणूनच प्रतिनिधित्व मागूं लागले, त्यावेळीं लोकसत्तेचे जन्मजात पुरस्कर्ते म्हणविणारे गांधीजी लिहिते झाले " कीं जर शेंकडा ८५ असलेल्या आपल्या मुसलमान प्रजेचा असंतोष दूर करून त्यांचें समाधान करणें काश्मीरच्या हिंदुराजाला शक्य होत नसेल तर त्याला राज्य करण्याच्या कोणताहि नैतिक अधिकार नाहीं आणि त्यानें राज्यत्याग करून त्वरीत काशीवास करावा ! मग निजामी प्रजेंतहि शेकडां ८५ हून अधिक हिंदु अहेत आणि त्यांनीं आपल्या बाहेरच्या धर्मबांधवांच्या सहाय्यानें आपल्याला असह्य झालेल्या धार्मिक, सांस्कृतिक नि राजकीय छळांचा प्रतिकार करण्यासाठीं केवळ निःशस्त्र अशी चळवळ चालू केली असता याच जन्मजात लोकसत्तावादी गांधींनीं निजामाला राजत्याग करून निवृत्त होऊन मक्केला जाण्याचा उपदेश केला काय ? मुळींच नाहीं; उलट त्यांनीं स्पष्ट शब्दांत लिहिलें कीं निःशस्त्र प्रतिकार चळवळीच्या प्रारंभापासून अंतापर्यंत त्यांची एकमेव सर्वतोपरी काळजी ' अला हजरत निजाम यांना उपद्रव न पोंचावा ' एवढीच काय ती होती !

निजामी राज्याच्या हिंदुविरोधी धोरणास तोंड देण्यासाठीं हिंदुसंघटनवाद्यांनीं चालवलेल्या चळवळीचा पराभव व्हावा या हेतूनें राष्ट्रीयछाप काँग्रेसवाल्यांनीं जे अनेक उपद्व्याप केले ते मला येथें मांडतां येतील. परंतु तो माझा प्रस्तुत उद्दिष्ट विषय नव्हे. मीं केवळ इतकेंच म्हणतों कीं, हिंदुमहासभेला इंग्लिश पार्लमेंटच्या कांहीं सभासदांची देखील सहानुभूति मिळवतां आली. औरंगाबाद बंदीगृहांत नि भागानगरच्या दंग्यांत हिंदूंना जो छळ सोसावा लागला त्यासंबंधीं निषेध प्रगट करण्यासहि ते प्रवृत्त झाले. पण सातहि प्रांतांपैकीं कोठल्याहि काँग्रेसवाल्या मंत्र्यांनीं या विषयाला दुरून देखील स्पर्श केला नाहीं. विधिमंडळांत वा काँग्रेसमध्यें हा प्रश्न चर्चेला कोणी काढला नाहीं किंवा निजामी सत्तेविरुद्ध नि हिंदुंच्या वतीनें एकहि शब्द उच्चारला नाहीं आणि क्षुद्रतम अशा राजकोट प्रकरणांत मात्र एकदम त्यागपत्रें देण्याची भीति हेच काँग्रेसचे मंत्री दाखवूं शकले.

ह्याचें तात्पर्य उघड असून तें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे. जोंवर आजच्याप्रमाणें काँग्रेस मिथ्याराष्ट्रीयत्वाच्या तत्त्वनिष्ठेस उराशीं बाळगीत आहे तोंपर्यंत

तिचें धोरण हिंदुविरोधीच राहणार आणि कितीहि न्याय्य वा योग्य असलें तरी हिंदूंच्या हिताची ती वंचनाच करणार हें निश्चित. क्षणभर मनाशीं विचार करा कीं, हिंदु मतदार संघानें हिंदुसंघटणावादी प्रतिनिधींनाच मतें दिलीं असतीं आणि अशा रीतीनें मुंबईत, मद्रासेंत व इतरत्र हिंदुसभेचीं मंत्रिमंडळें असतीं तर निजामी राज्यांत जो हिंदूंना छळ सोसावा लागला त्याविषयीं तीं पूर्ण उदासीन राहिलीं असतीं काय ? निजामी राजसत्तेवर त्यांनीं केवढें तरी दडपण आणून त्याचा छलक हात थांबविला असता.

कॉंग्रेसपासून स्वतंत्र अशा हिंदुध्वजाखालीं हिंदुसंघटनवादी पुढाऱ्यांनीं निजामी निःशस्त्रप्रतिकाराच्या चळवळींत हात घातला. त्यांतला मुख्य हेतु हें स्पष्ट करण्याचा होता कीं जेव्हां विशेषतः मुसलमानांकडून हिंदूंचा छळ होतो अशा प्रसंगीं हिंदूंच्या संरक्षणार्थ कॉंग्रेस ही रतिमात्रहि प्रयत्न करणार नाहीं, आणि म्हणून हिंदुसंघटनवाद्यांनीं हिंदूंच्या रक्षणाचें काम आपल्याच शिरावर घेतलें पाहिजे आणि त्यांनीं मनांत आणलें तर कॉंग्रेसचा विरोध किंवा उदासीनपणा यांना न जुमानतां ते ती गोष्ट करूं शकतील. भावी हिंदु संग्राहक चळवळीचें पहिलें प्रत्यंतर म्हणूनच हे भागानगरचें युद्ध होतें आणि त्यांत आमचें राजकोट झालें नाहीं, तर उलट आम्ही या अग्नि–दिव्यांतून विजयपताका घेऊन बाहेर पडलों. कारण गेल्या शंभर वर्षांत आत्मविस्मृतीच्या मोहानें जी आपली शुद्ध राष्ट्रीय आत्मनिष्ठा आणि आमची सांस्कृतिक नि जातीय एकजीवता नष्टप्राय झाली होती ती आम्ही या लढ्याच्या योगान पुनरुज्जीवित करून साक्षात् अनुभवाला आणली. निजाम सरकारनें जे राजकीय अधिकार घोषित केले आणि हिंदूंना नागरिक, सांस्कृतिक नि धार्मिक स्वातंत्र्य देण्याचें जें आश्वासन दिलें त्याचा विचार करून आणि निजाम सरकारनें आपल्या प्रसिद्धी पत्रकांत ज्या प्रतियोगी सहकारितेच्या नि सहानुभूतीच्या धोरणाची मागणी केली त्या धोरणास अनुसरून हिंदु महासभेनें आपली निःशस्त्र–प्रतिकाराची चळवळ स्थगित केली. या संबंधीं दोन गोष्टी सांगणें अवश्य आहे. हिंदु प्रतिकारकांची निजामी सरकारनें सार्वत्रिक मुक्तता केली याविषयीं हिंदु महासभा त्यांचे आभार मानते. कारण ती गोष्ट योग्य अशीच झाली. परंतु ज्या अर्थीं मुळांत अपुऱ्या नि अर्धवट सुधारणाहि प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याच्या दृष्टीनें जितक्या त्वरेनें पाऊल टाकाव-

यास पाहिजे होते तितक्या त्वरेनें निजाम सरकार टाकीत नाहीं आणि ज्या अर्थी शांततेनें घटनात्मक प्रगति होण्याच्या दृष्टीनें आणि संस्थानांत हिंदु आणि मुसलमान यांच्यामध्यें स्थायी सलोखा निर्माण होण्याच्या दृष्टीनें कांहीं मार्ग निघावा यासंबंधीं हिंदुमहासभेस काळजी वाटते, त्याअर्थीं निजाम सरकारच्या ती ध्यानीं आणूं इच्छिते कीं त्यांनीं वेळ न गमावतां ही संधि घालवली नाहीं तर ठीक, एरवीं जर सुधारणा व्यवहारांत आणण्याच्या कामीं अक्षम्य चालढकल झाली तर त्याचे अनिष्ट परिणाम होऊन तीव्र असंतोष उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. आणि दुसरी नितांत आवश्यक असलेली गोष्ट अशी कीं, जे धर्मवेडे मुसलमान अधिकारी, मध्यवर्ती सत्तेकडून आपल्याला पाठिंबाच मिळेल या निश्चित्तीनें अद्यापहि मधुनमधून हिंदूंना छळीत आहेत अशा अधिकाऱ्यांवर निजामी सरकारनें बंधन घालावें. स्थानिक मुसलमान गुंड आणि वरील प्रकारचे अधिकारी यांना निजाम सरकारनें सर्व संस्थानभर कडक रीतीनें आळा घातल्यास धर्मवेडे मुसलमान ताळ्यावर येतील. ज्या सामोपचाराच्या हेतूनें या सूचना मी करीत आहें त्यांचा तशाच बुद्धीनें निजाम सरकार विचार करील अशी मी आशा करतों.

* * * *

शिवमंदिर प्रकरणीं दिल्ली येथील हिंदूंनीं उत्कृष्ट तितिक्षेनें चालविलेल्या लढ्यासंबंधीं त्यांना सर्व हिंदुस्थानांतून धन्यवादच दिले पाहिजेत. अहिंदूंच्या आक्रमणापासून हिंदुहिताचें संरक्षण कॉंग्रेस करीत नाहीं, करणार नाहीं व करण्यास समर्थहि नाहीं हाच बोध याहि घटनेंतून निघत आहे. कांहीं झालें तरी दिल्ली नगरपालिकेंतील प्रतिनिधी निवडतांना जर हिंदु हितसंबंधाचें रक्षण करण्याचें वचन देणारे आणि कॉंग्रेस तिकिटानें बांधले न जातां हिंदुसंघटन तिकीटानें बद्ध असलेले प्रतिनिधीच हिंदूंनीं निवडले तरच दिल्ली शिवमंदिर प्रकरणीं हिंदूंनी केलेला द्रव्यबळाचा आणि मनुष्यबळाचा व्यय नि त्याग व्यर्थ न जातां सत्कारणीं लागला असें म्हणतां येईल. या लढ्यानें उत्पन्न केलेली अखिल हिंदूंच्या ऐक्याची जाणीव हीच साक्षात् शिवस्वरूपी ठरेल. ज्या स्थानावर कुडाची झोपडी होती नि जी अत्यंत उन्मत्तपणानें उच्छेदण्यांत आली, त्या स्थानावर दहा वर्षांचे आंत भव्य शिवमंदिर उठून सहस्त्रावधि

यात्रिकजन पूजेसाठीं संमीलित होतील असें चित्र मला मनःचक्षूसमोर दिसत आहे. आपल्या न्याय्य अधिकाराचे रक्षणासाठीं खामगांव, महाड, भागलपूर इत्यादि अनेक ठिकाणीं हिंदूंनीं जे यशस्वीपणें प्रतिकार केले तेहि महत्त्वपूर्ण होत आणि त्यायोगें हे सिद्ध झाले कीं, हिंदुमहासभेच्या नेतृत्वाखालीं हिंदु एकजीव होऊन त्यांच्यांत आत्मप्रत्ययाची निष्ठा निर्माण झाली आहे.

*   *   *   *

याच सालीं सुरू झालेल्या युरोपमधील युद्धासंबंधानें आपलें काय धोरण असावें या संबंधीं हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळानें दोन स्पष्ट ठराव केलेले आहेत. आणि त्यानंतर नवी अशी घटना घडली नसल्यामुळें त्या विषयावर बोलण्याचें कांहीं उरलें नाहीं. मी ब्रिटीश राज्यसत्तेस पुन्हा आग्रहपूर्वक सांगतों कीं, वेस्टमिनिस्टरच्या निर्बंधाप्रमाणें स्वायत्त वसाहतींची प्रतिष्ठा नि स्थान युद्ध संपताच हिंदुस्थानाला देण्याची घोषणा त्यांनीं स्पष्टपणें आणि तत्काल करावी. हिंदु लोकांची सध्यांच्या युद्धांत इंग्लंडला अंतःकरणपूर्वक सहानुभूति मिळविण्याचा आणि स्वतंत्र हिंदुस्थानला देखील ब्रिटिश राष्ट्रसंघांत समानतेनें राहण्यास प्रवृत्त करण्याचा हाच एक मार्ग होय. त्वरित करण्याची गोष्ट म्हणून, हिंदुस्थानचे अंतिम राजकीय ध्येयाचे दिशेनें प्रगति करून घेण्यास हिंदुस्थानास समर्थ करण्यासाठीं त्यास वसाहतीचे स्थान देण्यांत विलंब झाल्यास ब्रिटिश राष्ट्रसंघाच्या ऐक्यभावनेसहि तो घातक ठरेल. पूर्वेकडे जपानचा उदय आणि त्वरेनें होणारी प्रगति आणि पश्चिमेकडे रशिया इटली, आणि जर्मनी यांची प्रगति या गोष्टी अनिष्ट सूचक असून एखाद्या ब्रिटनविरोधी राष्ट्रव्यूहाला तोंड देण्यासाठीं सबळ अशी ब्रिटिशांची भूमिका व्हावी ह्या दृष्टीनें पहातां स्वतंत्र व स्वायत्त हिंदुस्थान असणें, हीच गोष्ट ब्रिटनला पोषक ठरेल. परंतु कितीही राजकीय शब्दावडंवर माजविलें तरी हिंदुस्थानाचा असंतोष शमणार नाहीं आणि ब्रिटिशांचें अंकित म्हणून राहण्याची अप्रतिष्ठा हिंदुस्थान ह्यापुढें सहन करणार नाहीं. हिंदुस्थानांतील बहुसंख्य हिंदु व अल्पसंख्य मुसलमान ह्यांचेमध्यें प्रतिनिधित्वाचे प्रमाण इत्यादि उपांगभूत गोष्टीमध्यें एकमत होत नाहीं येवढयावरून त्वरित वसाहतीचें स्थान देण्याचें विलंबावर टाकणें न्याय्य ठरतें या बोलण्यावर कोणत्याही प्रतारणेच्या योगानें हिंदुस्थान

विश्वास ठेवील अशी तुम्ही आशा या पुढें करतां काय ? ब्रिटिश राजकारणी पुढाऱ्यांनीं अलिकडे असे उद्गार काढले आहेत कीं, " हिंदुस्थानांतील अल्पसंख्य म्हणजे मुसलमान यांचेविरुद्ध त्यांचेवर एकही समेटाची योजना लादणें त्यांच्या विवेकास पटत नाहीं. आणि हिंदू नि मुसलमान ह्यांनीं स्वयंप्रेरणेनें संगनमत केल्याविना आणि प्रगतिपर घटनेची संयुक्त मागणी केल्यावांचून आपण रीतमात्र पुढें पाऊल टाकणार नाहीं. इंग्रज राजकारणी हे कोणत्याही लोकांवर त्यांच्या इच्छेविरुद्ध कांहीं लादण्याची इच्छा करीत नाहींत इतके ते लोकसत्तेचे भोक्ते आणि पापभिरु जणूकाय एका रात्रींत झाले ही एक नवलाचीच वार्ता होय ! पण त्यांना असें विचारावेसें वाटतें कीं, तुम्ही आपली अनियंत्रित राजकीय सत्ता हिंदुस्थानाच्या शिरावर लादली त्यावेळीं हिंदुस्थानाचें लोकमत कळण्यासाठीं सार्वत्रिक मतांची गणति केली होती काय ? आणि दोनच महिन्यापूर्वी एका लेखणीच्या फट्काऱ्यानें प्रांतिक स्वायत्तता उडवून दिली नि गर्व्हनरांना आपल्या मतांप्रमाणें नि इच्छेप्रमाणें राज्य चालविण्यास अधिकार दिलें, त्यावेळीं तुम्हीं सार्वात्रिक लोकमताची गणती केली होती काय ? किंवा अल्पसंख्य नि बहुसंख्य यांनीं तुम्हापाशीं संयुक्तपणें तशी विनंति केली होती काय ? आणि हिंदुस्थानावर निर्भेळ अनियंत्रित सत्ता नि पारतंत्र्य तुम्हीं लादूं शकला, हिंदुस्थानाला अंकित ठेवूं शकला, तर तशाच रीतीनें विशेषतः जेव्हां बहुसंख्य लोक तशी मागणी करीत आहेत अशावेळीं, अल्प संख्यांच्या अनिच्छेला न मानतां वसाहतींचें स्वराज्य तुम्हीं कां लादूं शकणार नाहीं ? तुम्हीं हिंदुस्थानच्या डोक्यावर शाप लादलेत, तर तुम्हाला वरही लादतां येणार नाहींत काय ? हिंदुस्थान राजकीय प्रगतीचा उत्क्रांती मार्गच जावर आचरीत आहे तोंवर शक्य तितक्या लौकर हिंदुस्थानचा जन्मसिद्ध अधिकार देण्याची अनिच्छा झांकण्यास अल्पसंख्य मुसलमानानांच्या निमित्तांचा उपयोग करणें आणि वरीलप्रमाणें पोकळ राजकीय छद्मीपणा चालविणें, ब्रिटीश लोक थांबवितील तर तें ब्रिटिशांना नि हिंदुस्थानालाही हितावह होईल. सर्व न्थाय्य प्रगति थांबविण्यासारखा नकार देण्याचा निर्णायक अधिकार मुसलमानांस देऊन जर हिंदूंचा क्रममार्ग बंद करण्यांत आला तर

पेंचप्रसंग उत्पन्न होईल; पण तो अल्पकाळच टिकेल. कारण निसर्ग हा अभाव द्वेषी आहे आणि क्रमशः प्रगति अशक्य केली तर कालशक्तीचें वाढतें सामर्थ्य हें दुसऱ्या अधिक भयानक अशा मार्गांचा अवलंब केल्यावाचून राहणार नाहीं.

( १५ )

# त्रिविध कार्यक्रम

कांहीं अनपेक्षित निकडीची आणि नितांत अवश्यक अशा कर्तव्याची वेळ प्राप्त न झाल्यास, मध्यंतरींच्या वेळांत प्राथमिक, प्रांतिक नि मध्यवर्ति अशा हिंदुसभांनीं पुढीलप्रमाणें त्रिविध विधायक कार्यक्रम मुख्यतः आचरावा.

आपापल्यापरीनें उपयुक्त नि अवश्यक अशीं असंख्य कार्यें आपल्यापुढें आहेत. परंतु प्राथमिक गोष्टीपासूनच प्रारंभ करणें केव्हांही हिताचें असतें. सर्व गोष्टी एकाच वेळीं करूं जाण्यांत आणि अंतीं प्रत्येक गोष्ट अर्धवट, अपुरी वा विकृत करून ठेवण्यांत किंवा पुढें दिसेल त्याप्रमाणें भाराभर कामें उचलीत जाण्यांत, नि उपांगांतच गढून हतबुद्ध होण्यांत अर्थ नाहीं. त्यापेक्षां केव्हांहीं तुलनेनें सर्वांत अधिक मूलग्राही, विशेष परिणामकारक, आणि सध्यांच्या आपल्या सामर्थ्याच्या नि साधनसामुग्रीच्या कक्षेंत पडणारे असे कार्यक्रम निवडावे आणि तेवढ्या कार्यक्रमांवरच मुख्यतः आपल्या श्रमांचें केंद्रीकरण करण्याची योजना करावी हेंच युक्त होय.

आपली शक्ति वाढली नाहीं तोंवर केवळ क्षोभ नि देखावा उत्पन्न करण्याचे हेतूनें युद्ध ओढवून घेणें सर्वकाळीं योग्य नाहीं. तसें केल्यास निष्कारण पराभवाचा अनिष्ट संभव उत्पन्न होतो. नाविक लोक जलप्रवाहाचे कलानेंच मार्गक्रमण करीत असतात. सिंह देखील योग्य संधी पाहण्यासाठीं दबा धरून राहतात. असंख्य मुखांतून गर्जनापूर्वक अग्निवर्षाव करून प्रतिपक्षाची वाताहात करणाऱ्या प्रचंड युद्धनौका तें कार्य करण्यापूर्वीं शांत नि अज्ञात अशा स्थळीं घडविल्या जात असतात.

खालील कार्यविभाग मी यदृच्छया सुचले तसे निवडले नाहींत. ती निवड करतांना वर दिलेले सर्व विचारांचे अंश लक्ष्यांत घेतले आहेत. हे तीन कार्यक्रम अत्यंत मूलग्राही नि अत्यंत अवश्यक आहेत. आणि प्रसंगोपात्त अवश्यक गोष्ट करण्याची मनीषा असलेल्या प्रत्येक हिंदुसंघटनवाद्यांच्या आटोक्यांतील आहेत. हें कार्यक्रम प्रथमारंभीं विशेष आकर्षक दिसले नाहींत तरी आपल्या मानाच्या रक्षणासाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं जेव्हां वेळ येईल तेव्हां तोंड देण्यास अखिल हिंदू जगत् सिद्ध व्हावें असें सामर्थ्य ते आपणास निश्चितपणें प्राप्त करून देतील. ह्या कार्यक्रमासमवेतच संघटनाचीं इतर अंगेंहीं हातीं घेणें ज्यांना शक्य असेल त्यांनीं अर्थात् तसें करण्यास प्रत्यवाय नाहीं. परंतु येत्या दोन वर्षांत तरी पहिल्या प्रथम आपलें सर्व लक्ष्य ह्या तीन कार्यक्रमावर केंद्रित व्हावयास पाहिजे. इतर प्रश्न आजच हातीं घेण्यापेक्षां ह्या तीन कार्यक्रमांच्या दिशेनें येत्या दोन वर्षांत आपण जी प्रगती करूं, तिचे योगानें आपणांस अशी एक प्रभावी भूमिका प्राप्त होईल कीं तिच्यावरून आपण अधिक कार्यक्षमतेनें इतर प्रश्न सोडविण्यास समर्थ होऊं; म्हणून प्रत्येक नगरांत, उपनगरांत व ग्रामांत पुढील गोष्टीसाठीं वातचक्राप्रमाणें खळबळीचा प्रचार करण्यासाठीं आपले प्रयत्न चालवावे.

( १ ) अस्पृश्यता दूर करा.

( २ ) सर्व विद्यापीठें, शाळा, महाविद्यालयें यांना सैनिक शिक्षण विद्यार्थ्यांना अनिवार्य करण्यास भाग पाडा आणि आपल्या तरुणांना साधेल त्या मार्गानें नाविक, वैमानिक व सैनिक दलामध्यें प्रवेश मिळवून द्या

( ३ ) हिंदूंचे मतदार संघ अशा रितीनें अधिकांत अधिक प्रवृत्त करा कीं, हिंदुहितसंबंध राखण्यासाठीं उघडपणें आपणांस बांधून घेणाऱ्या अशा हिंदु-संघटनी लोकांसच त्यांनीं मतें द्यावीत; कॉंग्रेसचे प्रतिनिधी जोंपर्यंत कॉंग्रेसच्या शिस्तीनें बांधले आहेत आणि कॉंग्रेस तिकीटानें अडकले आहेत तोंपर्यंत जरी त्यांची इच्छा असली तरी किंवा त्यांनीं वचन दिलें तरी धैर्यानें आणि स्वतंत्रतेनें हिंदुहिताचें संगोपन त्यांना कदापिही करतां येणार नाहीं. म्हणून कॉंग्रेसला मतें देणार नाहींत अशा निश्चयाचें हिंदू मतदार संघ निर्माण करा. हिंदु जगताचा इतर कोणत्याही विभागाप्रमाणें जे आपले बांधव आहेत व धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय नि

इतर सर्व दृष्टींनीं आपलेच आहेत अशा निदान दोन कोटी लोकांना आपल्या संघटनेंत समाविष्ट करून घेण्याचें कार्य वरील पहिल्या कार्यक्रमानें होईल. सार्वजनिक जीवनांत सर्व नागरिकांना म्हणजे अहिंदूंना देखील जे कांहीं मूलभूत अधिकार उपभोगावयास मिळतात, ते सर्व आपल्या तथाकथित अस्पृश्य बंधूंना प्राप्त करून देऊन तथाकथित स्पृश्यांच्या समान भूमिकेवर तत्काळ आणण्याचा प्रयत्न प्रत्येक हिंदूसभेनें आपआपल्या क्षेत्रांत करावा. केवळ जन्मावर आधारलेल्या अस्पृश्यतेच्या आधारावर कोणत्याही रीतीनें आपले अस्पृश्य बांधव कोठेंही पीडले जात असतील तर आपण त्यांचा पक्ष घेऊन विरोधास तोंड द्यावें नि तसें करण्यास त्यांनाही प्रवृत्त करावे आणि अवश्य तर न्यायालयापर्यंतही हा प्रश्न न्यावा. मात्र आपल्या सनातनी बंधूंच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यास बाध आणून कोणत्याही रीतीनें त्यांच्या भावनांचा अपमान व अधिक्षेप केव्हांही करूं नये. परंतु सार्वजनिक शाळा, वाहनें, अधिकार स्थानें, आणि सार्वजानिक जीवनाच्या प्रत्येक अंगांत केवळ जातीनें अस्पृश्य म्हणून कोणाही हिंदूला दुसऱ्या हिंदूचें सार्वजनिक अधिकारास बाध आणतां येऊं नये. मुसलमान व इतर अहिंदू लोकांना आपण हिंदू ज्या सामाजिक समानतेनें वागवितो तितकीच समानता कोणत्याही जातीच्या आपल्या हिंदू बांधवास न्यायानेंच प्राप्त झाली पाहिजे. याच्या विपरित वर्तन करणें म्हणजे वस्तुतः आपल्या सामान्य हिंदुत्वाचा अवमान करण्यासारखें आहे. येथें हेंही स्पष्ट उल्लेखिलें पाहिजे कीं, जे आज अस्पृश्य म्हणून गणले गेले आहेत ते स्पृश्य मानल्या गेलेल्या हिंदु इतकेंच तंतोतंत हें पाप करण्यांत दोषी आहेत. कारण इतरांकडून त्यांना जितकी निर्दयपणाची वागणूक दाखविली जाते तितकीच प्रत्येक अस्पृश्य जात दुसऱ्या एखाद्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीला अस्पृश्य म्हणून दाखवीत असते. हें पाप आपणा सर्वांना सारखेंच व्यापून बसलें आहे. आणि म्हणून सर्वोच्च प्रयत्नानें हा भयंकर दोष काढून टाकण्याचा निश्चयानें व सहकारितेनें आपण प्रयत्न करूं या. मध्यंतरीं आमच्या सनातनी बांधवांनीं निश्चित राहावें कीं, प्रत्येक नागरिकाला न्यायतः प्राप्त होणाऱ्या मूलभूत अधिकारांव्यतिरिक्त एखादी धार्मिक सुधारणा अस्पृश्यतेच्या संबंधानें देखील हिंदुत्वाच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही

एखाद्या पंथाच्या गळी सत्तेच्या निर्बंधानें उतरविणार नाहीं; परंतु अस्पृश्यतेमुळें झालेल्या आणि होत असलेल्या अपरिमित हानी संबंधानें ज्या हिंदुसंघटनवाद्यांची निश्चिती झाली आहे ते देखील आपल्या स्वतांच्या व्यवहारामधें आपल्या विवेकबुद्धीप्रमाणें वर्तन करण्यास स्वतंत्र राहतील.

अस्पृश्यता निवारणाची तीव्र चळवळ कोणकोणत्या मार्गांनीं चालवावयाची हे वेळोवेळीं स्पष्ट करण्यांत येईल. या ठिकाणीं व्यक्तिगत उल्लेखाचा दोष पत्करूनही सांगतो कीं ज्यांना शक्य असेल त्यांनी रत्नागिरी हिंदुसभेनें गेल्या दहा वर्षांत माझ्या प्रेरणेनुसार अस्पृश्यता निवारणाची तीव्र चळवळ करून जें यश मिळविलें आहे तें वृत्तांतावरून समजून घ्यावें. त्यावरून हेही स्पष्ट होईल, कीं गांधीनिष्ठ अस्पृश्यता निवारणाची दृष्टि आणि हिंदुसंघटणवाद्यांची त्या प्रश्नासंबंधाची दृष्टि यांत मुळांतच भेद आहे आणि म्हणून जरी आम्हीं त्याच्याशी सहकार्य करण्यास प्रत्यवाय नसला तरी गांधीनिष्ठ चळवळींत आम्हीं चळवळ करून एकरूप करतां कामा नये. गेल्या २०० वर्षांत अस्पृश्यता निवारणाचें संबंधीं झालेल्या कार्याहूनही अधिक कार्य हिंदुसभानिष्ठांनीं येत्या दोन वर्षांत केलें पाहिजे.

दुसऱ्या विधायक कार्यक्रमासंबंधानें महासभेच्या अखिलभारतीय समीतींत नि कार्यकारी मंडळांत वेळेवेळीं योजना करण्यांत येतील.

तिसरा कार्यक्रम मात्र या सर्व कार्यक्रमाच्या मेरुमणी सारखा आहे. जोंपर्यंत हिंदूमतदारसंघ विधि मंडळांत नि स्थानिक संस्थांत केवळ हिंदुसंघटणवादी प्रतिनिधीच न पाठवितां, राजसत्तेपुढें आपलें प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार कॉंग्रेसला येत आहे तोंपर्यंत हिंदू हें आपल्याच हिंदुस्थान देशांत राजकीय असाह्यतेच्या अवस्थेतच रहाणार. गतकालाप्रमाणेंच पुढेंहि मोठ्याप्रमाणांत हिंदूंच राजकीय अधिकाराकरितां झुंजतील नि यशही मिळवतील. परंतु मतदानाचे वेळीं त्या अधिकाराचें त्यागपत्र कॉंग्रेसच्या हातीं देण्याच्या आत्मघातकी मूर्खपणापासून हिंदू मुक्त होणार नाहींत तोंपर्यंत हिंदुस्थानांत हिंदूजगताची न्यायभूमिका केव्हांहि बलिष्ठ होणार नाहीं. उलट हिंदू निर्माल्यवत् होऊन त्यांनीं

मिळविलेल्या अधिकाराचा लाभ मुसलमानच अधिक घेतील. आणि त्या योगें वाढलेल्या सामर्थ्यानें हिंदूनाच अधिकाधिक मार्गे खेंचतील.

आणि हेंहि लक्ष्यांत ठेवा कीं, जवळच्या भविष्यकाळांत एकादी वर्तुल परिषद किंवा एक प्रकारची घटनासमिती बोलावली जाणार आहे. आणि जोंवर आपले प्रतिनिधि म्हणून कॉंग्रेसनिष्ठांनींच हिंदुलोक निवडतील तोंपर्यंत राज्यकर्तेंही कॉंग्रेसकडे न्यायतःच हिंदूमताचा प्रतिनिधी म्हणून पहाणार. मग कॉंग्रेसवाले स्वतः ती गोष्ट कितीहि नाकारोत. आणि कॉंग्रेसनें सर्व राष्ट्रीय प्रतिनिधित्वाचा अधिकार सांगितला तरी, कॉंग्रेस ही मुसलमानांची किंवा सर्व राष्ट्राची प्रतिनिधी आहे असें राज्यकर्ते कधींहि मानणार नाहींत, कारण मुसलमान कॉंग्रेस तिकिटावर उभ्या राहिलेल्या मुसलमानाला बहुधा निवडून देत नाहींत. हिंदूंच्या प्रांतांत देखील आजच मुसलमान समसमान जागा मागूं लागले आहेत. कॉंग्रेस संस्थेचें हें धोरण व्यक्तिशः अमान्य असणाऱ्या कॉंग्रेसच्या कक्षेंतील हिंदूंच्या गुप्तपणें चालणाऱ्या कुरकुरीचा व जळफळाटाचा कांहींएक उपयोग नाहीं आणि हिंदूसंघटनवाद्यांनी केवळ निषेध करूनहि भागणार नाहीं. कारण घटनापरिषदेंत किंवा वर्तुल परिषदेंत मुस्लीम लीगचे प्रतिनिधी जसे स्वतंत्रपणें, निःसंगपणें नि निर्भयपणें आपल्या अधिकारांचें समर्थन करतील तसें हिंदूंच्या न्याय्य हक्कांचे समर्थन करणारा हिंदू मतदारसंघाकडून अधिकृत असा पक्ष जोंवर नाहीं तोंवर कांहींएक होणार नाहीं.

परंतु जर हिंदू मतदारसंघ कधींकाळीं भानावर येईल आणि कॉंग्रेसनिष्ठ प्रतिनिधी निवडण्याचें नाकारून केवळ हिंदुसंघटनवादी प्रतिनिधींस बहुमतानें निवडून देईल तर पंजाब व बंगाल इत्यादि प्रांतांत जसें मुसलमानी राज्य आहे तसे निदान सात प्रांतांत तरी हिंदुसंघटनवाद्यांचें राज्य निर्माण होईल. आणि असें झालें म्हणजे संयुक्त प्रांतासारख्या हिंदूलोकमताच्या प्रांतांत देखील, कॉंग्रेसराज्य असल्यामुळें हिंदू ज्या अन्यायाविरुद्ध आक्रोश करीत आहेत, तसले निदान शेंकडा पंच्चाहत्तर अन्याय तरी दूर करण्याची राजकीय सत्ता हिंदूंचे हातीं येईल. प्रांतिक पोलीस आणि राज्याचे

१०६०२ ११

सर्वसेवक हे हिंदुसंघटनवादी मंत्रीमंडळाच्या नियंत्रणाखालीं राहतील आणि त्यायोगें हिंदूच्या अधिकारांकडे दुर्लक्ष करून ते दडपून टाकणें त्यांना अशक्य होईल. किंबहुना स्वतः मुसलमान आपण होऊनच हिंदूच्या अधिकारावर अतिक्रम करण्याचें धाडसही करणार नाहींत किंवा अक्षम्य हिंदूविरोधी नि राष्ट्रविरोधी मागण्याही पुढें मांडणार नाहींत. आणि ज्या अर्थी अल्पसंख्य मुसलमानांचे न्याय्य अधिकार त्यांना देण्याविषयीं हिंदु विरोधी नाहींत आणि हिंदु संघटनी लोक सन्माननीय मित्रत्वानें हिंदुस्थानांतील देशबांधवांशीं वागूं इच्छितात, त्या अर्थी अल्पसंख्य मुसलमानांना त्यांच्या न्याय्य अधिकारासंबंधीं सर्व प्रकारें संरक्षण मिळेल.

म्हणून येत्या दोन तीन वर्षांत आपले सर्व प्रयत्न या गोष्टीवर तीव्रतेनें एकवटले पाहिजेत. हिंदू मतदारांनीं कोणत्याही निवडणुकींत कॉंग्रेसनिष्ठाला मत न देतां केवळ हिंदुसंघटनवाल्यालाच मत दिलें पाहिजे. यासाठीं हिंदुसंघटणकार्याला वाहिलेलीं दैनिक वृत्तपत्रें आणि मध्यवर्ति निधी यांची आवश्यकता आहे. या सर्वांचे आधीं आपण हिंदूपक्ष उभारला पाहिजे. जे हिंदुसभेच्या संघटनेमध्यें रीतसर संबद्ध नाहींत परंतु जे हिंदुसभावाल्यांइतकेंच हिंदुसंघटनवादी आहेत अशा सनातनी, आर्यसमाजाची व इतर अनेक हिंदु पंथापंथांचा व गटांचा समावेश ह्या हिंदू पक्षामध्यें होईल. हें सर्व कसें नि कोणत्या साधनांनीं घडवून आणावयाचें याचा विचार नि योजना स्थानिक, प्रांतिक, नि मध्यवर्ती हिंदुसभा आणि विशेषतः सर्व हिंदुसंघटनवादी लोक ह्यांनीं केला पाहिजे. मग ते हिंदुसभेचे नियमतः सभासद असोत वा नसोत. आपण प्रयत्न करूनही हिंदुमतदार संघ कॉंग्रेसलाच मतें देण्याचें आत्मघातकी मूर्खपणाचें धोरण चालू ठेवील आणि आपल्याला मतमोजणींत बहुमत लाभणार नाहीं असें झालें तर काय करणार? निराश होण्याचें कारण नाहीं. बहुमत मिळविण्याचें आपले प्रयत्न निश्चितपणें यशस्वी होतील; कारण महाराष्ट्र नि इतरत्र हिंदुसंघटन प्रतिनिधी, कॉंग्रेसच्याच तीव्र विरोधास तोंड देऊन अलिकडेच निवडून आलेले आहेत. आणि त्यांतले कांहीं तर पहिल्या प्रतीची मतें मिळवून निवडून आलेले आहेत. विधिमंडळांत आणि स्थानिक

संस्थांत एकनिष्ठावान् हिंदुसंघटनी अल्पसंख्य पक्ष जरी निर्माण झाला तरी तो बहुसंख्याकांच्या स्वच्छंद वर्तनाला परिणामकारक रीतीनें प्रतिरोध करूं शकतो. आणि त्यायोगें हिंदुंच्या दुःखांना वाचा फुटून प्रगति मूळसत्तेचे आक्रमण ह्यांची भूमिका उत्पन्न होते.

आणि समजा आपल्याला एकही स्थान न मिळतां आपण निवडणुकींत निःशेष पराभूत झालों तर? तरीही धीर धरा. आम्ही आमचा पराजय मान्य करून सार्वत्रिक अपमान सहन करूं पण अभिमानानें स्वतःशीं व्यक्तिशः आपण असें म्हणूं शकूं कीं, प्रचंड प्रतिरोधी शक्ति पुढें असतांही आम्ही आमच्या विवेक बुद्धीची प्रतारणा केली नाहीं. निवडणुकींतील अपजय नि अवमान याचा दोष हिंदुमतदारसंघाचें शिरावर पडेल. हिंदुपक्षाला मत देणाऱ्याचेवर तरी निदान हा दोष राहणार नाहीं. तसेंच इतक्या न्याय्य प्रश्नाचे आधारें निवडणूकींत कॉंग्रेसचें विरुद्ध स्पर्धा करण्यास एक पक्ष उभा राहण्याचें भय निर्माण झाल्यानंतर मिथ्या राष्ट्रीयत्वाच्या कुकल्पनेनें हिंदुहित-संबंधाचा बळी देण्यास कॉंग्रेस अधिकाधिक कचरल्याशिवाय राहणार नाहीं.

जय मिळत चालला आहे. अशाच वेळीं राष्ट्रीय झुंझीमध्यें प्रविष्ट होणें हेंही देशभक्तीचें लक्षण आहेच. परंतु ज्यावेळीं एखादा न्याय्यपक्ष युद्धांत जवळ जवळ पराभूत झालेला दिसत आहे अशा वेळीं आपल्या विवेकबुद्धीची प्रतारणा करण्याचें नाकारून अवमान नि पराभव यांची क्षिती न बाळगतां निग्रहानें त्याच्याच ध्वजाखालीं उभे राहणें हेंच धैर्यशालीपणाचें ठरेल आणि प्रामाणिक सैनिक व्यक्तिशः एवढेंच काय तें करूं शकतो. त्याला जरी सार्वत्रिक विजयाचा आनंद उपभोगितां न आला तरी आपण आपलें कर्तव्य केलें हें त्याचें परमोच्च समाधान कशानेंही नाहींसें होणार नाहीं. सध्यांच्या स्थितींत हिंदुसंघटन-वाद्यांनीं अशाच प्रकारच्या निष्ठेनें आपली झुंज चालविली पाहिजे. आणि कांहीं झालें तरी पहिलें हिंदुद्रोही ठरण्यापेक्षां शेवटचें निष्ठावान् हिंदुसंघटनवाद्यांचें पथक होण्याचा आपण निर्धार करूं या.

—समाप्त—

REFBK-0019189

## वाचनीय पुस्तकें:

१

**बॅ. सावरकर यांचें चरित्र**

( प्र. गो. गो. अधिकारी ).

२

**लंडनचीं वातमीपत्रें**

( ले. बॅ. सावरकर )

३

**हिन्दूसभेचा अितिहास**

( लौकरच प्रसिद्ध होअील )

४

**संघटन बोधावली**

( डॉ. हेडगेवार यांचे उद्गार )

महाराष्ट्र प्रकाशन संस्था मुंबअी नं. ४.